३२
म. ग्रं. सं. ठाणे
ग्र
नं.

# ...बापूजी अणे

(...वनचरित्र)



REFBK-0004643

किंमत ७ आणे.

सदाशिव हणमंत बल्लाळ.

२५८

राजस्थान मराठी प्रकाशन विभाग–३

# लोकनायक बापूजी अणे

## [ जीवन चरित्र ]

११-५
१६-८-३२

लेखक—
सदाशिव हणमंत बल्लाळ
माजी संपादक, 'लोकमत'

REFBK-0004643

दत्तात्रय सदाशिव अभ्यंकर,
राजस्थान प्रिंटिंग अँड लिथो वर्क्स लि.
अकोला–वऱ्हाड.

( सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन. )

४६०३

प्रथमावृत्ति
प्रति २ हजार

४ जुलै १९३२

किंमत ७ आणे.

सं. प ८८३

# प्रस्तावना.

वऱ्हाडचे सुप्रसिद्ध राष्ट्रीय पुढारी लोकनायक माधव श्रीहरि ऊर्फ बापूजी अणे यांच्या या अल्पचरित्रास प्रस्तावना लिहिण्याची कामगिरी मजवर सोंपवून, चरित्रनायक व चरित्रलेखक या उभयतांच्या दोन तपाच्या मित्र-प्रेमाच्या ऋणाची अंशतः फेड करण्याची सुसंधि मला आणून दिल्याबद्दल प्रथम ग्रंथकार श्री. सदाशिवराव अण्णा बल्लाळ यांचे मनःपूर्वक आभार मानणें जरूर आहे. सध्यांचें चरित्र अत्यंत संक्षिप्त व त्रोटक असलें तरीं इतकें सुबोध झालेलें आहे कीं त्यावर अधिक प्रकाश पाडण्यास प्रस्तावनेच्या मदतीची आवश्यकता आहे असें मला वाटत नाहीं. तथापि प्रत्येक लोकनायकाच्या जीवनक्रमांत कांहीं प्रसंगीं विसंगततेचा आभास उत्पन्न होत असतो तसा बापुजींच्या चरित्रांतहि क्वचित् स्थळीं दृष्टीस पडण्याचा संभव असल्यामुळें तेवढ्याच पुरते दोन शब्द प्रस्तावनेंत लिहिण्याचें योजिलें आहे.

वास्तविक लोकनायक बापूजी अणे यांच्या आजवरच्या वर्तनांत विसंगतता अशी कोठेंच नाहीं. त्यांचें वर्तन अव्वलपासून आजपर्यंत अत्यंत सुसंबद्ध व एक सूत्रांत ग्रथित झालेलें आहे. ज्या एका विशिष्ट ध्येयाच्या भक्तीनें त्यांनीं सार्वजनिक आयुष्यांत व विशेषेंकरून राजकारणांत प्रवेश केला त्यावरील त्यांची निष्ठा आतांपर्यंत केव्हांहि ढळलेली नाहीं किंवा ज्या मूलभूत तत्वांच्या पायावर त्यांनीं आपल्या राजकीय आचाराची इमारत उभारली त्या तत्वांचा त्यांच्याकडून केव्हांहि अनादर करण्यांत आलेला नाहीं. तथापि त्यांच्या आजवरच्या वर्तनांतील रहस्य ज्यांना नीट समजलें नाहीं त्यांना गेल्या सत्याग्रहयुद्धांत ते सामील झाल्यापासून त्यांच्या वर्तनांतील सुसंगति सुटली असें वाटूं लागलें आहे. १९२० सालीं कौंसिल बहिष्कारास कसून विरोध करून तीन वर्षांत ज्यांनीं तो नामशेष करून टाकला, ते बापूजी अणे दहा वर्षांनंतर असेंब्लींतील आपल्या जागेचा राजिनामा देऊन कौंसिल-बहिष्कारवादी महात्मा गांधी यांच्या निशाणाखालीं

सविनय कायदेभंगाच्या मोहिमेंत सामील होतात, हें काय गौडबंगाल आहे हेंच त्यास कळत नाहीं. त्यांना वाटतें बापूजी हरले व महात्मा गांधी यांस शरण गेले. एका अर्थी असें झालेंच असेल तर त्यांत कांहीं वावगें नाहीं आणि त्यायोगे बापूजींच्या लौकिकास यत्किंचित् कमीपणाहि आलेला नाहीं. महात्मा गांधी यांच्यासारख्या असामान्य लोकोत्तर पुरुषश्रेष्ठाच्या पायीं शरण जाण्याचें भाग्य लाधणें हाहि परमेश्वरी कृपाप्रसादच आहे. परंतु वस्तुस्थिति मात्र तशी नाहीं. बापूजी हरले नाहींत. त्यांची आपल्या मार्गावरील श्रद्धा ढळलेली नाहीं अथवा ते आपल्या तत्वांचा त्याग करून महात्मा गांधींच्या संप्रदायांत सामीलहि झालेले नाहींत. गेल्या सत्याग्रहाच्या आणीबाणीच्या प्रसंगीं त्यांनीं असेंब्लींतील जागेचा राजिनामा दिला एवढ्यावरून ते कायमचे कौंसिल-बहिष्कारवादी बनले असें मानणें अत्यंत चुकीचें आहे. त्यांना कौंसिलप्रवेश अद्यापिहि इष्ट आहे व कॉंग्रेसनें त्यास आपली संमति न दिली तरी निदान विरोध तरी करूं नये असें प्रतिपादण्यास ते अद्यापिहि चुकावयाचे नाहींत. त्यांनीं असेंब्लीचा राजिनामा दिला तो कौंसिलबहिष्कार आपणांस पूर्णपणें मान्य आहे हें दाखविण्यासाठीं दिलेला नसून प्रसंगविशेषीं असें करणें हें प्रतिसहकारवादी राजकारणांत मान्य आहे हें दाखविण्यासाठीं दिला. इतकेंच नव्हे तर कौंसिलवाद स्वीकारणाऱ्या प्रतिसहकारवादी पक्षास नैमित्तिक कौंसिल-बहिष्काराप्रमाणें सत्याग्रह वा सविनय कायदेभंगहि पूर्णपणें मान्य आहेत ही गोष्टहि त्यांस स्वतःच्या उदाहरणानें दाखवावयाची होती व आपल्या पक्षासंबंधानें निष्कारण माजलेले दुराग्रह किती चुकीचे आणि निराधार आहेत हें जगाच्या निदर्शनास आणून द्यावयाचें होतें असेंहि म्हणण्यास मला हरकत वाटत नाहीं. असल्या प्रकारचे चमत्कारिक ग्रह त्यांच्या प्रतिपक्षांतच नांदत होते अगर आहेत, असें नसून त्यांच्या स्वतःच्या पक्षांतहि ते नांदत होते व आहेत. तेव्हां स्वतःच्या संप्रदायाचें सत्यस्वरूप काय आहे हें स्वपक्षीयांस व परपक्षीयांस स्पष्टपणें विशद करून दाखविण्यासाठीं परपक्षाशीं जुळणारा स्वपक्षीय कार्यक्रमांतील एखादा तपशील देशकाल वर्तमानानुरूप त्यांनीं अनुसरून दाखविल्यास त्यांत विसंगतता ती काय आहे? वास्तविक पहातां विसंगततेचा दोष बापूजींच्या आचारांत शिरलेला नसून त्यांचें तत्वज्ञान व तदनुसार त्यांनीं

०आखलेला कार्यक्रम यांचें आमूलाग्र यथार्थ ज्ञान न झाल्यामुळें जे अर्धवट प्रतिसहकारवादी राहिलेले आहेत त्यांच्या मूढ दृष्टीचा हा दोष आहे. कौंसिलप्रवेश मान्य केला कीं मग त्यांस सत्याग्रह-कायदेभंग अगर निःशस्त्र प्रतिकार केव्हांहि करतां यावयाचाच नाहीं असें त्यांनीं केव्हांहि प्रतिपादन केलेलें नाहीं. एवढेच नव्हे तर कौंसिलप्रवेशानेंच हे पुढचे मार्ग अधिक सुलभतेनें आक्रमितां येतील असा अभिप्राय त्यांनीं अनेकवार प्रगट केलेला आहे. तेव्हां अशी वस्तुस्थिति असतां १९३० सालांतील त्यांच्या वर्तनासंबंधानें असा गैरसमज कां उत्पन्न व्हावा ?

कॉंग्रेसच्या राष्ट्रीयधर्माच्या निशाणाखालीं वावरणाऱ्या शांततानुगामी त्रिविध पक्षांपैकीं बापुजी हे प्रतिसहकारवादी पक्षाचे अध्वर्यु होते व अद्यापिहि आहेत. " प्रतिसहकार " या तत्वाचे आधुनिक कालांतील हिंदुस्थानांतील द्रष्टे व आद्यप्रवर्तक लोकमान्य टिळक होते हें सर्वविश्रुतच आहे. वास्तविक पहातां हें महत्तत्व आज नव्यानें जन्मास आलेलें आहे अशांतला मुळींच अर्थ नाहीं. तें अनादि कालापासून चालत आलेलें आहे व पुढेंहि अनंत काल चालू राहील असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. इतकेंच नव्हे तर सहकाराच्या बाबतींत इतर तत्वाचें प्रतिपादन करणारेहि तत्वतः याच तत्वाचें उपासक आहेत असेंहि सहज सिद्ध होण्यासारखें आहे. महात्मा गांधी हे असहयोगी ह्मणून ख्यात आहेत, परंतु त्यांचें आजवरचें आचरण सूक्ष्म रीतीनें अवलोकन केल्यास त्यांचा असहयोग हा प्रतिसहयोगाचेंच एक अंग आहे असें स्पष्ट आढळून येईल. महात्मा गांधी आपणांस असहयोगी ह्मणवितात ते **प्रतिसहयोगाचा विरोध** दाखविण्यासाठीं ह्मणवीत नसून **प्रतिकारयोगाचा विरोध** दाखविण्यासाठीं ह्मणवीत असतात. **प्रतिसहकार** व **प्रतिकार** यांत जमीनअस्मानचें अंतर आहे. प्रतिसहकार हा सहकार व असहकार या दोन घटकांचा बनलेला असून हे दोन्हीहि घटक मूलतः प्रतिकाराचे विरोधीच आहेत. परंतु प्रतिकार हा एकाच घटकाचा बनलेला असून स्वयंसिद्ध आहे. व त्याचा असहकाराशीं वाद आहे—प्रतिसहकाराशीं वाद नाहीं. प्रतिपक्षाला दुर्मार्गापासून परावृत्त करावयाचें असल्यास सर्वोत्तम उपाय कोणता ? या प्रश्नाचा प्रतिकार व असह-

कार हीं दोन भिन्न व कदाचित् परस्परविरोधी उत्तरें आहेत. दुष्टांच्या आचा-रास नष्टप्राय करणें असल्यास त्यास विरोध अगर अडथळा करणें अवश्य आहे असें एक उपदेशितो; तर विरोधानें अगर अडथळयानें दुष्टाचारास प्रोत्साहन व उत्तेजन मिळत असल्यामुळें त्याच्या भानगडींत न पडतां दुष्टांच्या दुराचारांत सामील होण्याचें फक्त नाकारून दुष्ट व दुष्टाचार या दोहोंना हतबल करून टाकणे अधिक श्रेयस्कर असे दुसरा प्रतिपादतो. हीं दोन भिन्न मतें दुष्टांच्या आचरणाच्या स्वरूपासंबंधानें व त्याच्या मूल कारणांसंबंधानें जी दोन प्रकारची विचारसरणी आहे तिच्यामुळें जन्मास आलेलीं आहेत. तथापि या विचारसरणींची मीमांसा करीत बसण्याचें हें स्थळ नसल्याकारणानें मी त्या भानगडींत पडत नाहीं. तूर्त एवढेंच सांगणे पुरें आहे कीं प्रतिकार व असहकार या दोन तत्वांमधील थोडक्यांत फरक हा आहे. आणि हाच विशेषेंकरून स्पष्ट करण्यासाठीं महात्मा गांधी स्वतःस हट्टानें असहकारवादी ह्मणून ह्मणवून घेत असतात; प्रतिसहकारवादाच्या आपण विरुद्ध आहोंत हें दाखविण्यासाठीं ह्मण-वून घेत नाहींत. ते स्वतः प्रतिसहकारवादीच आहेत आणि गेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीच्या शेवटीं त्यांनीं घडवून आणलेला समेट हा त्यांच्या प्रतिसहकारवादित्वाची मूर्तिमंत साक्ष आहे. शक्य असेल तेथें सहकार व अवश्य असेल तेथे असहकार हें महात्माजींचें तत्व आहे व तें "शक्य असेल तेथें अप्रतिकार अगर सहकारसुद्धां व अवश्य असेल तेथें ( नुस्ता असहकारच नव्हे तर ) प्रतिकारही" या तत्वाहून भिन्न इतकेंच नव्हे तर विरोधी आहे. वरील दोन्ही तत्वांचे अनुयायी शक्य असेल तेथें प्रतिपक्षाशीं सहकारच कर-तील परंतु अवश्य झाल्यास प्रतिकारवादी असहकारितेची मर्यादा ओलांडून पलीकडे पाऊल टाकण्यासहि कचरणार नाहींत इतकेंच नव्हे तर टाकतीलच व प्रतिपक्षांच्या मार्गांत अडथळे आणतीलच आणि महात्मा गांधी फक्त असह-कारच अवलंबितील-पलीकडे एक गहूंभरहि सरणार नाहींत हा या दोन संप्रदायां-तील फरक आहे. परंतु हा फरक अगर विरोध प्रतिकार व असहकार यामधील आहे; प्रतिसहकार व असहकार यांमधील नाहीं एवढे लक्षांत ठेवलें पाहिजे. अर्थात् वरील विवेचनांत वापरण्यांत आलेले असहकार व प्रतिकार हे दोन्ही

शब्द अनत्याचारी प्रतिकार व अनत्याचारी असहकार या अर्थानेंच वापरले आहेत हें निराळें सांगणें नकोच !

परंतु असहकारितेच्या आंदोलनास उतार पडल्यानंतरच्या काळांत हा फरक स्पष्टपणें लक्षांत न आल्यामुळें असहकारितावादी, स्वराज्यवादी व प्रति-सहकारितावादी यांच्यांत नाहक कलह माजले व तीनहि पक्ष एकाच राष्ट्रधर्म-वृक्षाच्या शाखा असतांहि परस्परांकडे शत्रुत्वाच्या दृष्टीनें पाहूं लागले.

प्रतिकार व असहकार यांमधील फरक या पक्षभेदाच्या मुळाशीं मुळींच नव्हता असा या ह्मणण्याचा अर्थ नाहीं. तथापि हा भेद असला तरी प्रतिकार-वादी काय अथवा असहकारवादी काय दोघेहि शक्य असल्यास प्रतिपक्षाशीं सहकार करण्यास तयार होते ही गोष्ट केव्हांहि नाकबूल करतां यावयाची नाहीं. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें ह्मणजे एक सहकार आणि प्रतिकार ही जोडी मान्य करीत होता तर दुसरा सहकार व असहकार ही जोडी मान्य करीत होता; परंतु दोघेहि सहकाराच्या दृष्टीनें प्रतिसहकारीच होते-कोणीहि केवळ अगर नितांत प्रतिकारी नव्हता अगर नितांत असहकारीहि नव्हता. परंतु असें असतांहि प्रतिसहकारी ह्मणजे शुद्ध सहकारी आणि असहकारी ह्मणजे जगाच्या अंतापर्यंतचे असहकारी असे विपरीत अर्थ केले जात होते व कलहांत अधिका-धिक भर पडत होती. हे विपरीत अर्थ जन्मास येण्यास केवळ असहकारवाद्यां-चाच दुराग्रह कारण झाला असें नसून प्रतिसहकारवाद्यांच्याहि माथीं दोषाचा कांहीं भाग जाऊन पडत होता. तथापि कोणी कितीहि दोषी असला तरी हे दोन्ही अर्थ खोटे होते व दोन्हीहि पक्ष शक्य तेथें प्रतिपक्षाशीं सहकार्य कर-ण्यास सिद्ध होते ही गोष्ट निर्विवाद सिद्ध होती.

प्रतिकार व असहकार यामधील वाद अनादिकालापासून चालत आलेला असून तो जगाच्या अंतापर्यंत तसाच चालू राहील. परंतु त्यामुळें "**प्रतिसहका-राच्या**" महत्तम तत्वास किंचित्‌हि हानि पोहोचूं शकत नाहीं. हें तत्व त्रिकालाबा-धित सत्य असून तें सदासर्वकाल अभंगच रहाणारें आहे. जगांत ज्याला वावराव-याचें आहे त्याला त्याचा आश्रय केल्यावाचून गत्यंतरच नाहीं. कारण जगाच्या व्यवहाराचा सुरळीतपणा या एकाच तत्वावर अवलंबून आहे. गेल्या दहा बारा-

वर्षांत देशांत जें या बाबतीत रणकंदन माजलें होतें तें या तत्वाच्या सत्या-सत्यतेसंबंधानें अगर इष्टानिष्टतेसंबंधानें माजलेलें नसून या तत्वाचा हिंदी राजकारणांत कोठें, केव्हां व कसा उपयोग करावयाचा यासंबंधांत माजलेलें होतें. क्वचित् प्रसंगां प्रतिकार व असहकार यांच्याबद्दलहि वाद असेल परंतु त्यांतसुद्धां हीं तत्वें कोठें, केव्हां व कशीं वापरावयाचीं हाच मुख्य मुद्दा त्याच्याहि मुळाशीं होता, असें विचारांतीं आपणांस आढळून येईल. असो.

हा मुद्दा इतक्या पाल्हाळानें विवरण्याचें कारण एवढेंच कीं प्रारंभीं दिग्दर्शित केल्याप्रमाणें १९२० सालीं महात्माजींच्या असहकारितेला विरोध करतांना दृष्टीस पडलेले बापूजी अणे १९३० सालांत महात्माजींशीं सहकार्य करीत असलेले पाहून पुष्कळांना त्यांच्या वर्तनांत विसंगततेचा जो दोष दिसतो तो कितीं निराधार आहे हें त्यांच्या स्पष्ट नजरेस यावें. बापूजी अणे हे केव्हांहि नितांत सहकारवादी नव्हते आणि महात्मा गांधीं हेहि कधीं नितांत असहकार-वादी नव्हते. दोघेहि अव्वलपासून आतांपर्यंत प्रतिसहकारवादीच होते व पुढेंहि अखेरपर्यंत प्रतिसहकारवादीच रहातील. प्रतिसहकारांत समाविष्ट अस-लेला सहकार केव्हां, कोठें व कसा करावयाचा आणि असहकार केव्हां, कोठें, व कसा करावयाचा याबद्दल त्यांच्यात मतभेद असणें शक्य होतें व तो होताहि. परंतु हा मतभेद नैमित्तिक होता-नित्य नव्हता व त्यामुळें १९३० सालांत तो लुप्त झाला यांत आश्चर्य वाटण्याचे कांहीं कारण नाहीं. नैमित्तिक मतभेद अनेच तात्पुरते व वारंवार उद्भवणारे—मावळणारे असतात. आणि त्यांच्यामुळें मूळ तत्वभेद झाला असें मानण्यास यत्किंचितृहि जागा नसते. कदा-चित् प्रतिकार व असहकार याबाबतींतहि उभयतांत मतभेद असण्याचा संभव आहे. तथापि प्रतिकारांतहि असहकार अंतर्भूत असतोच ही गोष्ट लक्षांत ठेवली म्हणजे प्रतिकारवादी प्रसंगविशेषीं जरा अलिकडच्या मर्यादेपर्यंत मागें सरकून कांहीं कालापुरता असहकारास सिद्ध झाल्यास त्यांतहि कांहीं विसंगतता नाहीं. कारण त्यामुळें प्रतिकाराच्या तत्वाचा त्यानें आजिबात त्याग केला असें मुळींच होऊं शकत नाहीं. प्रतिकारवादी जर प्रसंगीं सहकार्यहि करूं शकतो तर त्याला असहकार करण्यास प्रत्यवाय कोणता आहे? सारांश, बापुजी अणे यांच्या वर्तनांत मला कोणत्याहि प्रकारची विसंगति तर कोठें दिसत नाहींच

पण उलट सुसंगतीच दिसते. शिवाय महात्मा गांधींच्या असहकारितेंत गेल्या युद्धांत चढाईच्या हल्ल्यांचा ( Raids ) अंतर्भाव झाल्यापासून तर असहकार व प्रतिकार यांच्या मधील पूर्वीचें अंतर बरेंच कमी झालें असल्यामुळें बापूजी अणे व महात्मा गांधी हे एकमेकांच्या अधिक निकट येऊं लागले आहेत असेंच मला वाटतें.

शिवाय गेल्या दहाबारा वर्षांच्या अनुभवानें प्रत्येक पक्षाच्या तत्वज्ञानांतील व कार्यक्रमांतील गुणदोषांचें पूर्ण आविष्करण झालें असल्यामुळें कदाचित् यापुढें कॉंग्रेसचा कार्यक्रम अधिक व्यापक होऊन सर्वपक्षांस परस्परांस पोषक होईल अशा रीतीनें कार्य करण्यास सवड मिळण्याचा आणि त्यामुळें एकमेकांना शत्रु लेखणारे कॉंग्रेसमधील सर्व पक्ष एकत्र होऊन व गुण्यागोविंदानें आपापसांत कार्याची वांटणी करून घेऊन परस्परांचे मित्र ह्मणून एकाच राष्ट्रधर्माचें भिन्न भिन्न अवयव या नात्यानें सहकार्यानें कार्यप्रवृत्त होण्याचाहि संभव आहे. कारण ध्येय व मार्ग यांच्या तात्विक स्वरूपासंबंधानें कोणाचाहि मतभेद नाहीं. संपूर्ण स्वातंत्र्य हेंच सर्वांचें ध्येय आहे व योग्य आणि शांतताप्रधान मार्गांनींच हें ध्येय साध्य करावयाचें असाच सर्वांचा निश्चय आहे. तेव्हां गतानुभवानें शहाणे होऊन हे सर्व पक्ष तपशिलांवर रणसंग्राम माजवीत बसविण्याचा उपद्व्याप सोडून देऊन व प्रत्येक कार्यक्रमांतील उपयुक्त भाग एकत्र करून सर्वव्यापक कार्यक्षेत्र निर्माण करण्यास उद्युक्त झाल्यास त्यांत मला तरी निदान कांहीं आश्चर्य वाटणार नाहीं. तेव्हां अशा प्रसंगीं पूर्वीचे आपापसांत भांडणारे पक्ष भांडणें टाकून सहकार्य करूं लागले तर त्यांच्या वर्तनांत विसंगति उत्पन्न झाली असें कसें ह्मणता येईल ? आपापसांतील तात्पुरते मतभेद जन्मजन्मांतरींहि मिटवून घ्यावयाचेच नाहींत अशी काय प्रत्येकानें भीष्मप्रतिज्ञा केली आहे ? उलट उपलब्ध होणारे सर्व मार्ग चोखाळून पाहून त्या सर्वांच्या गुणांचा ज्यांत समावेश होऊं शकेल असा एक बृहन्मार्ग तयार करण्याकडेच सर्वांची प्रवृत्ति होती असें ह्मणण्याचें साहस केल्यास तें सर्वस्वी अयथार्थच ठरेल असेंहि मला वाटत नाहीं. कारण असें नसतें तर मतभेद होतांच बहुसंख्याक पक्षानें कॉंग्रेसच्या मंडपांतून अल्पसंख्याकांची हकालपट्टी केली असती अथवा अल्पसंख्याक आपण होऊनच कॉंग्रेसपासून

फुटून बाहेर पडले असते. अनुकूल कालाच्या अपेक्षेनेंहि कदाचित् प्रत्येकजण काँग्रेसमध्यें राहिला असेल. तथापि अनुकूल कालाची अपेक्षा करीत काँग्रेसच्या मंडपांत बसण्यास प्रत्येकास पूर्ण सवड होती ही गोष्ट निर्विवाद आहे. आणि ही सवड पुढेंहि अशीच कायम राहील यांतहि शंका नाहीं. तेव्हां साहचर्यांत एकमेकांशीं भांडणारे पक्ष एकमेकांशीं सलोख्यानें वागण्यास तयार होणारच नाहींत असें मानण्यास आधार काय? गतकालाचा अनुभव त्यांस अक्कल शिकविणार नाहीं अथवा त्यांत औदार्य उत्पन्न करणार नाहीं असें कां समजावें? पक्षाभिनिवेशामुळें दुसऱ्यांस शरण जाणें सर्वांनाच कमीपणाचें वाटेल असें धरून चालले तरी एकमेकांस शरण न जातां सारेच मिळून एखाद्या सर्वव्यापी कार्यक्रमाचीच कास धरणार नाहींत म्हणून कशावरून? गेल्या दहाबारा वर्षांत आपापसांतील यादवीमुळें प्रत्येक पक्षाचें व त्याबरोबरच अखिल राष्ट्राचें केवढें अपरिमित नुकसान झालें हें आतां सर्वांच्याच पूर्ण प्रत्ययास आलेलें आहे. तेव्हां या पुढील कार्यक्षेत्रांत सर्वांचा समावेश होईल अशी व्यवस्था काँग्रेस करणार नाहीं असें सांगण्याचें साहस कोण करील? कालाच्या ओघाकडे नजर फेंकली तर असें कांहीं तरी स्थित्यंतर काँग्रेसच्या राजकारणांत घडून येईल अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं आहेत. काँग्रेसला इतरांपासून अलग काढण्याचा डाव प्रतिपक्षी खेळत असल्यामुळें तो हाणून पाडण्यासाठीं काँग्रेसला आपलें एकांगीपण सोडून आपल्या ब्रीदास बाध येणार नाहीं अशा युक्तीनें आपलें गणगोत शक्य तितकें विस्तृत करण्याशिवाय गत्यंतरच उरलेलें नाहीं. काँग्रेसचें द्वार सर्वांना खुलें ठेवण्याचें हेंच कारण आहे. काँग्रेसला आपला व्याप वाढवावयाचा आहे; आपलें साम्राज्य विस्तारावयाचें आहे. तेव्हां आपल्या कक्षेबाहेरचे मुलुखहि काबीज करणें काँग्रेसला भाग पडल्यावर आपल्या घरांतच पूर्वीपासून नांदणारांना ती बाहेर कशी ढकलूं शकेल? इतकेंच नव्हे तर त्यांच्यांत सध्या नांदणारें वैमनस्यहि कसें चालूं देईल? यापुढची परिस्थिति पूर्वींहून अधिक बिकट होणार हें कोणासहि सहज ध्यानीं येण्यासारखें आहे. तेव्हां अशा बिकट परिस्थितीशीं तोंड देण्यासाठीं काँग्रेसला अशी कांहीं तरी सर्वव्यापी योजना अमलांत आणावीच लागेल. ते तिला केव्हांहि टाळतां येणार नाहीं. तेव्हां भावी कालावर नजर दिली असतां हे भांडणारे पक्ष एकत्र-

 मं. प. ८८३

झाल्यास त्यांच्या आचरणांतील सुसंबद्धता सुटली ह्मणून कसें ह्मणतां येईल ? कालानुसार प्रगतिपर रहाण्यासाठीं वर्तनांत करावे लागणारे बदल हा विसंगतापणा नसून सुसंगतपणाच आहे. परंतु इतक्याउपरहि कोणास हा सुसंगतपणा दुराग्रहामुळें पटलाच नाहीं तर राष्ट्रघातकी सुसंगतपणापेक्षां राष्ट्रहितकारी विसंगतपणाहि पत्करला असें निःसंकोचपणें ह्मणणें भाग आहे. अस्तु.

या छोटेखानी ग्रंथाच्या छोटेखानी प्रस्तावनेच्या दृष्टीनें हा विस्तार मर्यादेबाहेर गेला असें प्रांजळपणें कबूल करणें प्राप्त आहे. परंतु बापूजी अणे यांची भविष्यकालीन जबाबदारी लक्षांत घेतली ह्मणजे इतक्या विस्तारानें त्यांच्या आचरणांतील रहस्याचें आविष्करण करण्यावांचून इलाजच नव्हता. बापूजी अणे हे सध्यां कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटींत दाखल झाले असल्यामुळे त्यांना अव्वल दर्जाच्या राष्ट्रधुरिणाची पदवी प्राप्त झालेली आहे. आणि या पदवीची सार्थकता सिद्ध होण्यासाठीं वरवर विसंगत दिसणाऱ्या परंतु अंतरीं पूर्ण सुसंगत असणाऱ्या अनेक गोष्टी त्यांच्या हातून होण्याचा संभव आहे. तेव्हां अशा प्रसंगीं त्यांचें आचरण कसें निरीक्षावें याची रीति त्यांच्या मित्रांना ज्ञात होणें अवश्य आहे. वरील विवेचन सर्वांनाच पटेल असें नाहीं, तथापि तें पटलें नाहीं तरी बापूजींसारख्या थोर प्रतीच्या पुढाऱ्यांचा वर्तनक्रम पारखावयाचा असल्यास त्यासाठीं सामान्य नियमांच्या पलीकडे दोन पावलें टाकलीं पाहिजेत, एवढा बोध जरी वाचकांना झाला तरी तेवढ्यांत समाधान मानण्यास कोणत्याहि प्रकारची हरकत नाहीं. बापूजींच्या या अत्यंत अल्पचरित्रांतहि वाचकांना अनेक भाग मननीय असे आढळतील. परंतु एका विशिष्ट भागासंबंधानेंच लिहावयाचें योजिलें असल्यामुळें त्यांचा परामर्ष घेणें युक्त वाटत नाहीं, आणि तेवढा अवकाशहि नाहीं. तेव्हां इतर सर्व विषय वाचकांच्या अभ्यासावरच सोंपवून ही बरीच लांबलेली प्रस्तावना येथेंच संपवितों.

अमरावती–वऱ्हाड
मंगळवार ता. २४ मे १९३२

**वामन गोपाळ जोशी.**

# लेखकाचें निवेदन.

श्रीयुत माधव श्रीहरि उर्फ लोकनायक बापूजी अणे यांचें देदीप्यमान चरित्र महाराष्ट्रीयांच्या कुतूहलाचा विषय झालें असल्यामुळें त्यांचा जीवन-वृत्तांत जाणून घेण्याची उत्कंठा महाराष्ट्रभर जागृत होणें स्वाभाविक आहे. यवतमाळास 'बापूजी वाङ्मय मंडळ' स्थापन होऊन त्याच्या विद्यमानें लोकनायकांचे लेख व भाषणें संग्रहीत करून पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यांत आलीं हें या जागृतीचेंच फळ होय. या ग्रंथांत प्रारंभीं लोकनायकांचें संक्षिप्त जीवनवृत्त देण्यांत आलेंच आहे. 'बापूजी वाङ्मय मंडळ' स्थापन झालें त्यापूर्वी देशभक्त श्रीयुत ब्रिजलाल बियाणी यांनीं माझे परमपूज्य पुढारी व स्नेही डॉ. भा. म. टेंबे यांजपाशीं लोकनायकांच्या चरित्राची मागणी केलेली होती. पण 'बापूजी-वाङ्मय-मंडळाच्या' उद्योगांत गेल्या नोव्हेंबर-पर्यंतचा काळ गेल्यामुळें ब्रिजलालजींची मागणी पुरी करतां आली नाहीं. वरील उद्योग पुरा होऊन लोकनायकांस त्यांच्या लेखांचा व भाषणांचा ग्रंथ समर्पण करण्याचा समारंभ यवतमाळ येथें ता. १७ डिसेंबर १९३१ रोजीं करण्यांत आला. या ग्रंथाचें मुद्रण संपत आल्यानंतर हें छोटेखानीं चरित्र लिहिण्यास २६ नव्हेंबर रोजीं सुरुवात करण्यांत आली, आणि तें १० डिसेंबर रोजीं पूर्ण करण्यांत आलें. मित्र ब्रिजलालजी यांचीं निकडीचीं पत्रें व डॉ. टेंबे यांचें टुमणें या दोहोंचें संयुक्त फल ह्मणजे हें लेखन होय. हीं टुमणीं नसतीं तर इतक्या थोड्या अवकाशांत हें चरित्र पुरें होऊं शकलें नसतें. याची हस्तलिखित प्रत वाचावयास दिली तेव्हां माझे स्नेही वाङ्मयभक्त श्री. वामन नारायण देशपांडे उद्गारले, "हें चरित्र एवढें संक्षिप्त कां?" असा यावर आक्षेप येणार हें खास! असो. या चरित्राची हस्तलिखित प्रत वाचून तींत कांहीं महत्वाच्या सुधारणा सुचविल्याबद्दल वामनरावांचे, त्याच

प्रमाणें सन्माननीय पुढारी श्री. अण्णासाहेब जतकर यांनीं बरीच माहिती पुरविल्याबद्दल त्यांचे आभार मानणें माझें कर्तव्य आहे. बापूजी वाङ्मय मंडळानें तयार केलेली लोकनायकांच्या चरित्राची हस्तलिखित प्रत, त्याच प्रमाणें वर्णीचे रहिवासी व लोकनायकांचे बालपणापासूनचे स्नेही श्री. रामभाऊ भागवत यांनीं परिश्रमपूर्वक लिहून काढलेलें चरित्र यांचा मला मनसोक्त उपयोग करावयास मिळाला, ह्मणून त्यांचे मी आभार मानतों. या चरित्राची ज्यांनीं प्रथम मागणी केली, व ती पूर्ण करण्याकरितां ज्यांनीं मला लेखणी हातीं घ्यावयास लाविली ते श्री. ब्रिजलालजी बियाणी व डॉ. टेंबे यांचे आभार व्यक्त करण्याकरितां कांहीं शब्द वापरले तरी अंतःकरणांतील अव्यक्ताच्या हृदयाकाशांत त्यांचें ऋण शिल्लक उरणारच आहे तें कसें फेडूं ?

लोकनायकांनीं प्रथम यवतमाळ जिल्हा व नंतर विदर्भ प्रांत यांचें राजकारण हातीं घेऊन तें सांप्रत स्थितीस आणलें. तें करतांना त्यांच्या निकटवर्ती सहकार्यकर्त्यांच्या बरोबर कामें करावीं लागलीं त्यांपैकीं कांहीं प्रमुखांचीं नांवें व त्यांचा संक्षिप्त परिचय करून देणें अवश्य वाटल्यावरून ती माहिती परिशिष्ट रूपानें या चरित्रांस जोडण्यांत आली आहे.

माझे आजन्म मित्र वीर वामनराव जोशी यांनीं या चरित्रास प्रस्तावना लिहून दिली याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

संपूर्ण महाराष्ट्रीयांस ललामभूत व वंदनीय झालेले लोकनायक बापूजी अणे यांचा हा जीवनपरिचय महाराष्ट्रीय जनतेच्याच चरणीं आदरभावानें समर्पण करितों. इतिशम्.

**यवतमाळ,**
मंगळवार, मार्गशीर्ष शुद्ध १३
शके १८५३
तारीख २२ डिसेंबर १९३१ इ.

**सदाशिव हणमंत बल्लाळ.**

# लोकनायक बापूजी अणे.

विद्यैश्वर्या धनाढ्याश्च बहवः सन्ति भूतले ।
जनप्रेमैकविभवो दुष्प्राप्यो लोकनायकः ॥ १ ॥
विदर्भाणां महत्पुण्यैर्महाराष्ट्रस्य भाग्यतः ।
लब्ध एतादृशो नेता लोकमान्यपथानुगः ॥ २ ॥
वशीकृतजनान्तस्थो मत्तमर्दन भूषणः ।
बुध्या कृशाग्रया शत्रुच्छिद्रान्वेषणतत्परः ॥ ३ ॥
आंग्लविद्यासुनिपुण आर्याणां सुमहत्तमः ।
राजकारणनैपुण्यात्सम्प्राप्तसुमहत्पदः ॥ ४ ॥
परप्रेमास्पदं जातो मुनेर्गान्धेर्महात्मनः ।
धर्मवित्स्वार्थसन्यासी लोकसंग्रहतत्परः ॥ ५ ॥
अगाधसत्वस्य चरित्रलेखः
कथं वितन्येत मयाऽल्पबुद्धिना ॥
तथापि खे सञ्चरतेव पक्षिणा ।
कर्तव्यबुध्यैव कृतः प्रयत्नः ॥ ६ ॥
माधवो माधवं पातु विश्वेशो लोकनायकम् ।
तपसा नायकस्यास्य राष्ट्रं स्वातंत्र्यमाप्नुयात् ॥ ७ ॥

इतिशम् ।

यवतमालनगरे,
शके १८५४ मिति पौष शुद्ध
द्वादश्याम् बुधवासरे ।
२० जानेवारी १९३२

बल्लाळो पाध्यो हनुमत्सूनुः
सदाशिवशर्मा.



लोकनायक बापूजी अणे.

श्रीयुत माधव श्रीहरि

-:- उर्फ -:-

# लोकनायक बापूजी अणे

## यांचें जीवनचरित्र.

### भूमिका.

१९३० सालच्या जुलै महिन्यांत लोकनायक बापूजी अणे यांनीं सर्व हिंदुस्थानांत अपूर्व असा जंगल सत्याग्रह ऊभारून तो यशस्वी केला ह्मणून त्यांचें नांव भरतखण्डभर दुमदुमलें; पण त्यांनीं जो हा आपला कीर्तिध्वज फडकविला, तो एकाएकीं दैववशात् हातीं आलेल्या परिसाप्रमाणें भाग्याचें फळ नसून, त्यांनीं बालपणापासून आपल्या अत्यंत कुशाग्रबुद्धीचें व उत्कृष्ट राष्ट्रीय भावनांचें जें एकाच विषयावर केन्द्रीकरण केलें त्याचा परिणाम होय. सनातन धर्माची उज्वल परंपरा राखणाऱ्या वैदिक आपस्तंभ शाखेच्या ब्राह्मण कुलांत जन्म घेऊन आपल्या अनेक पिढयांच्या पुण्यशील पितरांची धर्मश्रद्धा, दृढतर निश्चय, कर्मसातत्य

इत्यादि गुणांचा परमोत्कर्ष त्यांनीं आपल्या अंगीं प्रकट केला आहे. वैदिक ब्राह्मणवर्गांत कर्माविषयींचा आग्रह ज्याला व्यवहारांत कर्मठपणा ही संज्ञा प्राप्त झालेली आहे तो शिखरास गेला असल्याचें प्रसिद्धच आहे. तो केवळ पारलौकिक विषयाचा ह्मणून प्रत्यक्ष व्यवहाराशीं संबंध नसलेला, किंबहुना त्यांत अडचणी उत्पन्न करणारा अशी आधुनिकांची समजूत झालेली आहे, पण वैदिक ब्राह्मणवर्गाचा वैदिक कर्माविषयीं असलेला आग्रह व्यावहारिक कर्माशीं संबद्ध करून प्रस्तुत चरित्रनायकानें वैदिक परंपरेची सार्थकता सिद्ध करून दाखविलेली आहे. कर्म जाणून ह्मणजे ज्ञानतः केलें पाहिजे आणि तें शास्त्रीय पद्धतीनेंच केलें पाहिजे, त्यांचें प्रत्यक्ष फल दिसो वा न दिसो, किंबहुना त्या फळाची आकांक्षा मनांत मुळींच न बाळगतां, कर्मफलाची जबाबदारी पूर्णपणें जगन्नियन्त्या विश्वचालकावर सोंपवून आपलें " शास्त्रविधानोक्त " कर्म निष्ठापूर्वक व आजन्म करीत रहावें हा आपला परमश्रेष्ठ धर्म होय असें मानून वैदिक ब्राह्मणवर्ग आजवर आपली जीवितयात्रा चालवीत आलेला आहे. भरतखंड अनेक शतकांपासून अनुकूल व प्रतिकूल अशा कालाच्या प्रवाहांत सांपडला, त्यानें कधीं भाग्याच्या शिखरावर आरोहण केलें तर तो कधीं अधोगतीच्या गर्तेत सांपडला पण सत्य व सनातन धर्माचा आश्रय करून जगताचें बौद्धिक क्षेत्रावरून चालकत्व करणाऱ्या वैदिक ब्राह्मणवर्गानें आपली कर्माग्रहाची परंपरा कधींहि त्रुटित होऊं दिली नाहीं.

## स्वार्थत्याग व स्वातंत्र्यप्रेम यांचें तत्वज्ञान

कर्माचा आग्रह हा जसा या वर्गाचा विशेष त्याप्रमाणेंच सत्यपालन करून व प्रापंचिक सुखदुःखांविषयीं स्वतः बेफिकीर राहून स्वार्थत्यागपूर्वक जगताच्या हिताकरतां झटणें हाहि या वर्गाचा असाधारण गुण आहे. भूतलावरील समस्त प्रजा सुखसंपन्न करणें, त्यांच्याकरितां गगनचुंबी प्रासाद व देवालयें बांधून देणें, इहपरलोकीं कल्याण साधून देणारी ग्रंथसंपत्ति

निर्माण करणें, आणि आपण स्वतः मात्र निष्कांचनत्वरूपी मायेबरोबर प्रपंच करणें—असला स्वार्थत्याग श्रीमद्भगवद्गीतेंत वर्णिलेले " शमोदमस्तपः शौचमद्रोहो नातिमानिता " इत्यादि गुण अंगीं असल्याशिवाय होणें शक्य नाहीं. ह्मणूनच ' स्वसुखनिरपेक्षते ' चें पथ्य बाळगून परहितार्थ झटण्याचें कंकण बांधणारांचेच प्रयत्न सफल होतात. परमेश्वरी देणगी ह्मणून जन्मतःच अंगीं असलेल्या, किंवा स्वकष्टानें कमाविलेल्या गुणांचा उपयोग मुख्यतः स्वहित साधण्याकडे मनुष्य करूं लागला, तर व्यवहारांत तो केवढाहि धन-कनकसंपन्न झाला तरी त्याला परमार्थ, समाजोत्कर्ष, किंवा देशोन्नति करणें शक्य नाहीं. केवळ स्वतःकरितां ह्मणून कांहीं करावयाचें नाहीं, जें करायचें तें जगाच्या कल्याणाकरितांच, ही वृत्ति अंगीं बाणून घेणारांनाच त्या कार्यांत यश येणें शक्य आहे. आणि हें ब्राह्मणाचें परम उच्च ध्येय आमच्या चरित्रनायकाच्या मनश्चक्षूपुढें लहानपणापासून वास करीत होतें.

याशिवाय वैदिक संस्कृतींत प्रमुखत्वानें दिसणारा गुण ह्मणजे केवळ स्वातंत्र्यप्रेम हा होय. जीव हा आपल्या कर्मानेंच बद्ध झालेला आहे, व तो यथार्थ ज्ञान प्राप्त करून निग्रहानें यथाशास्त्र कर्में करील तर मुक्त होऊं शकतो ही वैदिक धर्मांतील तत्वज्ञानाची मुख्य शिकवणूक आहे. मला दुसरा कोणीहि परतंत्र करूं शकत नाहीं, मी मात्र सर्व जग स्ववश करूं शकतों असें हें तत्वज्ञान आहे. तें अंगीं बाणलें ह्मणजे निर्भयपणा सहजच उत्पन्न होतो. कट्टा वैदिक ब्राह्मण धर्मावर अधिष्ठित झालेला असतो ह्मणून तो आपल्या कर्मनिष्ठेच्या बळावर इन्द्रचन्द्रासहि तुच्छ लेखितो, तर तो इहलोकांच्या सत्ताधिपांस काय ह्मणून भिणार ? मी स्वभावतः स्वतंत्र आहे; या माझ्या स्वातंत्र्याच्या आड प्रत्यक्ष ब्रह्मदेवहि येऊं शकत नाहीं, अशी कर्मनिष्ठाची अढळ श्रद्धा असते. अशा प्रकारचें वैदिक तत्वज्ञानाचें रहस्य असल्यामुळें, कालाच्या प्रवाहांत या समाजाची आचारपरंपरा व उज्वल स्वातंत्र्यप्रेम हीं कधीं मलिन झालीं, तरी त्यांना उजळा देणारा एखादा

अलौकिक पुरुष निर्माण करण्याचें सामर्थ्यहि त्याच परंपरेंत आहे. आणि प्रस्तुत चरित्रनायक हें त्याचें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. ते नुसते प्रवाह-पतित कर्मे करणारे नसून, एका उच्च तत्वज्ञानानें प्रेरित झालेले आहेत असें त्यांच्या चारित्र्याचें व उक्तींचें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां दिसून आल्या-शिवाय राहणार नाहीं.

## पूर्वेतिहास.

ही भूमिका लक्षांत बाळगली ह्मणजे चरित्रनायकांच्या अंगच्या गुणांचा विकास एका विशिष्ट दिशेनेंच कसा झाला हें समजण्यास सोपें जाईल व तेवढ्याकरितांच हा उपन्यास केलेला आहे. आतां चरित्रनायकां-च्या जीवनक्रमाकडे वळूं. 'अणे' हें मूळचें आन्ध्र घराणें आहे. आंध्र प्रांत हा विदर्भास लागून दक्षिणेस आहे व विद्यार्जनार्थ किंवा उदरंभरणार्थ तिकडून बरींच घराणीं विदर्भांत येऊन इकडे चिरस्थायी झालेलीं आहेत. त्यापैकींच हें एक घराणें आहे. त्यांचें मातुलकुलहि 'वेलंकीवार' या उप-नांवाचें ह्मणजे आंध्रप्रांतस्थच आहे. अणे हे यजुर्वेदीय आपस्तंभ शाखेचे गौतमगोत्र–कुलोत्पन्न असून त्यांच्या घराण्यांत वेदाध्ययन व वेदाध्यापन यांची परंपरा अव्याहतपणें अनेक पिढ्यांपासून चालत आलेली आहे. हें घराणें वणी या गांवीं चिरस्थायी झालें तरी आपल्या विद्येवर उपजीविका करण्यांकरितां त्यांना पूर्वेस नागपूरपर्यंत व पश्चिमेस उमरखेड-वाशिम-आकोट भागाकडे संचार करावा लागे. सारा जन्म वेदाध्ययनाच्याच एका मुख्य व्यवसायांत जात असल्यामुळें त्या विद्येंतील निपुणता त्यांच्या घरच्या मुलां-सहि लहानपणापासून प्राप्त होत असे, व संचाराहून घरीं परत आल्यानंतर त्यांनीं आपल्या पडशींत द्रव्य किती आणलें याची चौकशी करण्यापूर्वी, किंबहुना त्याविषयीं सामान्यतः निश्चिन्त राहून कोठें कांहीं विशेष प्रसंग घडला काय? कोठें वादविवाद झाला काय? अशी पृच्छा करण्याची घरच्या मंडळीची उत्कंठा असे, आणि एखाद्या ठिकाणीं सभेंत प्रशंसा मिळविली,

एखाद्या विद्वत्सभेमध्यें मानाची शालजोडी मिळविली, अशीं उत्तरें ऐकिलीं ह्मणजे त्यांच्या अंगावर मूठभर मांस येई ! अणे यांच्या घराण्यांतील गेल्या तीन चार पिढ्यांतील पूर्वजांच्या ह्या पराक्रमाच्या गोष्टी हाच त्या घराण्याचा इतिहास होय. त्यांच्या घरांत कनकराशी पाहिल्याचें कोणी सांगत नाहीं, पण डोळे दिपवून टाकणाऱ्या त्यांच्या विजयकथा मात्र वणी गांवांत व त्याच्या आसमंतात् राहणाऱ्या लोकांच्या तोंडीं सर्वत्र ऐकूं येतात. आज वेदविद्येला प्राप्ति किंवा प्रतिष्ठा यापैकीं एकहि उपलब्ध होत नसलें तरी अण्यांच्या घराण्यांत चाळीस वर्षांवरील पुरुषांच्या तोंडीं आज जी वेदविद्या आहे ती सभोंवतालच्या शेपन्नास कोसांत आढळणार नाहीं असें हें श्रेष्ठ प्रतींचें विद्याधन घराणें आहे.

## चरित्रनायकांचे तीर्थरूप ‘ भाऊजी ’

चरित्रनायकांचे वडील श्रीहरिभटजी उर्फ भाऊजी अणे हे पट्टीचे वैदिक ब्राह्मण ह्मणून प्रसिद्ध होते. त्यांनीं लांबच्या प्रदेशांत जाऊन आपल्या बुद्धिमत्तेचा लौकिक पसरविला, व मोठमोठ्या विद्वत्सभांतून व यज्ञयागांतून मोठमोठ्या मानाच्या दक्षिणा संपादन केल्या. त्यांची बुद्धि इतकी कुशाग्र होती कीं गुरुगृहीं वेदाध्ययन करून पोथीची गांठ बांधल्यानंतर त्यांनीं यावज्जन्म ती पुनः कधीं सोडली नाहीं ! पण मौज अशी कीं अजिंक्यपत्रें मिळवीत आलेल्या वेदपाठकाची चूक निघतांच ती त्याला दाखविल्याशिवाय ते कधीं राहिले नाहींत. हा तर त्यांचा बाणाच होता. गृहकृत्यांतून फुरसत मिळाली कीं भाऊजींच्या वेदाच्या आवृत्ति चालायच्या व हा क्रम त्यांनीं आपल्या अंतापर्यंत चालू ठेविला होता. भाऊजींच्या पूर्वपुण्याईमुळें चरित्रनायकांची बी. ए; बी. एल्. ची परीक्षा उत्तीर्ण होऊन ते यवतमाळास वकिली करून घरांत धनराशी आणूं लागले होते, पण वेद हीच मुख्य संपत्ति मानणाऱ्या या वैदिक ब्राह्मणाचे डोळे तिनें मुळींच दिपले नाहींत; उलट, त्यांच्याच समक्ष १९०९ सालीं चरित्रनाय-

कांच्या वकिलीची सनद तहकूब ( सस्पेन्ड ) करण्यांत आली तेव्हां त्यांच्या तोंडून उद्गार निघाले कीं " सरकार फार तर आपली सनद घेईल, पण ज्या बुद्धिबलाच्या भरंवशावर असल्या छपन्न सनदा मिळवूं शकूं त्यावर तर ते आपला ताबा चालवूं शकत नाहीं ! " सनद गेल्यानंतर वकिली बंद पडून पूर्ववत् गरीबीचा प्रपंच चालवितांना भाऊजींची खऱ्या ब्राह्मणास शोभण्यासारखी हर्षविषादरहित शान्तवृत्ति दिसली ती अत्यंत अवर्णनीय होती. घरांत धनाचे ढीग आले तरी त्यांनीं ते कधीं हारखले नाहींत व तो प्रवाह कांहीं दिवस आटला तेव्हां त्यांना हायसें झालें नाहीं. भाऊजींच्या पत्नी ह्मणजे चरित्रनायकांच्या मातुःश्री " बहिणाबाई " ह्या अत्यंत साध्या, शान्त उदार व दिलदार स्वभावाच्या होत्या. त्यांना अभिमान, क्रोध व आपपरभाव माहीत नव्हता म्हटलें तरी चालेल. घरांत लेकीसुना आल्या तरी मुलाबाळांचे व आल्यागेल्याचे कष्ट करण्यांत, तसाच देवपूजा करण्यांत त्यांना पराकाष्ठेचा आनंद वाटे. अशा ह्या सच्छील मातापितरांच्या पोटीं चरित्रनायक माधवरावजी उर्फ लोकनायक बापूजी अणे यांचा जन्म यवतमाळ जिल्ह्यांत वणी या गांवीं श्रावण वद्य ९ शके १८०२ ह्मणजे २९ ऑगस्ट सन १८८० या दिवशीं झाला. लक्ष्मणराव उर्फ आन्याजी हे वरील पुण्यशील दांपत्याचें प्रथम अपत्य असून चरित्रनायक हे दुसरे होत. त्यांच्या पाठीवर त्या दांपत्यास यादव व बालाजी असे आणखी दोन पुत्र झाले; पैकीं यादवराव हे कलकत्ता नॅशनल मेडिकल कॉलेजांत एल. सी. पी. एस्. पास होऊन वणी येथेंच डॉक्टरकीचा धंदा करीत आहेत, आणि बालाजी हे मॉरिस कॉलेजांत इंटरमीजिएटमध्यें शिकत असतां अकालीं मृत्युमुखीं पडले.

## बालपण.

चरित्रनायकांचा जन्म वणी येथें झाला व तेथेंच त्यांचें मराठीचें शिक्षण झालें. बालपणापासून ते बुद्धिमान ह्मणून प्रसिद्ध होते. पण धाडसाचे

खेळ खेळण्यांत त्यांचें प्राविण्य विशेषेंकरून दिसून येई. त्याकाळीं आज-च्यासारखे लाठीकाठा शिकवावयाचे आखाडे वऱ्हाडांत फारसे नसत, पण आखाडे नव्हते ह्मणजे शरीरबल कमाविण्याची हौस व साधनें नव्हतीं असें नाहीं. आट्यापाट्या, खोखो, हुतूतू असे साधे गांवठी खेळ त्यावेळीं प्रचारांत असत. वणीस ‘ गुद्दलेंपडी ’ नांवाचा एक अद्‌भूत खेळ आहे व तो वर्षांतून एकदां फक्त फाल्गुन महिन्यांतच चांदण्या रात्रीं खेळण्याची वहिवाट आहे. दोन्हीकडे दोन खांब गाडून त्याला मध्यें खूप जाडीचा एक दोर —“ नाडा ”—बांधायचा, आणि त्याच्या दोन बाजूस दोन प्रतिपक्षांकडील गडी उभे रहावयाचे. एका बाजूच्या दहावीस गड्यांनीं नाडा धरून ठेवायचा, व प्रतिपक्षीयांनीं त्याजवर हल्ले करून तो त्यांच्या हातांतून सोडवून स्वतः धरावयाचा; प्रतिपक्षाच्या एकाहि गड्याचा हात त्याजवर असूं देतां कामा नये, एवढें झालें कीं खेळ संपला. नाडा सोडवितांना प्रतिपक्षास छातींत, पाठीवर, बरगडींत, चाळ्यांवर हवा तेवढा जोराचा गुद्दा मारून त्यास हतबल करावयाचें असा हा विलक्षण खेळ आहे. वणी येथील धनिक वर्ग, रंगारी, भजनी मंडळी, वैदिक ब्राह्मण, इजारदार, जहागीरदार इत्यादि सर्व जातींचे व सर्व दर्जाचे लोक उच्च नीच भाव मनांत न बाळगतां त्यांत भाग घेत असतात, आणि खेळाच्या वेळीं सर्वांस एवढी विलक्षण ईर्षा चढत असली तरी खेळ संपल्यानंतर ती असूया किंवा सूड या भावनेंत कधींहि परिणत होत नाहीं असा मर्दानी बाणा ( Warlike Spirit ) त्यांत आहे. चरित्रनायकांना या खेळाची फार आवड असे, व पदवीधर होऊन गेल्यानंतरहि ते जर फाल्गुन महिन्यांत वणीस असले तर या खेळांत एखादी तरी “ हुल्लड ” मारून आल्याशिवाय त्यांना रहावत नसे. त्यांचा हा क्रम वकील होईपर्यंत चालला होता. हल्लींच्या आखाड्यांच्या काळांत, व संभावितीच्या नवीन कल्पनामुळें या मर्दानी खेळास अंमळ ‘ रानटीपणाचें ’(?) स्वरूप आल्यानें त्याला पूर्वींसारखें महत्व राहिलें नाहीं. असो.

गुद्दलपेंडीची गोडी चरित्रनायकांस विशेष जडली होती तिला एक अनन्यसाधारण कारण होतें, व तें त्यांच्या संवगड्यांस व गांवांतील खेळाडूंस क्वचितच माहित असेल. इतर लोक तो खेळ केवळ वहिवाट ह्मणून खेळत, पण चरित्रनायक त्याकडे कांहीं एका विशिष्ट दृष्टीनें पाहत. ते मराठी चौथ्या इयत्तेंत शिवाजी महाराजांचा इतिहास शिकले. शिवाजी महाराजांनीं बालपणींच स्वातंत्र्याचा उद्योग कसा आरंभिला, धर्मविध्वंसक सत्तेविरुद्ध बंडाचें निशाण कसें उभारलें, आपले जंगली व दुबळे समजले गेलेले लोक एकत्र करून अवाढव्य बलानें युक्त अशा मुसलमानी सत्तेचा पाडाव कसा केला, आणि ही महाराष्ट्रभूमि स्वधर्माचें साम्राज्य नांदण्यास कशी समर्थ केली इत्यादि गोष्टींचा त्यांच्या मनावर फारच खोल व चिरस्थायी असा परिणाम झाला. पुढें जसजसा वरील वर्गांत प्रवेश झाला तसतसे इतिहासाचें व चरित्रग्रंथांचें अध्ययन ते गोडीनें करूं लागले, आणि शिवाजी महाराजांवरील प्रेम व स्वातंत्र्य संपादन करण्याची महत्वाकांक्षा यांचा त्यांच्या मनांत ज्यास्त जोरानें उदय होऊं लागला. आजच्या स्वातंत्र्ययुद्धांत सेनानायकाचें काम करणाऱ्या या योध्याची मनोभूमिका अशा प्रकारची बालपणापासून बनत आली आहे. शिवाजीनीं स्वातंत्र्य संपादन केलें याला कारण त्यांचें स्वधर्मावरील व स्वदेशावरील अलोट प्रेम हें तर खरेंच, पण बुद्धिबलाचा व शारीरिक शक्तीचा अभाव त्यांच्या ठायीं असता तर त्यांना मनांतले मांडे मनांतच खावे लागले असते. ह्मणून त्यांनीं जसे बालपणींच आपले संवगडी खेळांत प्रविण केले व या लोकसंग्रहाच्या बळावर आपल्या भावी विजयमंदिराचा चबुतरा बांधला, तसेंच आपण आपल्या सहवासांतले तरुण शक्तिसंपन्न करावेत, आणि त्यांच्या ठिकाणीं परकीय सत्तेचें उच्चाटन करण्याची राष्ट्रीय महत्वाकांक्षा जागृत करावी या विचारांचा अंकुर चरित्रनायकांच्या अंगीं विद्यार्थीदशेपासूनच वास करीत होता. त्यांनीं गांवांतील तरुणांस व आपल्या संवगड्यांस शक्तिसंपन्न बनविणाऱ्या या खेळांत पटाईत करून त्यांस स्वातं-

त्याच्या प्रेमानें व स्वतःच्या जादूनेंहि भारून टाकलें याच्या मुळाशीं त्यांची हीच कल्पना वास्तव्य करीत होती.

## तितिक्षा.

माधवरावजींची शरीरयष्टि ठेंगू आहे. "वामन मूर्ति पण अद्‌भूत कीर्ति!" असे त्यांच्या संबंधाचे उद्गार लोकमान्य टिळकांनीं एका जाहीर व्याख्यानांत विनोदानें काढल्याचें प्रसिद्धच आहे! पण ठेंगू व कृश असून ते हाडापेरानें मजबूत आणि साधारणतः निरोगी आहेत. नाहीं ह्मणावयास त्यांना पोटशूळाची व्यथा विद्यार्थीदशेंत अखेर अखेर जडली, व ती अजूनहि अल्प प्रमाणांत आहे. पण भयंकर पोटशूळ असतांहि त्यांनीं आपले नित्य व्यवहार कधींहि थांबवून धरले नाहींत. शरीरास होणारी व्यथा शक्य तोंपर्यंत दुसऱ्यास दिसूं देऊं नये, घरच्या माणसाच्यादेखील उघडकीस येऊं देऊं नये याबद्दल ते पराकाष्ठेची काळजी घेतात. जन्मतः समजा, अनुवंशिक समजा, शिक्षणाचे संस्कार ह्मणा किंवा मनांत ठाणें धरून बसलेल्या अत्युच्च विचारांचा परिणाम माना, शारीरिक व मानसिक सुखदुःखें सोसण्याची "तितिक्षा" त्यांच्या ठायीं विलक्षणपणें वास करीत आहे. "पोटांत दुखतें तर त्याला औषध पाजावें, फार तर त्याच्या पचनक्रियेवर ताण पडूं नये ह्मणून त्याला फारसें अन्न पोहोचूं देऊं नये, एवढें केलें ह्मणजे आपलें कर्तव्य संपलें; यापेक्षां ज्यास्त त्याकडे लक्ष देऊन विव्हळत बसल्यानें तें थोडेंच थांबतें! त्याला त्याचें काम करूं द्यावें, आपण आपलें काम करावें," अशा प्रकारचे उद्गार त्यांनीं ऐन पोटदुखीच्या भरांत विनोदानें काढले असल्याचें कित्येकांस स्मरतें!

## कर्मनिष्ठा.

विद्यार्थीदशेचीं पहिलीं सात वर्षें मातापितरांच्या सहवासांत वणीस गेलीं. त्या काळांत त्यांची पुष्कळशी ऋक्संहिता होऊन त्यांना याज्ञिकीचेंहि

शिक्षण मिळालें होतें. स्वस्ति–वाचन, मखशान्ति, श्रावणी, उपनयन, विवाह इत्यादि व्यवहारोपयोगी प्रयोग त्यांचे या कालांत होऊन गेले होते. कड-कडीत सोंवळेंओंवळें व जुन्या परंपरेचा धार्मिक आचार असल्यामुळें स्नान, द्विकालसंध्या, ब्रह्मयज्ञ, जप इत्यादि नित्यकर्में बालपणापासूनच त्यांच्या अंगवळणीं पडलीं; आणि आज अनेक प्रकारचे व्याप व राष्ट्रीय चळवळी यांच्या पुढारीपणाची माळ त्यांच्या गळयांत पडलेली असली तरी त्यांनीं आपल्या नित्यकर्मांत कधींहि खंड पडूं दिला नाहीं. अमृतसर कॉंग्रेसच्या वेळीं वऱ्हाडचे पुढारी ह्मणून, व लोकमान्यांचे पट्टशिष्य आणि बुद्धिमान् सल्लागार या नात्यानें त्यांना विषयनियामक मंडळांत व कॉंग्रेसच्या अधिवेशनांत इतका वेळ घालवावा लागे कीं सकाळीं प्रात:संध्या आटोपून ते आपल्या कामास गेले कीं रात्रीं कधीं १० ला, तर कधीं १ वाजल्यानंतर ते आपल्या निवासस्थानीं परत येत ! हॉटेलांत जाऊन फराळ करण्याचा ‘डाग’ त्यांना नव्हता, ह्मणून मधल्या वेळांत जेवणाचें काम फार तर दुधावर किंवा खडीसाखर बेदाण्या-वर निभवावें लागे ! आपल्या तितिक्षाबळावर सारा दिवसभर काम करून रात्रीं परत गेल्यानंतर थंडी ह्मणते मी, निवासस्थानचे स्नेही कडक थंडीमुळें अंगावर ब्लँकेट घेऊन पहुडलेले, अशा वेळीं माधवरावजींनीं अंगावरील सर्व कपडे काढून बर्फासारख्या गार पाण्यानें हातपाय धुवून एक कद नेसावा व तोच अर्धा अंगावर लपेटून संध्या करावी ! आणि त्यानंतर गार झालेल्या अन्नाचे चार घास पोटांत घालत घालत लो. टिळक व म. गांधी यांचीं बोलणीं कशीं काय चाललीं आहेत, श्रीमती बेझण्ट व श्री. पाल यांचें ह्मणणें काय, मुसलमानांचा समाज कॉंग्रेसला कसा अनुकूल झाला आहे, सुधार-णांचा ठराव टिळकांच्या मतानुसार पास होण्याचा संभव कसा आहे, इत्यादि गोष्टी त्यांनीं समजावून सांगाव्यात ! नित्यकर्माचा आग्रह हा जो त्यांच्या चरित्राचा एक विशेष त्याचा पाया त्यांच्या बालपणीं मातापितरांच्या शिक्षणानेंच घातला गेला आहे.

सं.च. ८८३



## सत्याग्रही स्वभाव.

वणीचें शिक्षण पुरें झाल्यानंतर पुढील शिक्षणाकरितां ते जवळच असलेलें चंद्रपूर उर्फ चांदा येथें गेले. तेथें त्यांची मिडलची परीक्षा पास झाली. यावेळीं चांद्यास केशवराव बक्षी नांवाचे त्यांचे शिक्षक होते. ते स्वभावानें ममताळू आणि इंग्रजी शिकविण्यांत फारच निष्णात होते. त्यांच्या शिक्षणपद्धतीची कृतज्ञतापूर्वक आठवण बापूजी अजूनहि काढीत असतात. चांद्यानंतर हायस्कूलच्या शिक्षणास्तव ते नागपूरास गेले व नील सिटीस्कूल-मध्यें दाखल झाले. या हायस्कूलांत शिक्षण घेऊन ते १८९८ मध्यें मॅट्रि-क्युलेशनची परीक्षा उत्तीर्ण झाले. घरांत प्राचीन वैदिक पद्धतीचा कडकडीत शुचिर्भूतपणा, गांवांत वैदिक ब्राह्मणांची प्रतिष्ठा, आणि विदर्भ संतशिरोमणि साधुवर्य आप्पाजी महाराज डुमे यांच्या सान्निध्यांत सहवास यांचा बाल माध-वाच्या कोमल मनावर इतका विलक्षण परिणाम झाला कीं आधुनिक काळच्या विद्यार्थ्यांत प्रचलित असलेल्या व्यसनांकडे तो तिरस्कारानें पाही. 'हा पहा जुन्या चालीचा गबाळ ब्राह्मण' असें ह्मणून बरेच विद्यार्थी त्याजकडे अंगुलीनिर्देश करीत! लोकनायकांच्या तोंडून अनेकांनीं ऐकलेलीच गोष्ट येथें देतों; ती वाचली ह्मणजे बालपणांतच त्यांचा निग्रहीपणा व सत्याचा आग्रह केवढा पराकाष्ठेस गेलेला होता तें दिसून येईल. ती गोष्ट अशी:—

एकदां कांहीं विद्यार्थ्यांनीं जमून घाट घातला कीं "माधवा" फार सोंवळेपणाचा टेंभा मिरवतो, आज त्याला एकट्याला गांठून विडी प्यायला लावायची. संकेताप्रमाणें 'माधवा' त्यांच्या गोटांत जातांच त्यांनीं विडी ओढून पाहण्याविषयीं माधवास फार आग्रह केला; पण हे राजश्री आपल्या ठिकाणीं पक्के, ते थोडेच दाद द्यायला लागले! अखेरीस त्यांनीं दंगामस्ती करून त्याला खालीं पाडून त्याच्या तोंडांत विडी कोंबली! यावेळीं या निग्रही वीरानें बाणेदारपणानें ह्मटलें कीं तुह्मी फार तर माझ्या तोंडांत विडी कोंबाल, पण तिचा धूर ओढणें हें तर माझ्या स्वाधीन आहेना!

तें तुह्मी बलाधिक्यानें कसें करूं शकाल ? हा गडी कांहीं केल्या बधत नाहीं, उलटपक्षीं हा आपला प्रकार शिक्षकांस व वडील माणसांस सांगेल तर भलतेंच कांहीं व्हायचें, या विचारानें त्यांच्या दोस्तांनीं आपला आग्रह सोडला. या बालवीरानें आपल्या विद्यार्थीदशेंतच सत्याग्रहाची ही चुणूक दाखविली !

## मॉरिस कॉलेजांत असतांना.

मॅट्रिक्युलेशनची परिक्षा पास झाल्यानंतर माधवरावजी उच्च शिक्षण घेण्याकरितां नागपूरच्या मॉरिस कॉलेजांत गेले. तेथें ते जागोबा तात्याजी वणीकर नांवाच्या एका नामांकित वैद्याच्या घरीं रहात असत. नागपूर शहर नुकत्याच अस्तंगत झालेल्या भोंसलेशाहीच्या राजधानीचें शहर. तेथें आधुनिक विद्या व कला यांची अभिवृद्धि होऊं लागली होती, तरी प्राचीन विद्या व प्राचीन कला या अजूनही शुद्ध स्वरूपांत तेथें बऱ्याच प्रमाणानें वसत होत्या. जुन्या पद्धतीनें विद्वताप्रचुर पुराणें सांगणारे नामांकित पुराणिक, न्यायमुक्तावलि, सिद्धान्तकौमुदीसारख्या ग्रंथांचे पाठ देणारे अगाध विद्यासागर पण्डित, शास्त्रीय पद्धतीनें राग आळविणारे मधुर कण्ठाचे विख्यात गवई, सतार–तबला–मृदंगादि वाद्यांचे ‘ गोजे ’–असले प्राचीन संस्कृतीचे अवशेष त्या शहरीं विपुल असत. माधवरावजींची बुद्धि चौकस, तशीच चतुरस्त्र असल्यामुळें चांगलें पुराण, गोपाळजी हरिदासासारख्यांचें विद्वत्तामय आणि नवरसांनीं व बहुविध अलंकारांनीं ओथंबलेलें कीर्तन, किर्लोस्कर संगीत मंडळीमधील भाऊराव कोल्हटकरांसारख्या अद्वितीय गायकासहि कण्ठसौष्ठव आणि संगीतप्राविण्य यांत मान खालीं घालावयास लावणारे बापूजी जोशी यांचें गाणें–असले प्रसंग त्यांनीं फारसे टाळले नाहींत. त्यायोगें त्यांनीं विविध विषयांचें खोल ज्ञान संपादन केलें, व प्राचीन संस्कृतीविषयींचा त्यांचा अभिमान ज्यास्त दृढ होत गेला. घरीं किंवा वणीस ज्या वातावरणांत रहावयाचें, व जे विचार मनांत बिंबवायचे त्यांचें परिपोषण

अशा रीतीने येथें होऊं लागलें. याबरोबरच त्यांचा आधुनिक ग्रंथांचा व्यासंग सुरू असे. चांदा येथें असतांना त्यांना वाचनाची जी गोडी लागली ती नागपूरसारख्या शहरीं वाढीसच लागली.

## संस्कृत भाषेचा गहन अभ्यास.

वैदिक ब्राह्मणाच्या जिव्हाग्रीं संस्कृत भाषा बालपणापासूनच वसत असते. तिचा त्यांनीं हायस्कुलांत व तदनंतर मॉरिस कॉलेजांत अभ्यास सुरू ठेविला होता. पण शाळेंतल्या वरवरच्या शिक्षणानें या विद्यार्थ्याची तुष्टि न झाल्यानें त्यानें तिचा खाजगी रीतीनें फुरसतीच्या वेळीं विशेष-परिश्रम करून अभ्यास केला. अखिल हिंदुस्थानांत वैय्याकरणकेसरी ह्मणून ज्यांचा यशोदुंदुभि गाजत होता, व ज्यांना सरकारनें शेवटीं शेवटीं ‘ महा-महोपाध्याय ’ या पदवीनें अलंकृत केले होतें त्या परम बुद्धिसंपन्न श्री. भटजीशास्त्री घाटे यांच्याजवळ ते कांहीं दिवस संस्कृत शिकावयास जात; पण त्यांजपेक्षां जास्त सहवास त्यांचे प्रिन्सिपाल—आतां झालेले ‘ महामहोपा-ध्याय—श्री. केशवरावजी ताह्मन यांच्याशीं झाला. चरित्रनायकांनीं यांच्याजवळ खाजगी रीतीनें कॉलेजांतलि संकृत पुस्तकें व इतर विविध ग्रंथ आणि कौमुदीसारख्या गहन विषयांचें रहस्य समजावून घेतलें. केशवरावजी हे स्वतः चांद्याचे राहणारे, आणि हा अत्यंत बुद्धिमान् आचारसंपन्न व होतकरू विद्यार्थी चांद्याच्या शाळेंतून आलेला .या दोन्ही कारणांमुळें त्यांचें चरित्रनायकावर फार प्रेम बसलें होतें, व ते आज घटके-सही वृद्धिंगतच होत आहे. वर्गांत इंग्रजी वाक्यांचें संकृतमध्यें भाषांतर करण्यास शिकवितांना केशवरावजी तीं वाक्यें श्लोकरूपानेंहि करवून घेत. यामुळें त्यांच्या वर्गांतील विद्यार्थ्यांची बुद्धि जास्तच तीव्र होई. केशवराव-जींच्या हातून आजवर दोन चार हजार विद्यार्थी शाळेंत व घरून संस्कृत शिकून गेले असतील, पण त्यांपैकीं पांच हुषार विद्यार्थ्यांचीं नांवें विचारलीं तर त्यांत ते माधवरावजी अणे यांची गणना केल्याशिवाय रहाणार नाहींत!

संस्कृत भाषेचें तसेंच त्या भाषेतील मूळ ग्रंथांचे त्यांचें अध्ययन इतकें खोल व मूलगामी झालेलें आहे कीं एकदां या जाणिवेचा उद्गार त्यांच्या तोंडून लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें सारडा बिलावर भाषण करतांना निघाल्याशिवाय राहिला नाहीं. बारा वर्षांच्या आंतील कन्येचा विवाह केल्यास तें लग्न गैर–कायदा व " रद्द " ठरेल या मुद्याच्या समर्थनार्थ अनेक समाजसुधारक सभासदांनीं भाषणें केल्यावर या लग्नाच्या " रद्दपणा " ची उपहास्यता धर्मग्रंथांच्या आधारांनीं दाखवितांना त्यांनीं विवाह हा इतर धर्मांयाप्रमाणें एक पुरुष एक स्त्री यांजमधला एक " करार " नसून तो एक यावज्जन्म टिकणारा संस्कार कसा आहे व त्याची पवित्रता प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाहि कशी नष्ट करतां येणार नाहीं, या मुद्यांवर जोर देऊन या रद्दपणाच्या समर्थनार्थ भाषणें करणाऱ्या सभासदांस उद्देशून असे उद्गार काढले कीं " कोणास एथला एक शब्द व तेथलें एक वाक्य यांचे केवढेहि आधार दाखवितां येतील, पण ज्यांचें धर्मग्रंथांचें ज्ञान ह्या मूळ पुस्तकांच्या इंग्रजींत भाषान्तर केलेल्या ग्रंथांवरून झालेलें आहे त्यांच्या जवळून मी त्या ग्रंथांचे सिद्धान्त किंवा आशय ग्रहण करण्यास सिद्ध नाहीं ! " मूळ संस्कृतमधील धर्मग्रंथांचें आकंठ पान करणाऱ्या अभ्यासकाच्या तोंडून असले उद्गार निघाले यांत त्यांच्या गाढ अध्ययनाचें, संस्कृतीच्या अभिमानाचें व खंबीर आत्मविश्वासाचेंच प्रतिबिंब पडलें आहे यांत शंका नाहीं ! आपला धर्म, त्यांतील तत्वज्ञानाच्या उत्तुंग कल्पना, आपला वेदप्रणीत कर्ममार्ग, इत्यादिकांनीं चरित्रनायकाची मनोभूमिका विद्यार्थीदशेपासून इतकी व्याप्त झालेली आहे कीं उठतां, बसतां, बोलतां, सभेंत भाषण करतां त्यांच्या तोंडून उपमा, दृष्टांत, रुपकें जीं निघतात तीं आर्य धर्मांतलि आचारास धरून निघतात. नुकतेंच बापूजी वाङ्मयमंडळाच्या विद्यमानें लोकनायकांचे लेख व भाषणें यांचें जें बहुमूल्य पुस्तक प्रसिद्ध-झाललें आहे, त्यांतील कोणतेंहि पत्र उलटून पहा, वैदिक ब्राह्मण, यज्ञ,

यूप, गुरुशिष्य संबंध, देवता, हविर्भाग, इष्टि, अवभृथस्नान इत्यादिकांचा दाखला सांपडल्याशिवाय राहणार नाहीं, इतकें स्वसंस्कृतीचें प्रेम त्यांच्या ठिकाणीं रोमरोमीं भरलेलें आहे ! आज अखिल भारतखंडांत राजकीय क्षेत्रामध्यें कार्य करणाऱ्या पुढाऱ्यांत लोकनाकांच्या बरोबरीनें संस्कृत ग्रंथांचा खोल अभ्यास केलेला, व त्यांतील तत्वज्ञानाचें व आचाराचें रहस्य जाणून तें अंगीं बाणलेला असा आर्यधर्माचा खराखुरा प्रतिनिधि व पुढारी वयोवृद्ध पण्डित मदनमोहन मालवीय यांच्या सारखा विरळाच !

## धार्मिक व राजकीय आदर्श.

कॉलेजांतील संस्कृत ग्रंथांचें अध्ययन व नागपूरच्या सिटी लायब्ररीमधील तत्वज्ञान, इतिहास, काव्य, साहित्य व चरित्रग्रंथांचें आलोडन सुरू असतांनाच सुटींत माधवरावजी वणीस गेले कीं तेथें वैदिकीचे प्रयोग व संहिता-क्रम इत्यादिकांचें त्यांचें अध्ययन सुरू असे. प्राचीन संस्कृति व तत्वज्ञान यांजवरील त्यांचें प्रेम वाढण्यास आणखी दोन प्रबल कारणें आहेत. हीं दोन कारणें ह्मणण्यापेक्षां हे दोन ध्येयभूत आदर्श यांचा माधवरावजींच्या मनावर विद्यार्थीदशेपासून इतका खोल परिणाम झालेला आहे कीं साधुवर्य तुकाराम महाराजांनीं ह्मटल्याप्रमाणें "पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं, जागृति स्वप्नीं पांडुरंग !" अशी या ध्येयांसंबंधानें त्यांची तन्मयता होऊन गेली आहे व ती त्यांच्या आयुःक्रमांत पदोपदीं प्रत्यय आणून दिल्याशिवाय राहत नाहीं. हीं दोन ध्येयें ह्मणजे परमार्थविषयक प्राप्तव्याच्या बाबतींत वणीचे साधुवर्य आप्पाजीमहाराज डुमे, आणि गीतेंत प्रतिपादिलेला कर्मयोग अंगीं बाणून निरासक्त मनोवृत्तीनें व्यावहारिक कर्मे स्वतः करणारे व जगास करावयास लावणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हीं होत. आप्पाजी महाराजांची अहोरात्र ईश्वरैकपरायण वृत्ति, त्यांची अप्रतिहत उपासना, त्यांचें प्रेमळ भजन व अन्तर्बाह्य शुचिर्भूतपणा इत्यादिकांविषयीं पराकाष्ठेचा आदर माधवरावजींच्या मनांत लहानपणापासून वसत आहे, व प्रसंगोपात्त तो

त्यांच्या मुखावाटे बाहेर पडल्याशिवाय राहत नाहीं. लोकमान्य टिळकांना त्यांनीं विद्यार्थीदशेपासूनच आपल्या गुरुस्थानीं मानिलें आहे. १८९७ सालीं टिळकांवर राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना शिक्षा झाली तेव्हांपासून केसरीपत्राचा खप व त्यांचें आदरयुक्त वाचन फार वाढलें. टिळकांच्या मनांत मूळ कल्पना कोणत्या होत्या, त्या मूर्त स्वरूपांत आणण्याकरितां लोकांच्या आत्मीयत्वाची भावना व जागृति ते कशी उत्पन्न करीत होते, आणि हें करतांना सरकार त्यांना कसें छळत आहे याचा त्यांच्या मनावर फार परिणाम झाला होता, व अखिल महाराष्ट्रांत त्यांच्या एवढा दिव्य विचारांचा व तेजःसंपन्न असा दुसरा पुढारी कोणी नाहीं, असें याच वेळीं माधवरावजींच्या मनानें घेतलें होतें.

## नागपुरांत टिळकांस निमंत्रण.

लोकमान्यांनीं आपली शिक्षा संपवून परत आल्यानंतर पुनः पूर्ववत् जोमानें केसरीच्या द्वारें ' पुनश्च हरिः ॐ ' असा एका अग्रलेखास मथळा देऊन आपल्या स्वाध्यायास सुरुवात केली, तेव्हां आपल्या शहरीं आणून त्यांचा आदर करावा अशी कॉलेजमधील विद्यार्थ्यांत कल्पना निघाली. ती सिद्धीस नेणाऱ्यांत माधवरावजी हे अग्रगण्यांपैकीं एक होते. त्यावेळीं नागपूरच्या मॉरिस कॉलेजमध्यें विद्यार्थ्यांची एक वक्तृत्वोत्तेजक सभा ( डिबेटिंग सोसायटी ) होती. अंगची विद्वता, वक्तृत्व, चतुरस्रत्व आणि विशेषतः चळवळेपणा यामुळें या संस्थेच्या चालकांत ते होते. टिळकांना बोलाविलें पाहिजे असें तोंडानें बोलूं लागले होते त्यांपैकींच एक व्यक्ति परिस्थिति–भेदामुळें आतां या गोष्टीस प्रतिबंध करूं लागली. टिळकांची योग्यता केवढी दांडगी, आणि आपलें शहर किती मागसलेलें! त्यांच्या योग्यतेनुसार त्यांचें स्वागत झालें तर बरें, पण उलट लोकांचा त्यांजविषयीं अनादर किंवा बेफिकिरी दिसून आली तर आपण त्यांची एक प्रकारें अप्रतिष्ठा केल्यासारखें होईल. यापेक्षां तूर्त त्यांना न बोलाविलेलें

बरें, असा युक्तिवाद हे गृहस्थ करूं लागले! पण काय होईल तें पाहून घेऊं, त्यांना येथें उतरवून घेतलेंच पाहिजे असा निश्चय करून माधवरावजी-प्रभृति विद्यार्थ्यांनीं टिळकांना, ते कलकत्ता कॉंग्रेस आटोपून पुण्यास परत जात असतांना, नागपुरास उतरवून घेतलें. त्यांचा योग्य तो आदरसत्कार झाला व त्यांचीं भगवद्गीतेवर व्याख्यानेंहि झालीं. टिळकांचें स्वागत करतांना प्रास्ताविक भाषण करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांचे पुढारी ह्मणून माधवरावजी यांजवर पडली होती, व ती त्यांनीं योग्य रीतीनें पाडली हें सांगणें नकोच. टिळकांच्याहि मनावर या विद्यार्थ्यांच्या अंगच्या विद्वत्तेचा, बुद्धिमत्तेचा व विशेषत: 'चळवळ्ये' पणाचा असा परिणाम झाला कीं, हा नागपुरचा विद्यार्थी आपल्या केसरीच्या संपादकमंडळांत येईल तर बरें, असे उद्गार त्यांनीं काढल्याचें चरित्रनायकांच्या स्नेहीसोबत्यास माहीत आहे. या विद्यार्थ्यांचा खोल विद्याव्यासंग, पायाशुद्ध कल्पनाशक्ति, परिणामकारक वक्तृत्व, विद्यार्थ्यांवरील छाप, व या सर्वांतून चमकणारी देशभक्तीची तळमळ यांनीं लोकमान्यांचें चित्त आकर्षित केलें होतें. ज्या ध्येयभूत राजकीय गुरूंचे शब्द त्यांच्या केसरी पत्रांतून माधवरावजी आजवर वाचीत आले त्यांचें प्रत्यक्ष दर्शन व थोडासा सहवास होण्याची संधि आली तेव्हां त्यांजविषयींचा त्यांच्या मनांतील आदर दृढमूल व बहुगुणित झाला. वरील प्रसंग ह्मणजे चरित्रनायकांच्या राजकीय कार्यप्रवाहाचें गंगाद्वार ह्मणावयास हरकत नाहीं. असो.

## वाचनाचा व्यासंग

कॉलेजांत असतांना परीक्षा पास होऊन बक्षिसें व शिष्यवृत्त्या पटकावाव्यात ही महत्वाकांक्षा माधवरावजींच्या मनांत वास करीत नव्हती व ह्मणून अगदीं पहिल्या वर्गांत त्यांचें नांव आलें नाहीं, उलट वाचनाच्या नादापायीं ते एक दोनदां नापासहि झाले. कॉलेजमधील पुस्तकांचा अभ्यास त्यांनीं संथपणें करावा, पण इतर पुस्तकांचें त्यांचें वाचन फार दांडगें होतें.

या काळांत त्यांनीं मराठींतील काव्यग्रंथ, बखरी, इतिहास व चरित्रग्रंथ फार काळजीपूर्वक वाचले, आणि तत्वज्ञान हा त्यांचा एक विषयच असल्यामुळें या विषयाचा त्यांनीं तौलनिक पद्धतीनें अभ्यास केला. त्यांनीं कादंबऱ्या फारशा कधींच वाचल्या नाहींत. १९०२ सालीं ते बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. कॉलेजमधील विद्यार्थीदशेच्या काळांत त्यांनी बुद्धिमान् ह्मणून नागपुरास चांगला लौकिक कमावला होता, व वक्ते ह्मणून ते प्रसिद्धीस आले होते. त्या वेळचे कर्तबगार पुढारी बिपिनकृष्ण बोस, गंगाधरराव चिटणवीस, बापूरावदादा किनखेडे, प्रिन्सिपाल केशवरावजी ताह्मन, नील सिटीस्कूलचे हेडमास्तर केशवरावजी जोशी इत्यादिकांचें चित्त त्यांनीं वेधून घेतलें होतें.

कॉलेजच्या सुरुवातीसच १८९८ सालीं त्यांचा विवाह झाला. बालाघाट जिल्ह्यांतील खजरी या गांवचे बुचरकुंडे या उपनांवाचे वेदमूर्ति शिवराम भटजी यांनीं आपली एकुलती एक कन्या त्यांस अर्पण केली होती. तिचें नामाभिधान यमुनाबाई असें ठेवण्यांत आलें होतें. यमुनाबाई आजच्या तऱ्हेनें शिक्षण घेतलेल्या नव्हत्या, पण स्वभावानें अत्यंत मानी व तेजस्वी, बुद्धीनें तीव्र, अन्तःकरणानें फारच फार ममताळू आणि गृहकृत्यांत दक्ष असत. त्या फार अकालीं ह्मणजे १९२५ सालीं सुमारें पस्तीशीच्या आंतबाहेर दिवंगत झाल्या. त्या सालच्या कॉंग्रेसच्या वेळीं ह्या जवळपास मृत्युशय्येवर असल्यामुळें कॉंग्रेसला जावें कीं न जावें अशा विवंचनेंत बापूजी असतां, यमुनाबाईनीं त्यांना असा आग्रह केला कीं आपण कॉंग्रेसला न जाल तर मी साफ औषध ह्मणून घेणार नाहीं ! आपण येईपावेतों मी प्राणोत्क्रमण खास करीत नाहीं, खुशाल जावें ! माधवरावजी कॉंग्रेसला गेले व परत आले, तेथून तीन महिन्यांनीं यमुनाबाईनीं जीवितयात्रा संपविली. त्यांजपासून लोकनायकांस दोन कन्या सौ० अंबूताई व सौ० बबूताई व दोन पुत्र दत्तात्रय व गणपति असे आहेत. दोन्ही कन्यांचे विवाह होऊन त्या

सुस्थळीं पडल्या आहेत. एक चिरंजीव दत्तात्रय उर्फ भाऊ हा हायस्कुलांत असून दुसरा गणपति हा मराठी शाळेंत शिकत आहे.

## शिक्षक.

१९०२ मध्यें कलकत्ता युनिव्हर्सिटीची बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर सुमारें दोन वर्षांचा काळ त्यांनीं अमरावतीस घालविला. प्रथम तेथील काशीबाई प्रायव्हेट हायस्कुलांत प्रसिद्ध शिक्षक श्री. मुळे यांच्या जागेवर मॅट्रिक्युलेशन वर्गाकरितां इंग्लिशचे अध्यापक ह्मणून यांची नेमणूक झाली होती. कांहीं दिवस तें काम करून ते बी. एल्. च्या परीक्षेचा अभ्यास करण्याकरितां गेले. पण १९०५ सालीं अमरावतीस दादासाहेब खापर्डे, मोरोपंत जोशी, तात्यासाहेब मुधोळकर, केशवराव ब्रह्म इत्यादिकांनीं "शिवाजी विद्यालय" नांवाचें सरकारी बंधन कोणत्याहि प्रकारें नसलेलें हायस्कूल काढलें, त्यांत अध्यापकाचें काम करण्याकरितां त्यांस वर्धाहून मुद्दाम तार करून बोलावून घेण्यांत आलें. त्यांची शिक्षक या नात्यानें योग्यता, त्याचप्रमाणें निरलस देशप्रेम आणि स्वार्थत्याग याबद्दल अमरावतीचे पुढारी व माधवरावजींचे खाजगी स्नेही यांची एवढी खात्री होती कीं ते आपल्या हांकेस ओ दिल्याशिवाय राहणार नाहींत आणि त्यांनीं तावडतोब अमराव-तीस जाऊन हा विश्वास खरा करून दाखविला. "शिवाजी विद्यालयांत" कांहीं महिने अध्यापकाचें काम केल्यानंतर त्यांना पुनश्च काशीबाई प्रायव्हेट हायस्कुलच्या शिक्षकवर्गांत समाविष्ट करण्यांत आलें. या कालांत त्यांचा वकिलीच्या परीक्षेचा अभ्यास सुरू होता व खाजगी बैठकींत ते आपल्या रसाळ वाणीनें व बहुश्रुतपणाच्या गप्पागोष्टींनीं बुद्धिमान् लोकांचें लक्ष आपणांकडे वेधून घेत असत.

## जन्मान्ध साधु व कवि गुलाबराय महाराज.

सुप्रसिद्ध विदर्भसंत व कवि ज्ञानेश्वरभक्त श्री गुलाबराय महाराज यांचें प्रेम त्यांनीं याच कालांत संपादन केलें. गुलाबराय महाराज हे अत्यंत

कुशाग्र बुद्धीचे, वादविवादांत निपुण आणि विद्याव्यासंगी असून अहोरात्र श्रीकृष्णभक्तींत रत असलेले असे जन्मान्ध साधु होते. कोणाला एखाद्या शास्त्राचा व्यासंग आहे असें कळलें कीं ते आपण होऊन त्यांच्या घरीं जाऊन दत्त ह्मणून उभे राहत, व त्यांच्या शास्त्रावर त्यांजशीं तास तास संवाद करीत बसत, व त्या शास्त्रांतील आद्य तत्वें ग्रहण करीत. माधवरावजी अणे हे मराठींत व इंग्रजींत फर्डे वक्ते आहेत, तसाच तत्वज्ञान विषयाचा त्यांचा चांगलाच व्यासंग आहे असें महाराजांच्या कानावर जातांच त्यांनीं माधवरावजींस गांठलें. महाराज इंग्रजी शिकलेले नव्हते, तथापि त्यांना प्रिय असलेल्या तत्वज्ञान विषयावरील इंग्रजींतील ग्रंथांचें परिशीलन करण्याची अपरिमित उत्कंठा त्यांच्या ठायीं होती, ती भागविण्यास त्यांना ही आयतीच संधि उपलब्ध झाली. ते माधवरावजींस गुरुतुल्य मान देऊं लागले. तत्वज्ञानावरील मोठाले ग्रंथ व निबंध या काळांत माधवरावजींनीं महाराजांस वाचून दाखविले. एकेक परिच्छेद वाचून माधवरावजींनीं महाराजांस त्याचें तात्पर्य मराठींत समजावून सांगावें असा त्यांचा वाचनाचा क्रम होता. पण महाराजांना इंग्रजीचें नुसतें भाषांतर ऐकावयाचें नव्हतें. तसलें वाचन त्यांना इंग्रजी ग्रंथांचें मराठींत भाषांतर झालेल्या ग्रंथावरून करतां आलें असतें. त्या विषयांतील सिद्धांतांची उपपत्ति व ग्रंथकर्त्यांच्या मूलभूत विचारसरणीची माहिती महाराजांना करून घ्यावयाची होती. एकेका परिच्छेदाचें भाषांतर करून सांगणारास असली उपपत्ति सांगणें अशक्य होतें. माधवरावजींनीं नुसतें भाषांतर करूं नये, तर त्या सिद्धांताबद्दल वादविवाद करून महाराजांच्या शंका निवारण कराव्या आणि पौरस्त्य व पाश्चात्य तत्वज्ञान यांचा तौलनिक पद्धतीनें अभ्यास करून त्यांतील साम्य व वैसादृश्य हीं महाराजांस पटवून द्यावींत. कॉलेजांत झालेल्या या विषयाची अशा रीतीनें घासाघीस करून त्यांतील मूलगामी तत्वांचें ज्ञान दृढ करण्याची संधि माधवरावजींस मिळाली, व गुलाबराय महाराज या साधूंच्या सान्निध्यांत त्यांनीं हा विषय आत्मसात् केला.

## श्री. लक्ष्मणराव पांगारकर.

श्री. लक्ष्मणराव पांगारकर, मयूरभक्त, हे कांहीं दिवस शिवाजी हायस्कूल मध्यें मुख्याध्यापक ह्मणून आले होते. त्यांजवरहि माधवरावजींनीं आपल्या विद्याव्यासंगाची व तीव्र बुद्धिमत्तेची छाप पाडली होती. लक्ष्मणराव हे ज्ञानेश्वरीमधील कांहीं शब्दांच्या अर्थासंबंधानें साशंक असत, पण त्या शब्दांचे अपभ्रंश आज वऱ्हाडांत बोलल्या जाणाऱ्या मराठी भाषेंत रूढ आहेत हें व्युत्पत्तिबलावर समजावून सांगून माधवरावजी त्यांचें समाधान करीत असत. काशीबाई प्रायव्हेट हायस्कूलच्या बोर्डिंगमध्यें त्यांनीं " मराठा " या विषयावर व्याख्यान देऊन आपला इतिहासाचा खोल अभ्यास व देश-हितार्चा तळमळ व्यक्त केली होती. अमरावतीस वकिलीच्या परिक्षेची तयारी सुरू होती तरी त्यांच्या तोंडून पुष्कळ वेळ असे उद्गार निघत असत कीं " मी वकिलीचा धंदा करीनच असें निश्चित नाहीं. " आणि यद्यपि चरितार्थास्तव ती परिक्षा पास झाल्यावर हा धंदा त्यांनीं आरंभिला तरी गीतेंत प्रतिपादिल्याप्रमाणें तो ' करून न केल्याप्रमाणें ' ह्मणजे केवळ निरा-सक्त वृत्तीनें ते त्यांत पडले हें पुढील वृत्तान्तावरून वाचकांच्या लक्षांत येईलच.

## वकिली करण्याचा निश्चय.

चरित्रनायक हे १९०७ सालीं बी. एल्. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांची घरची सांपत्तिक स्थिति ह्मणजे एकाद्या सामान्य विद्यैकधन ब्राह्मणाची असावी तशी होती. पूर्वीच्या आमदानींत राजांकडून त्यांच्या वाडवडिलांना स्नानसंध्या, वेदाध्ययन वगैरे करण्याकरितां वर्णीला लागूनच गणेशपूर येथील सुमारें १००।१२५ एकर जमीन इनाम देण्यांत आली होती. या जमिनीवरील उत्पन्नावरच त्यांचा प्रपंच मुख्यतः असे. चरित्रनायक वकि-लीची परीक्षा पास झाले तेव्हां त्यांच्या वडिलांची साठी उलटत आलेली होती

ह्मणून त्यांनींहि आपली भिक्षुकी सोडल्यासारखीच होती. माधवरावजींचे वडील बंधु लक्ष्मणराव ( आन्याजी ) हे कारकुनी करावयास लागले होते, व घरांतील सर्वांची मदार माधवरावजींवरच येऊन पडली होती. वर म्हटल्या-प्रमाणें वकिली करावी कीं न करावी, हा प्रश्न त्यांच्या मनांत घोळत होता. पण व्यावहारिक दृष्ट्या सर्व परिस्थितीचा आपल्या मनाशीं पूर्णपणें विचार करून त्यांनीं वकिली करावयाचें ठरविलें. नागपुरास त्यांना जाणणारे त्यांचे स्नेही त्यांना तेथें येऊन राहण्याचा आग्रह करीत, आणि केवळ द्रव्य संपादण्याचें ध्येय त्यांनीं आपल्या डोळयासमोर ठेवलें असतें तर ते आज तेथील हायकोर्टांत ज्युडिशिअल कमिशनरच्या न्यायासनावरहि विराजमान होऊं शकले असते! पण नागपुरास नाहीं तर निदान अमरावतीस तरी त्यांनीं येऊन रहावें असा तेथील स्नेह्यांचा त्यांना फार निकडीचा आग्रह होता. आग्रह करणारांच्या यांत दोन दृष्टि होत्या. एक तर अमरावती हे वऱ्हाडच्या राजधानीचें शहर असल्यामुळें जिल्ह्याच्या ठिकाणापेक्षां तेथें प्राप्ति ज्यास्त होण्याचा संभव; आणि दुसरें असें कीं एवढा विद्वान्, वक्तृत्वसंपन्न, अभ्यासी व कळकळीचा कार्यकर्ता अमरावतीस येऊन स्थिर झाला तर तेथील राष्ट्रीय आन्दोलनास जास्त महत्व येईल. पण लोकनायकांची स्वतःची दृष्टि या दोन्हींपेक्षां तिस-रीच होती. वकीलींत आपण पैसे कमावूं व पिढीजात निर्धनावस्थेंतून निघून धनकनकसंपन्न बनूं व हीच आयुष्याची इतिकर्तव्यता, असला विचार त्यांच्या मनासहि कधीं शिवला नाहीं; उलटपक्षीं, निर्वाहाला त्याशिवाय अन्य साधन नाहीं म्हणूनच त्या धंद्यांत शिरणें त्यांस प्राप्त होतें. पण देशकल्याण साधण्यासंबंधानें त्यांच्या ज्या कल्पना बनत चालल्या होत्या, व ज्या विचारांचें वळण लोकांच्या मनोभूमिकेंत उत्पन्न केल्याशिवाय समाज स्वातंत्र्य प्राप्त करण्यास समर्थ होणार नाहीं असें त्यांच्या मनानें ठरविलें होतें त्या कल्पना मूर्त स्वरूपांत आणण्यास आपण आपल्याच जिल्ह्यां-पासून सुरुवात केली पाहिजे हें त्यांनीं आपल्या मनाशीं निश्चित केलें.

## यवतमाळास आगमन.

वणीला त्यावेळीं दिवाणी कोर्ट नव्हतें, व यदाकदाचित् असतें तर जास्त प्रांतीच्या आशेनें मोठ्या शहराचा आश्रय न करितां वणीस राहून आपला प्रत्यक्ष परिचय व निकट संबंध असलेल्या लोकांतच ते आपल्या कल्पनांचा प्रचार करण्यास राहिले असते. पण वणीस दिवाणी कोर्ट नसल्यामुळें जिल्ह्याचें मुख्य ठिकाण जें यवतमाळ येथेंच वास्तव्य करावयाचें त्यांनीं ठरविलें. १९०६ सालीं नुक्ताच कोठें स्वदेशी चळवळीचा उगम झाला होता. ती चळवळ आबालवृद्धांमध्यें पसरविणें तेव्हांच्या सुशिक्षित पुढाऱ्यांचें मुख्य कर्तव्य होतें. पण चळवळीचें महत्व मनानें आकलन केलें तरी तींत प्रत्यक्षपणें उघड भाग घेऊं शकणारे असे लोक गांवोगांवीं हाताच्या बोटांवर मोजण्यासारखेच असत. ' वन्दे मातरम् ' हा शब्द उच्चारणारे, शिवाजी उत्सव, गणपति उत्सव, रामदास नवमीचा उत्सव यांचें चालकत्व करणारे व जाहीर सभांतून भाग घेणारे असले लोक ह्मणजे वाघाच्या विक्राळ दाढेंत हात घालणारे असे धैर्यशाली समजले जात ! अर्थात् परिणाम कांहींहि होवो, आपणांस आपलें कर्तव्य ह्मणूनच यांत पडावयाचें अशा स्वतंत्र विचारांचे, खंबीर मनाचे, पूर्ण स्वार्थत्यागी आणि स्वातंत्र्याविषयीं पराकाष्ठेचें प्रेम बाळगणारे असे जे असत तेच या चळवळीच्या नेतृत्वाची धुरा वाहण्यास पुढें येत हें सांगणें नकोच. माधवरावजी यांनीं देशसेवा हेंच आपल्या आयुष्याचें इतिकर्तव्य ह्मणून ठरविलेलें होतें, व लोकमान्यांचा प्रत्यक्ष सहवास घडून आल्यानंतर तर त्यांच्या मार्गदर्शकत्वाखालीं आपला जिल्हा सुधारावयाचा निश्चय त्यांनीं कायम केला होता. शिवाय बी. एल्. चा अभ्यास करण्याच्या अवकाशांत अमरावतीस काशीबाई प्रायव्हेट हायस्कूलमध्यें अध्यापकाचें काम करीत असतांना तेथील चळवळीचें सूक्ष्म ज्ञान त्यांनीं करून घेतलें होतेंच. अमरावतीस खापर्डे–जोशी–मुधोळकर यांच्यासारखे नामांकित कायदे-

पंडित आहेत, त्यांच्यामध्यें जाऊन पडण्यापेक्षां आपण आपल्या यवतमाळ शहरींच राहून होईल ती देशसेवा करावी असें त्यांनीं आपल्या मनाशीं ठरविलें. मोठ्या माणसांत जाऊन पडून आपण आपलें वैशिष्ट्य त्यांच्यामध्यें निमज्जित करण्यापेक्षां, तें वाढविण्यास योग्य अशा स्थळाचा आश्रय त्यांनीं केला यांत त्यांचें स्वातंत्र्यप्रेमच व्यक्त होतें.

## यवतमाळची राजकीय परिस्थिति.

अमरावतीस तेथील प्रसिद्ध व जबाबदार वकील राजकीय चळवळींत पुढाकार घेत होते; पण यवतमाळांत देशसेवेच्या पुरस्कर्त्यांत मोठ्यापैकीं वकील नसून, डॉ. बाबासाहेब परांजपे, शामरावजी देशपांडे, दत्तात्रय कृष्ण काणे, पृथ्वीगीर हरीगीर; गणपतराव माळवी अशासारखे गृहस्थ असत. त्या काळीं वकिलास समाजांत फार मान असे; किम्बहुना एखाद्या चळवळींत वकील असल्याशिवाय तिचा लोकांत प्रसार होणें दुरापास्त असे. वर निर्दिष्ट केलेले कार्यकर्ते हे वकिलांपेक्षां कमी बुद्धिमान् होते अशांतला भाग नाहीं, पण त्यांच्या नांवापुढें वकील ही संज्ञा नसल्यामुळें त्यांच्या प्रतिष्ठितपणांत लौकिकदृष्ट्या एक प्रकारचें न्यून असे. बाबासाहेब परांजपे यांनीं स्वदेशी चळवळीच्या प्रारंभालाच आपल्या दरमहा चारपांचशें रुपयांच्या डॉक्टरकीच्या धंद्यावर लाथ मारून यावज्जन्म देशसेवा करण्याचा निश्चय केलेला होता. दत्तोपंत काणे हे प्रतिष्ठित इजारदार व कॉलेजमध्यें शिक्षण घेतलेले विद्वान् गृहस्थ चळवळींत पडलेले होते. शामरावजी देशपांडे यांनीं तर विद्यार्थीदशेपासूनच आमरण स्वतःस देशहितार्थ वाहून घेतलें होतें. पृथ्वीगीर हरीगीर यांनीं देशहित करण्याच्या बुद्धीनें प्रथम भाड्याच्या छापखान्यांत व नंतर स्वतःचा हरीकिशोर छापखाना विकत घेऊन त्यांत "हरिकिशोर" नांवाचें केवळ स्वदेशी कागदावर छापलें जाणारें व केसरीच्या मतांचा अनुवाद करणारें साप्ताहिक पत्र सुरू केलें होतें. गणपतराव माळवी यांनीं बाल्वयापासूनच विठ्ठलमंदिराचे एक ट्रस्टी ह्मणून संस्थानच्या

मोठ्या इस्टेटीचा कारभार व्यवस्थितपणें व राष्ट्रीय दृष्टीनें चालविलेला होता. त्यांना त्यांच्या औदार्यामुळें त्यांचे स्नेही विनोदानें " सुबोधचंद्र मलिक " असें संबोधीत !

## तेव्हांच्या चळवळी.

त्यावेळच्या राष्ट्रीय चळवळी ह्मणजे शिवाजी, रामदास व गणपतीचे उत्सव, आणि एखादा आखाडा व स्वदेशीचें दुकान ह्याच मुख्यतः असत; आणि वरील गृहस्थांकडेच त्यांचें नेतृत्व असे. नाहीं ह्मणावयास त्या वेळचे वकील ह्मणजे अण्णासाहेब बापट, भाऊसाहेब बापट, रामभाऊ गोडबोले, बाबासाहेब पेशवे इत्यादिकांची सहानुभूति व अप्रत्यक्ष मदत असे; पण छातीठोकपणें प्रत्येक गोष्ट करण्याचा पुढाकार बाबासाहेब परांजपे यांच्याकडेच असे. दुसऱ्या दर्ज्याचे नागरिक ह्मणजे वकिलांचे कारकून व स्वतंत्र पेशाचा धंदा करणारे थोडे फार शिकलेले तरुण, यांची मात्र बाबासाहेबांस फार मदत असे. चौतिस कलमाच्या मैदानांत केदारेश्वर आट्यापाट्या क्लब नांवाची संस्था असे, तींत स्वदेशी चळवळीशीं प्रत्यक्ष सहानुभूति बाळगणारे गांवांतील बहुतेक तरुण व प्रौढ गृहस्थ असत. हरिकिशोर छापखाना व केदारेश्वर आट्यापाट्या क्लब हींच चळवळयांचीं मुख्य केंद्रस्थानें असत. बाबासाहेब परांजपे व शामरावजी देशपांडे यांच्यासारख्या पुढाऱ्यांकडे चळवळीचें चालकत्व असल्यामुळें यवतमाळांत स्वदेशी चळवळ अमरावतीखेरीज इतर पुष्कळ ठिकाणांपेक्षां जास्त धडाडीनें व शिस्तशीरपणें चालत असे. यवतमाळास " विद्यागृह " ही राष्ट्रीय शिक्षणाची संस्था अमरावतीच्या " शिवाजी विद्यालया " च्या पद्धतीवर स्थापण्यांत आलेली होती व तींत श्री. दत्तोपंत आपटे, श्री. हरीभाऊ फाटक, श्री. विष्णुपंत केतकर वगैरे शिक्षक स्वार्थत्यागपूर्वक कामें करून गांवांतील चळवळींचा रथ ढकलीत होते. अशा परिस्थितींत १९०७ सालीं चारित्रनायक यवतमाळांत वास्तव्य करावयास आले.

## चळवळींचें तिसरें केन्द्र.

त्यांनीं गांवांतील लोकांवर व कार्यकर्त्यांवर लौकरच आपली छाप पाडली. आपल्या शहरीं एक विद्वान् स्वार्थत्यागी व धडाडीचा वकील आला याबद्दल सर्वांस धन्यता वाटूं लागली. त्यांनीं सर्वांचीं मनें आकर्षित करून घेऊन आपलें घर ह्मणजे कार्यकर्त्यांचें एक प्रमुखस्थान लौकरच करून सोडलें. माधवरावजींना बोलण्याचा प्रथमपासून फार 'उरक' आणि त्यांच्या गप्पामध्यें असा कांहीं बहुविधपणा व रंग भरलेला असावयाचा कीं ज्याला फुरसत मिळे त्यानें नेमकें 'बापूजीं'च्या घरीं जाऊन बसावें. नव्या मित्रमंडळींत ते माधवराव या नांवानें संबोधिले जात, पण त्यांच्या घरचें 'बापूजी' हें नांव आतां सर्वांच्या तोंडीं बसूं लागलें. यावेळीं यवतमाळची सोशल क्लब ही संस्था ह्मणजे वकील लोकांचें मुख्य विश्रान्तिस्थान असे, तसें अजूनहि आहेच. वकीलसाहेब कोर्टांत किंवा घरीं नसले तर नेमके या 'कळपघरांत' सांपडायचे! पण बापूजींनीं यवतमाळांत देशसेवेच्छेच्या आश्रयस्थानाचें दुसरें केन्द्र आपल्या निवासस्थानीं निर्माण केलें. हळूंहळूं यवतमाळ शहरांतील चळवळींच्या पुरस्कर्तृत्वाची माळ त्यांच्या गळ्यांत येऊन पडूं लागली. शिवाजी उत्सवाच्या वेळीं, दासनवमीच्या निमित्तानें, गणपति उत्सवांत बापूजींना भाषणें करावीं लागत. विद्यागृहांस मदत करणें हेंहि त्या वेळचें या शहरांतील एक महत्वाचें काम असे, व त्यालाहि ते सर्वतोपरी साहाय्य करीत असत.

## परिस्थितींत पालट पडला.

अशा रीतीनें बापूजी थोड्याच दिवसांत यवतमाळांतील राजकीय चळवळीशीं समरस होऊन कार्यकर्त्यांचें स्फूर्तिस्थान होऊन बसले. त्यांच्या अंगच्या असामान्य गुणांचा प्रभाव वकीलवर्गावर विशेषत्वानें झाल्यामुळें त्यापैकीं बरेच गृहस्थ राजकीय चळवळींत प्रमुख भाग घेऊं लागले. यवतमाळास वकिली करण्याकरितां नुकतेच आलेले भीमराव हणमंत उर्फ अण्णा-

साहेब जतकर यांनीं त्या कालापासून देशसेवाव्रताचें जें कंकण बांधलें तें त्यांनीं यापुढील सर्व बऱ्या व वाईट प्रसंगांतून आजतागायत टिकविलें आहे. किम्बहुना गेल्या सातआठ वर्षांपासून स्थानिक प्रश्न व जिल्ह्यांतील चळवळी यांचें नेतृत्व त्यांनींच घेतलें आहे व त्यांच्या सल्ल्याशिवाय कोणी पाऊलहि टाकत नाहीं असें ह्मणावयास हरकत नाहीं. त्यांनीं आपली सतेज बुद्धिमत्ता, असाधारण सौजन्य ( यांना लोकांत ' देवमाणुस ' च ह्मणतात, ) वकिलीच्या धंद्यांमधील हुषारी व तिजमुळें प्राप्त होणारें धन व प्रतिष्ठा हीं सारीं बापूजींवरील प्रेमामुळें देशकार्यार्थ वाहिलीं, व हे एकप्रकारें बापूजींचे उजवे हात बनल्यामुळें यवतमाळ जिल्ह्याच्या राष्ट्रीय जीवनास एक मोठाच आधार प्राप्त झाला. असे हे मोठ्यांत मोठ्या प्राप्तीचे दोन वकील राष्ट्रीय आन्दोलनाचे पुरस्कर्ते झाले या कारणानें यवतमाळच्या चळवळीस वोजदारपणा प्राप्त झाला. शामरावजी देशपांडे नेहमीं ह्मणत असत कीं " आह्मासारखे लोक, कीं ज्यांनीं देशकार्याव्यतिरिक्त अन्य विषयांत लक्ष घालावयाचें नाहीं असा निर्धार केलेला असतो, ते जवळजवळ निष्कांचन स्थितींत आपलें आयुष्य कंठत असतात पण आह्मी जो चरित्रक्रम राष्ट्रीय दृष्टीनें आचरण्याविषयीं लोकांस सांगतों तो हजार दीडहजार प्राप्तीचे वकील, शें दोनशें खंडीचें पीक घेणारे शेतकरी, लाखों रुपयांचा धंदा करणारे व्यापारी, खाजगी धंदे करणारे प्रतिष्ठित लोक यांनीं आचरला तरच स्वदेशीचीं मुळें समाजांत खोल रुजलीं आहेत असें समजावें, " आणि हीच गोष्ट खरी आहे. आपला व्याप संभाळायचा या निमित्तानें, ऊर्फ भीतीनें, जोंवर सुशिक्षितांपैकीं मोठ्या प्राप्तीचे लोक स्वदेशी चळवळीपासून अलिप्त राहात असत तोंवर या आन्दोलनाच्या व्याप्तीचें क्षेत्र ' चळवळये ' आणि गरीबींत काळ कंठणारे पण मनांत स्वदेशभक्तीचा जागता स्फुल्लिंग धारण करणारे सामान्य जन यांनीं मर्यादित झालेलें होतें. पण बापूजी येथें येऊन राहिल्यानंतर त्यांनीं या परिस्थितींत पुष्कळच पालट पाडला. स्वदेशी चळवळींत भाग घेणें

म्हणजे प्रतिष्ठितपणा होय अशी सर्वांची समजूत होऊं लागली, व राष्ट्रीय आन्दोलनास जोराची गति मिळाली.

## उदयोन्मुख आकांक्षा व दडपशाही.

१९०६ सालीं हिंदुस्थानचे पितामह दादाभाई नौरोजी यांनीं कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष या नात्यानें भाषण करून आमच्या सर्व चळवळींचें अंतिम ध्येय स्वराज्यप्राप्ति आहे अशी आपल्या अधिकारयुक्त वाणीनें घोषणा केल्यानंतर, विचारांनीं राष्ट्रीय सभेच्या पुष्कळच पुढें असलेल्या जनतेनें धैर्यपुरस्सर राष्ट्रीय सभेनें आंखून दिलेलीं राष्ट्रीय चतुष्टयीं आचरणांत आणण्याचा धडाका सुरू केला. नोकरशाहीस हें नको होतें. इकडे राष्ट्राच्या आकांक्षा इतक्या स्पष्ट शब्दांनीं व्यक्त होऊं लागल्या, उलटपक्षीं नोकरशाही जेथें त्यांचा अंकुर दृष्टोत्पत्तीस येईल तेथें निर्घृणपणें वार करूं लागली! आखाडा दिसला कीं आणा त्याच्या चालकावर एखादें संकट; राष्ट्रीय शाळा काढली कीं करा तिच्या शिक्षकांवर १०८ व ११० कलमाखालीं मुकदमे; शिवाजी, गणपति उत्सव असेल कीं ते ज्या जागेवर व्हायचे त्यांच्या मालकांस द्या तंबी; असें सारखें चालू होतें. एवढेंच नव्हे तर शिवाजी, टिळक, रामदास यांचे फोटो घरीं ठेवणारे, किंवा केसरी, काळासारखीं वर्तमानपत्रें घेणारे यांचीं नांवें टिपून घेतलीं जात! खेड्यांपाड्यांतून तर राष्ट्रीय फोटो व वर्तमानपत्रें घरीं ठेवणारांवर पोलिसची फारच करडी नजर असून अशा चळवळ्यांस कसें गोत्यांत आणावयाचें या खटपटींत ते असत. कोठें जेवणाची पंगत किंवा लग्नकार्य असलें तर त्या घरांत जातो येतो कोण, यांचीं नांवें दारावर उभे राहून पोलिसचे शिपाई टिपून घेत; एवढेंच नव्हे तर लोकांचा अपमान करावा व सामान्य जनतेवर दरारा व दहशत बसवावी या उद्देशानें त्या त्या माणसांस त्यांचीं नांवेंहि पोलिस शिपाई विचारीत व त्यांजशीं दरावणीची भाषा बोलत असत! परगांवाहून टांग्यां-

तून किंवा बैलगाडींतून येणाऱ्या प्रत्येक माणसाचें नांव व त्याची माहिती टिपून घेतल्याशिवाय त्यांना त्यांच्या घरांत शिरूं देत नसत, जणूं काय प्रत्येक पांढरपेशा मनुष्यावर तो कोठून तरी एखादा भयंकर गुन्हा करून आल्याचा संशय सरकारास येई! मोठ्यांत मोठ्या, प्रतिष्ठित व वृद्ध वकिलासहि हा प्रसंग चुकत नसे!

## आंदोलनाचें धुरीणत्व स्वीकारलें!

अशा भीषण परिस्थितींत बाबासाहेब परांजपेप्रभृति पुढारी यवतमाळ जिल्ह्यांतील राष्ट्रीय आंदोलनाची नौका धैर्यानें व धडाडीनें वल्हवीत होते. त्यावेळीं बापूजीसारख्या बुद्धिमान्, वक्तृत्वसंपन्न व तेजस्वी कार्यकर्त्याची जोड मिळाल्यामुळें आपल्या कार्यास ही परमेश्वरी देणगीच होय असें त्यांस वाटूं लागलें. बाबासाहेबांच्या ज्वलद्देशाभिमानामुळें व कार्यकर्तृत्वामुळें यवतमाळ शहरचें नांव आधींच महाराष्ट्रभर प्रसिद्धीस आलेलें होतें, तें इतकें कीं १९०५ सालीं लोकमान्य टिळकांनीं या शहरास आपल्या अपूर्व दर्शनाचा लाभ दिला तेव्हां त्यांनीं सर्व कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून "हें शहर लौकरच लोकमताचें ठाणें होईल!" असे उद्गार काढले होते. चरित्रनायक येथें येऊन राहिल्यानंतर ते आपल्या बुद्धिप्रदीपानें येथील आंदोलनास विशेषच सतेजता आणूं लागले, तेव्हां लोकमान्यांचे आशीर्वाद खरे होणार अशी आशा सर्वांच्या मनांत प्रदीप्त झाली. चरित्रनायकांनीं आपलें अद्वितीय बुद्धिमत्व व वक्तृत्व यांनीं थोड्याच महिन्यांत येथील वकीलवर्गांत अग्रेसरत्व पटकाविलें! त्यांच्या हुषारीचा लौकिक जिल्हाभर पसरला. जिल्ह्यांतील मोठ्यांत मोठे सावकार त्यांचे पक्षकार बनूं लागले. अतिशय भानगडीच्या दिवाणी व फौजदारी मुकदम्यांत त्यांची सल्ला व साहाय्य हीं अपरिहार्य होऊं लागलीं. पण कचेरीचा वेळ सोडला कीं त्यांचा मुख्य व्यवसाय ह्मणजे राष्ट्रीय आन्दोलनाचीं निरनिराळीं अंगें व उपांगें यांची चर्चा करणें, नवीन उपाय शोधणें, विविध प्रकारच्या जनतेंत नवीन राष्ट्रीय

आचार रूढ करणें हा होता. प्रत्येक सभा व उत्सव यांत ते मुख्य वक्ते म्हणून व्यासपीठावर दिसायचेच! शिवजयन्तीच्या उत्सवाकरितां त्यांना नागपूर, अमरावती येथून आग्रहाचीं निमंत्रणें येत; आणि छत्रपति शिवाजी महाराजांचें चारित्र, त्यांची शिकवणूक; त्यावेळच्या स्वातंत्र्यवीरांच्या मनोवृत्ति व ऐतिहासिक पुरुषांचे परस्पर संबंध, महाराष्ट्रधर्म व त्याची व्याप्ति—इत्यादि विषयांवर बोलतांना ते स्वतः इतके रंगून जात, व श्रोत्यांच्या चित्तवृत्ति इतक्या मोहवून सोडीत असत कीं हा कोणी अपूर्व पुढारी होय असा श्रोत्यांचा समज झाल्याशिवाय राहात नसे. हा मराठ्यांच्या इतिहासाचा विषय त्यांनीं इतका आत्मसात् केला होता कीं त्यांनीं प्रतिवर्षाच्या शिवजयंतीच्या प्रसंगीं यवतमाळास किंवा अन्यत्र अशीं लागोपाट १८ व्याख्यानें दिलीं; आणि मौज अशी कीं एका वर्षाच्या व्याख्यानांत जे मुद्दे प्रमुखत्वानें आले ते दुसऱ्या वर्षीच्या व्याख्यानांत आले नाहींत! 'नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा' जी म्हणतात ती त्यांच्या ठिकाणीं तंतोतंत भरलेली आहे.

## वकिलीची सनद एकवर्ष तहकूब !

एवढ्या धडाडीच्या वक्त्यास व पहिल्या प्रतीच्या वकिलास त्याकाळीं सरकारनें मोकळें राहूं देणें अशक्यच होतें. त्यांनीं वऱ्हाडभर दडपशाहीचें सत्र सुरू केलेलें होतें. तपस्वी डॉ. बाबासाहेब परांजपे याजपासून १०८ कलमाखालीं जातमुचलका व जमानत घेऊन त्यांच्या तोंडास कुलूप घालण्यांत आलें! अमरावतीचे कार्यकर्ते श्री. वामनराव जोशी, श्री. शामरावजी देशपांडे, श्री. संभाजी विनायक गोखले, श्री. जयराम भवानजी पाटील, श्री. गुलाबराव बक्षी व प्रस्तुत लेखक यांजवर मुकदमे भरण्यांत येऊन त्यांस कमी जास्त प्रमाणाच्या शिक्षा ठोठावण्यांत आल्या. चळवळीच्या सुरुवातीलाच स्वामी शिवानन्द यांस एका पत्रावलीचे कर्ते म्हणून, सर्व हिन्दुस्थानांत ह्या काळापर्यंत अश्रुतपूर्व अशी सात वर्षांची जबर शिक्षा ठोठावण्यांत आलेली होती! अमरावतीचें 'शिवाजी विद्यालय' 'हम करे

सो कायदा ' या न्यायानें बंद करण्यांत आलें व त्याच्या पाठोपाठ यवतमाळच्या निद्रागृहावरहि तोच प्रसंग आला. ' हरिकिशोर ' पत्राचे संपादक पृथ्वीगीर हरीगीर यांना १२४ अ आणि १५३ अ या कलमाखालीं दोषी ठरवून दोन वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा देण्यांत आली होती. या पत्रांत बापूजी अणे हे चैतन्योत्पादक लेख लिहीत हें सरकारांस माहीत होतेंच. ' निःशस्त्र प्रतिकार ' या विषयावर त्यांनीं लिहिलेली लेखमाला, तिजमधील विचारांची तेजस्विता व बुद्धीची कुशाग्रता आज प्रत्यक्ष कायदेभंग करून गेलेल्या लोकांनींहि मननपूर्वक वाचण्याच्या योग्यतेची आहे. अशा धामधुमीच्या काळांत नोकरशाहीनें बापूजींच्या घराची झडती घेतली व बीजगणिताचीं टिपणेंहि जप्त करून नेली ! आणि ५ एप्रिल १९०९ रोजीं त्यानीं हनुमान जयन्तीच्या दिवशीं केलेल्या एका भाषणाचा आधार घेऊन त्यांजवर कलम १०८ खालीं मुकदमा केला. मुकदमा करणें ह्मणजे न्यायाचा फार्स करून शिक्षा ठोठावणें हाच प्रकार त्यावेळीं सरसहा रूढ होता; किम्बहुना आरोपितास शिक्षा किती द्यायची याबद्दल डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडून चिठ्ठी येण्याची न्यायाधीश वाटच पहात असे हें प्रसिद्ध आहे ! बापूजींवर गुन्हा शाबीत होऊन २२ जून १९०९ रोजीं त्यांच्यापासून तीन हजार रुपयांचा जातमुचलका व प्रत्येकीं अडीच हजारांचे दोन जामीन घेण्यांत आले, व लीगल प्रॅक्टिशनर्स ॲक्टखालीं गुन्हेगार ठरलेल्या या वकिलाची सनद एक वर्षपर्यंत रद्द करण्यांत आली !

## अंमलदारास बाणेदारपणाचा जबाब !

हा मुकदमा चालू असण्याच्या अवधींत पुढील प्रकार घडल्याचें सर्वतोमुखीं झालें होतें. एक बडा अंमलदार त्यावेळीं आपल्या इतमामानें यवतमाळास आला होता. त्यानें बापूजींस बोलणेंचालणें करण्याकरितां बोलावून घेतलें. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यानंतर या अंमलदारानें ह्मटलें कीं ' तुह्मी एवढे मोठे दर्ज्याचे वकील, तुमची प्रॅक्टिस दिवसें-

दिवस वाढायचा, तुमचा सरकारशीं रात्रंदिवस संबंध येणार; तेव्हां एवढ्या उघडपणें चळवळींत न पडण्याचें कबूल करीत असाल तर तुमचे-वरील हा प्रसंग टाळण्याची कोशीस मी करून पाहतों. तुह्मां आतां कोठें गरीबींतून उदयास येत आहांत, पण तुमची वकिलीची सनद सरकारनें काढून घेतली तर काय कराल ?' चरित्रनायकांनीं बाणेदारपणानें उत्तर दिलें कीं या प्रसंगाची पूर्ण कल्पना करूनच मी या आखाड्यांत उतरलों आहें. माझ्या वाडवडिलांनीं वकिली केली नव्हती, व मला ती सोडावी लागली तर मोठीशी हानी नाहीं. वडिलांच्या पुण्याईनें त्यांच्यापासूनच प्राप्त झालेल्या विद्येवर मी आपला चरितार्थ करण्यास समर्थ आहे ! " असल्या उत्तरानें सदरहू अंमलदाराचा दिमाख उतरला असेल हें सांगणें नकोच ! त्यानें चरित्रनायकांच्या या 'उद्धटपणाची' चांगलीच ओळख ठेविली; आणि त्यानंतर पुन्हां तो एकदां यवतमाळास आला तेव्हां डेप्युटी क. च्या निमंत्रणावरून चरित्रनायक त्यांच्या भेटीस गेले. त्यांनीं आपली अभिधान-दर्शिका ( Visiting Card ) आंत पाठविली तेव्हां I don't wish to see the caller [ भेटावयास आलेल्या या इसमास मी भेटूं इच्छीत नाहीं. ] असें त्यानें आपल्या खोलींतून त्याच कार्डावर लिहून पाठविलें ! या मानभंगानें बापूजींच्या तळपायाची आग मस्तकापर्यंत गेली ! आधींच त्यांना ऑफिसरांना भेटावयास जाण्याचा तिरस्कार; त्यांतून ते डेप्युटी कमि. च्या निमंत्रणावरून या अंमलदारास भेटण्यास गेलेले. ते ताडकन् तेथून निघून त्याच पावलीं डेप्युटी कमिशनरच्या बंगल्यावर गेले, आणि झालेल्या प्रकाराचा उल्लेख करून त्यांनीं त्याची अशी कांहीं हजेरी घेतली कीं तो प्रकार फक्त त्या दोघांनाच माहीत ! त्या काळांत असले रोखठोक जबाब देणारा आपल्या प्रजाजनांत कोणी असेल अशी त्या ऑफिसरांना कल्पना देखील नसेल. झाला हा प्रकार मानधन बापूजींच्या तेजस्वी बाण्यास शोभेसाच झाला, पण ही व्यक्तिगत मनोभावना त्यांनीं

अशा रीतीनें मनांत बाळगली नाहीं, कीं जेणेंकरून सार्वजनिक हिताचा विघात व्हावा. कारण त्यानंतर तीस वर्षांनीं हाच अंमलदार आपल्या नोकरीच्या उच्चतम पदावर आरूढ झाला तेव्हां त्याच्यापुढें रॉयल पब्लिक सर्व्हिसेस् कमिशनचे एक साक्षीदार ह्मणून ते साक्ष द्यावयास गेले, आणि त्या कमिशनचा एक सभासद ह्मणून बसलेल्या वरील अंमलदारास त्यांनीं आपल्या माहितीनें भरलेल्या उत्तरांनीं गारेगार करून सोडलें!

## वकिली बंद पडल्यावर.

चरित्रनायकांपासून जामीन घेण्यांत आला व त्यांची वकिली एक वर्षपर्यंत बंद करण्यांत आली. निर्वाहाचें साधन नष्ट केल्यानें ते आपला चळवळीचा व्यवसाय बंद पाडतील अशी नोकरशाहीची अपेक्षा होती पण ती फलद्रूप होण्याऐवजीं चरित्रनायकांचा उद्योग "कीं तोडिला तरु फुटे आणखी भरानें" या न्यायानें ज्यास्तच वाढूं लागला. राष्ट्रीय आन्दोलन कसें व्यवस्थित पायावर बसवावें व त्याचें क्षेत्र वाढवून त्याची व्याप्ति सर्व प्रकारच्या जनतेंत कशी करावी याचें चिन्तन करण्यास त्याचप्रमाणें आपल्या आवडीचे असे राजकीय संघटनाविषयक व तत्वज्ञानाचे ग्रंथ वाचावयास त्यांना ज्यास्तच फुरसत मिळूं लागली. 'श्रुतिबोध' च्या 'तिळगुळ अंकांत' लिहिलेला "हिंदुधर्माची मीमांसा" हा लेख, गणपति ही संग्राहक देवता कशी हा लेख, अरुणाची जन्मकथा हें व्याख्यान, गीतेंतील यज्ञचक्र या विषयावरील व्याख्यानें इत्यादि उत्तमोत्तम व ओजस्वी विचारांचें जनन या दडपशाहीच्या व धामधुमीच्याच काळांतील आहे.

## संग्राहक धोरण.

देशसेवा करण्याचे त्यांचे विचार इतके प्रबल व दुर्दमनीय असत, ह्मणून इतर पुष्कळ जागीं मवाळ व जहाल या भेदांस जरी प्राधान्य असें तरी बापूजींनीं त्यांस कधींच महत्व दिलें नाहीं. हिंदुस्थानांत मतें दोन, पक्ष दोन, एक परकीय नोकरशाहीचा व दुसरा हिन्दी प्रजाजनांचा, ही त्यांची

मुख्य विचारसरणी असे. ते लोकमान्यांचे कट्टे अनुयायी, अर्थात् जहाल पक्षाचे, पण नोकरशाहीची सत्ता आकुंचित करून ती लोकांच्या हातांत आणणें हें जें दृष्टीसमोरचें मुख्य ध्येय तें अंमलांत आणण्याकरितां नेमस्त पक्षाचे पुढारी व कार्यकर्ते यांच्याशीं मनमोकळेपणें विचारविनिमय करण्यास किम्बहुना त्यांच्याबरोबर काम करण्यास त्यांनीं कधींहि संकोच केला नाहीं, किंवा व्यक्तिविषयक मानापमानाच्या कल्पनांस प्राधान्य दिलें नाहीं· भिन्न मतांचे व भिन्न वृत्तींचे लोक एकत्रित करून त्यांच्या एकीच्या बलावर नोकरशाहीच्या हातून आपलें ' गिळलेलें माणिक ' परत कसें मिळवावयाचें या एकाच विचारसमाधींत ते सदा निमग्न असत, व ह्मणून आपल्या तेजस्वी स्वभावास अनुसरून एखादे वेळीं ते आपल्या निकटच्या कार्यकर्त्यांशीं किंवा स्नेह्याशीं बोलतांना कठोर शद्ब वापरीत, पण प्रतिपक्षाशीं बोलतांना किंवा त्याची समजूत घालतांना त्यांनीं कधींहि मनास लागण्यासारखा शद्ब उच्चारला नाहीं ! त्यांचा एक ठाम सिद्धान्त आहे कीं वादविवादांत जोरानें बोलून कठोर शब्द वापरला तर प्रतिपक्षी आपल्या स्वतःच्याच मतांचा अभिनिवेश जास्त दृढ करितो; ह्मणून नमतें घेऊन त्याच्याच छंदानुरोधानें त्याच्याशीं बोलून साम्यपणानें आपली विचारसरणी त्याच्या गळ्याशीं उतरविण्याचा प्रयत्न केला तरच तो आपलें ह्मणणें कांहींसें तरी ऐकून घेण्याचा सम्भव असतो. असल्या वागणुकीमुळेंच ते नेमस्तांसहि प्रिय असत व आजहि आहेत· जाहीर सभामधून भाषणें करतांना, किंवा खाजगी बैठकीवर देखील नेमस्तांच्या पुढाऱ्यांविषयीं ते अतिशय आदरयुक्तभावना प्रगट करितात, व त्यांच्या ठिकाणच्या गुणांची प्रशंसा करितात. त्यांचीं आपलीं मतें कांहीं बाबतींत जुळलीं नाहींत ह्मणून काय झालें ? जेथें जुळत नाहींत, तेथें त्यांना आपल्या मतानें काम करूं द्यावें व आपण आपल्या मतानें करावें; पण जेथें मतें जुळतात, तेथें दोघांनीं एकत्र काम करावयास काय हरकत आहे ? हें त्यांचें आजवरचें धोरण आहे.

## प्रतिपक्षीयांविषयीं आदर.

त्यांचा प्रतिपक्षीयाविषयींचा आदर केवढा दांडगा व अन्तःकरणांत खोल रुजलेला होता, हें एका प्रसंगीं उत्कृष्टपणें त्यांच्या स्नेह्यांच्या निदर्शनास आलें. नेमस्त आणि जहाल, गोखले आणि टिळक हे भेद ज्यावेळीं अतिशय उग्र स्वरूपांत वास करीत होते त्यावेळची ही गोष्ट आहे. अमरावतीच्या राष्ट्रीय आन्दोलनांत, स्वतः पोलीसखात्याचे सब इन्स्पेक्टर असतां भाग घेतल्यामुळें नोकरी सोडण्याचा प्रसंग आलेले श्री. गणपतराव दवंडे नांवाचे गृहस्थ यथाशक्ति देशसेवा करतां यावी या हेतूनें अमरावती सोडून यवतमाळास येऊन राहिले होते. त्यांनीं येथें मोठ्या प्रमाणावर एक स्वदेशी कापडाचें दुकान घातलें होतें. हे गृहस्थ प्रत्येक राष्ट्रीय चळवळींत झटून मनःपूर्वक भाग घेणारे निर्भीड व सडेतोड बोलणारे असून चांगले कार्यकर्ते म्हणून त्यावेळीं बापूजींच्या बैठकीवर नेहमी सांपडायचेच. एके दिवशीं टिळक—गोखले वादाच्या भरांत त्यांनीं गोखल्यासंबंधानें जरा अप्रशस्त शंका घेऊन त्यांस कर्मपिणा दिला, तेव्हां बापूजी एवढे गरम झाले, व त्यांनीं गणपतरावांची अशी कांहीं खरडपट्टी काढली कीं सांगतां सोय नाहीं! त्यांचा क्रोध बराच वेळपर्यंत शमन पावला नाहीं. बैठकीवर नवीन नवीन माणसें येत त्यांना बापूजी क्रुद्ध झालेले पाहून विस्मय वाटे. गोखल्यांशीं आपलें जुळत नाहीं, म्हणून त्यांची योग्यता कशी कमी होते? अशा रीतीनें आपण प्रतिपक्षीयाविषयीं भलभलते शब्दप्रयोग वापरूं लागलों तर जशास तसें या नात्यानें तेहि आपणाविषयीं तशीच भाषा वापरण्यास कमी करतील काय? आणि असेंच जर चाललें तर दोघांचें जुळतें अशा वेळीं देखील एकमेकांच्या वृत्ति कलुषित झालेल्या असल्यामुळें आपण परस्परांबरोबर कामें तरी कशीं करूं शकूं? ही गोष्ट बापूजी गणपतरावांच्या मनावर बिंबवीत होते. त्यांचा यावेळचा आवेश पाहून सारे जण सर्दच झाले! आणि ही गोष्ट बरेच दिवस त्यांच्या स्नेह्यांमधील बोलण्याचा विषय असे. प्रतिप-

क्षीयांचे गुण जाणून त्यांस योग्य आदर देणें हें त्यांच्या ठिकाणच्या अजातशत्रुत्वाचें चिन्ह होय, व हा गुण त्यांच्या ठिकाणीं असाधारणपणें वसत आहे.

## " घोरा " वृत्ति.

पण विनयशीलपणा आणि आदर या बाबतींत त्यांची ही वृत्ति बाणलेली असली तरी स्वतःच्या मतांवर आघात होऊन त्यापायीं कार्यनाश होण्याची भीति असते तेव्हां ते आपलें उग्र रूप प्रतिपक्षास दाखविण्यास कमी करीत नाहींत. तथापि याहि वेळीं प्रतिपक्षीयाच्या वैय्यक्तिक श्रेष्ठतेसंबंधानें अतिशय प्रशंसायुक्त शद्बांची प्रस्तावना करून मगच केवळ मतभेदाच्या मुद्यावर आपल्या न्यायनिष्ठुर वक्तृत्वाचा भडिमार करितात. या वेळची त्यांची ' घोरा ' वृत्ति पाहण्यासारखी असते. [ ' घोरा ' आणि ' अघोरा ' तनु हे वैदिकवाङ्मयांतले शद्ब बापूजी आपल्या भाषणांत पुष्कळ वेळ वापरतात. ] एकदां प्रो. भाटे या नेमस्त वक्त्यांचें भाषण यवतमाळ येथील रॉइंग थिएटरांत झालें. नको, नको, म्हणत असतां नेमस्त पुढाऱ्यांनीं अध्यक्षपद यांच्याच गळ्यांत अडकविलें. वक्त्यानें मनमोकळेपणानें जहाल पंथाचीं मतें व कार्यपद्धति यांजवर मनसोक्त टीका केली आणि नेमस्तांच्या राजकारणाचें मंडन केलें. पण समारोपाचें भाषण करतांना बापूजींनीं प्रथम नेमस्तांच्या अभ्यासीपणाची व उद्योगाची मनमुराद प्रशंसा करून त्यांच्या मतांचें असें खरमरीत खंडन केलें कीं कोणीकडून आपण त्यांना सभेच्या अध्यक्षपदीं बसविलें असे नेमस्तांस होऊन गेलें ! नेमस्तांचें पुढारी सर मोरोपंत जोशी हे एकदां निवडणुकीच्या मोहिमेंत जाहीर व्याख्यान देण्याकरितां यवतमाळ येथें आले होते. सर मोरोपंत व बापूजी यांचें खाजगी पूर्ण सख्य होतें. सभेस डेप्युटी कमिशनर, डेप्युटी सुपरिंटेंडंट ऑफ पोलिस, सबडिव्हिजनल ऑफिसर, तहशिलदार वगैरे झाडून सारे अंमलदार आणि नेमस्त पक्षाचे लोक हजर होते. आपला पक्ष केवढा

निस्सीम कार्यकर्ता आहे, आणि आपलीं मतें कशीं शास्त्रीय विचारसरणीच्या कसोटीस उतरणारीं आहेत, याचें सर मोरोपंतांनीं प्रतिपादन केलें, आणि आपण सभा मारून नेली, या विजयानंदांत ते होते. बापूजी या सभेस कांहीं खाजगी कामामुळें येऊं शकत नव्हते, पण अगदीं आयत्या वेळीं येऊन उपस्थित झाले व त्यांसच अध्यक्षस्थान देण्यांत आलें. सर मोरोपंतांनीं प्रतिपक्षास उत्तर देण्याविषयीं आव्हान केलें ह्मणून नारायणराव बामणगांवकर उठले आणि त्यांनीं नेमस्तांच्या मतांचें खंडन केलें. बापूजी या सभेस अध्यक्ष असल्यामुळें सभेस अपूर्व गांभीर्य आलें होतें, व सभेस हजर असलेलें डेप्युटी कमि. आदि ऑफिसर, व गांवांतील 'शिष्ट जन' यांजवर सभेंतील पक्षोपपक्षांच्या मांडणीचा फार परिणाम झाला. बापूजींनीं या सभेंत भाषण न करतां सभेचें विसर्जन केलें, आणि त्यानंतर अमरावतीस ह्मणजे खास सर मोरोपंतांच्या गांवीं जाऊन असें दणदणीत भाषण ते हजर असतांना केलें कीं सर मोरोपंतांचा विजयानंद पार मावळला, आणि असलें वाग्युद्ध केलें नसतें तर जीं मतें त्यांना निवडणुकींत मिळूं शकलीं असतीं त्यांसहि ते आंचवले !

## डिस्ट्रिक्ट असोसिएशन.

दडपशाहीचा थैमान जोरांत होता; लोकमान्य टिळक सहा वर्षांची शिक्षा भोगत मंडाल्याच्या तुरुंगांत बसले होते; बाबासाहेब परांजपे यांस पुण्यास जाऊन रहावें लागलें होतें, अशा 'अंधतामिस्त्र' दडपशाहीच्या काळांत राष्ट्रकार्याची नौका कशी हांकावी यासंबंधींचे विचारच बापूजींच्या मनांत जाज्वल्यतेनें वास करीत असत. किंबहुना, संकटकालींच त्यांची बुद्धि ज्यास्त सतेज होते असें ह्मटलें तर तें योग्य होणार आहे. भक्कम प्रतिमल्ल दिसला ह्मणजे खऱ्या मल्लास आनंद वाटून स्फुरण चढावें, किंवा समुद्र तुफान झाला असतां पट्टीचा नावाडी असतो त्यास हर्ष वाटावा, तशी बापूजींची वृत्ति आहे. आतां सांगितलेल्या परिस्थितींत राष्ट्रीय पक्ष कॉंग्रेस-

पासून अलग होता, व त्यांचा नेता मंडाल्यास होता. बहुतेक ठिकाणचे पुढारी व कार्यकर्ते दिङ्मूढ होऊन गेले होते. अशा भीषण परिस्थितींत बापूजींनीं जनतेची सेवा करण्याचें व्रत चालविण्याकरितां जींत सर्व प्रकारच्या लोकांचा समावेश होईल अशी यवतमाळ जिल्हा संघ ( यवतमाळ डिस्ट्रिक्ट असोसिएशन ) नांवाची संस्था १९१५ सालच्या वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर स्थापन केली. लोकांना व्यवहारांत पदोपदीं येणाऱ्या अडचणींचें निवारण करणें हें तिचें ध्येय होतें, व या निमित्तानें सरकारी अमलदारांशीं पत्रव्यवहार करणें, प्रसंगोपात लोकांकडून अर्जविनंत्या करविणें, अशींहि कामें करावीं लागत. यामुळें शेतकरी, व्यापारी, उदमी, शिक्षक इत्यादि सर्व लोकांमध्यें ही संस्था फार लोकप्रिय झाली. लोकसंग्रह करणें हें जें लोकमान्यांचें धोरण तेंच लोकनायक बापूजी यांचें प्रथमपासूनच आहे. न्याय ( Justice ) ही ज्याची उपास्य देवता आहे तो मला प्रिय—मग तो मतानें नेमस्त असो कीं कोणी असो, असें बापूजी नेहमीं ह्मणत असतात. जिल्हा बोर्डांत असो, वा वरिष्ठ कायदेमंडळांत असो, निवडून पाठवायचा तो मनुष्य राष्ट्रीय दृष्टि ठेवून न्यायानें वागणारा, ह्मणजे स्वार्थहित, आप्तस्वकीयांचा फायदा किंवा स्वधर्मीयांचा पक्षपात हीं सारीं बाजूस ठेवून वागणारा असला ह्मणजे झालें, अशी त्यांची विचारसरणी आहे. संघ स्थापन झाल्यानंतर तिच्या विद्यमानें जिल्हापरिषद भरविण्याची कल्पना बापूजींनीं काढली. तेव्हां त्या दडपशाहीच्या काळांत ती भरविण्यास डेप्युटी कमिशनर परवानगी देईना तो ह्मणे कीं कायदेमंडळाचा सभासद असलेला जबाबदार गृहस्थ तिच्या अध्यक्षस्थानीं आणून बसवाल तरच मी ती भरवूं देईन. बापूजींना ही अट ह्मणजे एक इष्टापत्तिच वाटली. अशानें तरी नेमस्तांशीं सहकार्य करण्याची संधि प्राप्त होते! सरकारशीं भांडतांना नेमस्त व जहाल हे आह्मी आपसांत एकच आहोंत हें त्यांना दाखवायचें होतें, त्याप्रमाणें सर्वसंग्राहक

जिल्हासंघाकरितां नेमस्तांची सहानुभूतिहि त्यांना मिळवावयाचीच होती. शिवाय, अन्यत्र न दिसणारें दृश्य, ह्मणजे नेमस्त व जहाल यांनीं एकाच व्यासपीठावर उभें राहून एकत्रपणें राष्ट्रकार्य करणें हें त्यांना आपल्या जिल्ह्यांत दाखवावयाचें होतें. असल्या ऐक्याचा सामान्य जनतेवर विलक्षण गंभीर परिणाम होऊन त्यांचें आपणांस सहाय्य मिळेल, हाहि विचार प्रमुखपणानें त्यांच्या मनापुढें होताच; ह्मणून त्यांनीं डेप्युटी कमिशनरची ही अट मान्य करून नागपूरचे नेमस्तांत मोडणारे बॅरिस्टर मोरोपंत दीक्षित यांची अध्यक्षस्थानीं योजना केली. या परिषदेविरुद्ध सरकार नाहीं, अर्थात् तिला हजर राहण्यास व तिजमध्यें पास होणाऱ्या ठरावांची अंमलबजावणी करूं लागण्यास सर्व जनतेनें आह्मांस सहाय्य करून राष्ट्रकार्याचा रथ पुढें ढकलण्यास निर्भयपणें पुढें यावें, असें सरकारची भीति बाळगणाऱ्या सर्व लोकांस सांगण्यास बापूजींना संधि मिळाली. राष्ट्रीय कार्यांत भाग न घेतां केवळ इतिहाससंशोधन व वाङ्मयसेवा यांसच वाहून घेतलेले यशवंत खुशाल देशपांडे, एम्. ए. एल्एल्. बी. यांस या जिल्हापरिषदेच्या स्वागत मंडळाच्या अध्यक्षस्थानीं बसविण्यांत बापूजींनीं जी योजकता व संग्राहकबुद्धी प्रकट केली, तिचें त्यावेळीं फार कौतुक करण्यांत आलें, व त्यांच्या अपूर्व चातुर्याचा मासला ह्मणून अजूनहि या गोष्टीचा निर्देश करण्यांत येतो.

## प्रतिपक्षाची समजूत घालण्यांत हातखंडा.

संग्राहकत्व हा बापूजींच्या कार्यपद्धतीचा मध्यबिंदु आहे ह्मटलें तरी चालेल. १९२१ मध्यें नगरसंस्थेनें ( म्युनिसिपालिटीनें ) या शहरांत कर ( टर्मिनल टॅक्स् ) बसविण्याची योजना तयार करून ती प्रसिद्ध केली. तेव्हां ही आपल्या शहरावर एक भयंकर धोंड उपस्थित होणार, तिचा प्रतिकार करून ती हाणून पाडली पाहिजे असें कित्येकांच्या मनानें घेतलें. लोकांमध्यें आक्षेप उत्पन्न झाले होते खरें, पण नुसत्या सरकारी गॅझेट-

मधल्या प्रसिद्धीनें ही योजना गांवकऱ्यांच्या माथीं मारणें शक्य होतें; तरी तसें न करतां आपण त्यांची योग्यप्रकारें समजूत घालावी, आणि त्यांच्याच अनुमतीनें ती अमलांत आणावी या हेतूनें, बापूजी स्वतः जरी म्युनिसिपालिटींत नव्हते तरी, त्यांनीं जिल्हासंघामध्यें आक्षेपकांपैकीं प्रमुखांस बोलावून घ्यावें, त्यांच्याशीं तासतास विवाद करावा; आणि त्यानंतर नगरसंस्थेच्या चिटणीसास बरोबर घेऊन एका व्यापाऱ्याच्या माडीवर दररोज रात्रीं कांहीं प्रमुख व्यापाऱ्यांस बोलावून त्यांची समजूत घालावी असा प्रकार एक दिवस नाहीं, दोन दिवस नाहीं, आठ दिवस नाहीं, सतत तीन साडेतीन महिने चालला होता! पुष्कळसें विरोधकांचें मान्य करावें, एखादें आपलेंहि त्यांजकडून कबूल करवून घ्यावें, असें करीत करीत आक्षेपकांच्या मनांप्रमाणें बदल केलेल्या स्वरूपांत त्यांनीं ही (टर्मिनल टॅक्सची) योजना त्यांजकडून मान्य करवून घेतली, आणि ज्या दिवशींच्या नगरसंस्थेच्या सभेंत ती अखेरीस पास अगर नापास व्हायची त्या दिवशीं स्वतःचा नगरसंस्थेशीं कोणत्याहि प्रकारें संबंध नसतां ते सभेंत हजर राहिले. नगरसंस्थेच्या सभेंत हजर राहण्याचा त्यांचा जन्मांतला हा एकच आणि पहिलाच प्रसंग होय, आणि हेतु काय तर ही योनजा पास होऊन यवतमाळची नगरसंस्था द्रव्यबलानें गांवच्या सुधारणा करण्यास समर्थ व्हावी एवढाच! राष्ट्रकार्य करायचें तें बहुजनांच्या इच्छानुसार त्यांच्या कल्याणाकरितां आणि त्यांच्याच हातांनीं करावयाचें असतें, ह्मणून त्यांची यथायोग्य समजूत घालून व त्यांचें मन संभाळूनच तें केलें पाहिजे, व असें जो वागेल त्याच्याच भोंवती चार लोक जमूं शकतात; नाहींतर नुस्त्या विद्वत्तेला किंवा धनदौलतीला लोकांत कवडीचीहि किंमत मिळत नाहीं असें ते नेहमीं सांगतात.

## मुकी जनता बोलकी केली.

हें लोकसंग्रहाचें आद्यसूत्र लक्षांत बाळगून त्यांनीं जिल्हासंघाच्याद्वारें जनसेवा करण्यास प्रारंभ केला. हा कालपर्यंत बाबासाहेब

व शामरावजी देशपांडे जीं कामें वैय्यक्तिकपणें करीत तीं आतां जिल्हा-संघाच्या नांवांवर करण्यांत येऊं लागलीं. सर्व कार्यकर्त्यांनीं आपलें वैय्यक्तिक अस्तित्व या संस्थेमध्यें निमज्जित केलें. गोरगरीब जनतेची पदोपदीं मानहानी करणारी बिगार; शेतकऱ्यांपासून उघड अन्याय करून घेण्यांत येणारें महारबलुतें, जंगलविषयक तक्रारी–ज्यांनीं शेतकरी वर्ग त्रस्त करून सोडलेला होता–असले प्रश्न या संघानें चळवळीचे विषय ह्मणून हातीं घेतले. अन्यायांची दाद लावण्याकरितांच ही संस्था होती ह्मणून लोक त्यांना आपलीं गाऱ्हाणीं निवेदन करूं लागले. बापूजी हे निःस्सीम स्वातंत्र्याचे भोक्ते असतां त्यांनीं हा 'मवाळ' मार्ग कसा अवलंबिला असें कित्यकांस वाटूं लागलें; पण या कालीं सारी जनता दडपशाहीखालीं चेंगरून गेलेली होती, व युद्धांत इंग्रज सरकार गुंतलेलें असून त्यांना हिंदी लोकांचें मनुष्यबळ व द्रव्यबळ हवें होतें, ह्मणून त्यांनीं दडपशाही जरा ढिली केलेली होती, आणि त्यांच्यावरील या अडचणीचा फायदा घेऊन लोकमान्य टिळकांनीं आपल्या राष्ट्राच्या मागण्यांचा पुरस्कार जोरानें करण्याचें आरंभिलेलें होतें. त्यांच्या मागण्यास जनतेचें पाठबळ आहे हें लोकांच्या तोंडून निघणारे उद्गार, वर्तमानपत्रांतील लेख, परिषदा व सभा यांजवरून व्यक्त होत होतें. अशा परिस्थितींत दडपशाहींतून जरा बाहेर तोंड काढणाऱ्या लोकांना आपलीं गाऱ्हाणीं समोर आणण्याचें धैर्य स्वाभाविकच होऊं लागलें. त्या जनतेस बोलकी करण्याच्या उद्योगास बापूजी लागले. खेड्यांतील अज्ञ समजले जाणारे लोकहि जिल्हासंघानें भरविलेल्या जिल्हा परिषदांमधून उत्कृष्ट रीतीनें भाषणें करून आपलीं गाऱ्हाणीं स्वतःच्या तोंडानें हुबेहुब सांगूं लागले, व आपण ज्यांना शेळ्या मेंढरें समजत होतों, ते खेडवळ लोक इतक्या निर्भीडपणें सभेंतून अस्खलित भाषणें करितात, व आपल्या तोंडावर खरमरीत टीका करितात हा अदृष्टपूर्व देखावा पाहून सरकारी अमलदारहि स्तिमित होत. आजवर बाबासाहेब परांजपे व शाम-

रावजी देशपांडे यांचें वक्तृत्व लोक नुस्ते ऐकून घेत असत; पण खेड्या-पाड्यांमधील लोक सभांतून भाषणें करूं लागले ही वहिवाट येथूनच सुरू झाली. शिकलेल्या लोकांच्या भाषणापेक्षां त्यांच्या भाषणांत विशेषच लज्जत असे. अशा रीतीनें बापूजींनीं जिल्हासंघाच्या द्वारें प्रचार करून मुकी जनता बोलकी केली.

## सरकार विरुद्ध पहिला विजय.

१९१६ सालीं वऱ्हाडांत नापिकी झाली. त्यावेळीं प्रस्तुत लेखक मुंबईस ' संदेश ' नामक दैनिकांत उपसंपादकाचें काम करीत असतां दिपवाळीकरितां आपल्या गांवीं दारव्हा येथें आला होता. यवतमाळच्या मित्र-मंडळीस भेटण्याकरितां आल्यावर त्याला कल्पना सुचली कीं आपण सार्वजनिक प्रश्नांचा पिच्छा पुरविण्याकरितां जो संघ निर्माण केलेला आहे त्याच्याद्वारें जर यंदाच्या नापिकीबद्दल कांहीं ओरड केली तर तिचा कांहींना कांहीं उपयोग होईल. उपयोग झाला तर शेतकरी वर्गाचें कल्याण केल्याचें श्रेय संस्थेस मिळेल; व उपयोग न झाला तरी लोकांत जागृति करावयास सांपडेल. लेखकाची कल्पना अशी होती कीं सरकार ज्या आणेवारीचा आंकडा फुगवून शेतकऱ्यांना भक्कम पीक झालें आहे असें शाबीत करते ती आणेवारी चुकीची आहे असें सिद्ध केलें ह्मणजे आपले अर्धें अधिक काम होईल; आणि हें सिद्ध करण्याची योजनाहि लेखकानें एका पत्रद्वारें जिल्हा संघाला कळविली. पण गांवोगांवीं जाऊन, शेतकऱ्यांच्या बैठकी जुळवून, त्यांच्या पिकांचे नक्की आंकडे जमवून त्यावरून आणेवारीचा आंकडा तयार करावयाचा, या कामास लागणारें मनुष्यबळ त्यासाठीं जुळूं शकलें नाहीं; पण या कल्पनेची अंमलवारी संघानें पुढच्या वर्षी केली. पिकांची सरकारी आणेवारी चुकीची व अतिशयोक्तीची आहे हें सिद्ध करण्याकरितां जिल्हा संघानें आपल्या सभासदांची एक जबाबदार चौकशी कमिटी नेमली. तींत अण्णासाहेब जतकर, भाऊसाहेब भावे, अशासारख्या पहिल्या नंबरच्या

वकिलांनीं प्रचंड खटपट करून आपल्या कमिटीच्या आणेवारीचा आंकडा प्रसिद्ध केला, आणि शेकडों शेतकऱ्यांकरवीं सरकारकडे सारा माफी आणि सारा तहकुबीचे अर्ज पाठविले. गांवोगांवीं जाऊन, प्रत्यक्ष परिस्थितीचें अवलोकन करून, शेतकऱ्यांस आडवेतिडवे प्रश्न करून जुळविलेली माहिती व तिजवरून तयार केलेला आणेवारीचा हा आंकडा चुकीचा आहे असें ह्मणण्याची सरकारास हिंमत होईना! खाजगी रीतीनें प्रयत्न करणारे 'चळवळ्ये' एवढा प्रचंड उद्योग करूं शकतात हें पाहून त्यांची छातीच फाटली असेल! तथापि लोक ह्मणतात ती आणेवारी कबूल केली, व कायद्याप्रमाणें त्यांना शेतसाऱ्याची तहकुबी किंवा माफी दिली तर त्यांत आपली सरकारी इभ्रत ती काय राहिली? ह्मातारी मेल्याचा शोक नाहीं, पण काळ सोकावतो! लोकांची आणेवारि मान्य करावी तर ते शेफारून डोक्यावर बसतील, आणि आमच्या अंमलदारांची माहिती खोटी ठरून त्यांना सामान्य जनतेत किंमत राहणार नाहीं! अशा खोट्याच इभ्रतीची कल्पना मनाशीं बाळगणाऱ्या नोकरशाहीनें, ज्या परगण्यांत खरोखरच नापिकी झाली होती त्या परगण्यांत सारा तहकुब करण्याऐवजीं दुसऱ्याच एका परगण्यांत तहकुबी दिली, आणि जेथें जिल्हा संघानें चौकशीं करून नापिकी सिद्ध केली होती तेथील शेतकऱ्यांस खरोखरीच धडधडीत नापिकी असल्यामुळें जरा सढळ प्रमाणानें तगाई दिली! लोकांनीं आपल्या प्रयत्नानें सरकारांस तहकुबी किंवा तगाई देण्यास भाग पाडण्याचा हा पहिलाच प्रसंग होय, आणि या दृष्टीनें तो सरकारवर कमाविलेला पहिलाच सनदशीर विजय होय, असें ह्मणावयास हरकत नाहीं.

## जिल्हा संघाचें कार्य.

आपल्या भोंवतालच्या लोकांस कामें करावयास लावण्याची कुशलता, आंकडे व पुरावा जमविण्यास लागणारी हुषारी, व लोकहितार्थ अहोरात्र झटण्याची तळमळ यांचा लोकनायकांनीं या प्रसंगीं लोकांस एवढा प्रत्यय

आणून दिला आणि त्यांचे इतके आशीर्वाद घेतले कीं जिल्ह्यांतील समस्त जनतेस जिल्हासंघाचा आश्रय करण्याविषयीं विश्वास उत्पन्न झाला, आणि सरकार दरबारांत तिचें वजन जाणवूं लागलें. या संस्थेच्याद्वारें लोकहिताचीं अनेक कार्यें करावयाचीं असल्यामुळें तिच्या सभासदांत सार्वजनिक प्रश्नांचा शिस्तशीर, सांगोपांग व आंकडे प्रमाणादिकांसह अभ्यास करण्याची संवय उत्पन्न व्हावी ह्मणून दर महिन्याला एखाद्या तरी विषयाचा अभ्यास करून माहिती-जूळवून, ती निबंधाच्या रूपानें सभासदांपुढें कोणी तरी ठेवावी अशी वहिवाट त्यांनीं सुरू केली आणि संघाच्या सुरुवातीसच स्वतः "जिल्हासंघाचें ध्येय" या विषयावर एक निबंध लिहून त्यांत त्यांनीं भावी कार्याविषयीं आपल्या कल्पना प्रकट केल्या. त्यावेळचे तापदायक प्रश्न ह्मणजे 'महारबलुतें' यावर दादासाहेब काणे यांनीं, 'बिगार' या विषयावर शामरावजी देशपांडे यांनीं, तसेंच आपापल्या आवडीच्या विषयावर आबासाहेब खानझोडे, बाबूराव भट इत्यादि सभासदांनीं निबंध लिहून सभेपुढें वाचले. शिस्तशीरपणें व सर्व बाजूंनीं विचार करून मगच एखाद्या विषयावर आपलें निश्चित मत बनवायचें हा बापूजींचा देहस्वभावच आहे. हातांत संपूर्ण माहिती नसतां नुसत्या वक्तृत्वाच्या भरंवशावर श्रोत्यांच्या मनोभावना उद्दीपित करून सभा मारून नेणें हे त्यांना कधीं रुचत नाहीं. ही त्यांची कार्यपद्धती पाहिली ह्मणजे या बाबतींत लोकमान्य टिळक यांचें पदोपदीं स्मरण झाल्याशिवाय राहत नाहीं.

## जंगलसत्याग्रहाचें मूळ.

सारा तहकुबी मिळवण्याकरितां जिल्हासंघाच्याद्वारें बापूजींनीं केलेल्या प्रयत्नांचा वर उल्लेख केलाच आहे. या प्रमाणेंच लोकांची जंगलविषयक गाऱ्हाणीं वेशीवर टांगण्याकरितां त्यांनीं १९१७ च्या भर उन्हाळ्यांत पांढरकवडा तालुक्यामध्यें संघाच्या एका पोट कमिटीस फिरवून जंगल खात्यानें नुक्तीच तयार केलेली 'कार्ययोजना' ( वर्किंग प्लॅन ) कशी

शेतकऱ्यांच्या हिताची राखरांगोळी करणारी आहे हें सिद्ध करण्याकरितां भरपूर माहिती गोळा केली. जंगलामध्यें शेतीचीं व इतर गुरें चारण्याकरितां जो ' क ' वर्ग ह्मणून भाग होता त्यांतील बराचसा भाग सरकारनें या वटहुकमानें ' अ ' वर्गामध्यें ह्मणजे राखून ठेविलेल्या जंगलांत समाविष्ट केला होता, त्यायोगें चरणाऱ्या गुरांचें चरण्याचें क्षेत्र बरेंच संकुचित करण्यात आलें. कांहीं गांवीं तर हा राखून ठेवलेला जंगलाचा भाग लोकवस्तीशीं इतका निकट येऊन भिडला कीं गाय दोहत असतां तिचें वासरूं सुटलें कीं त्याची उडी नेमकीं राखींव जंगलाच्या ' अस्पृश्य ' क्षेत्रांत पडून त्याचा मालक जंगलखात्याच्या गुन्ह्यास पात्र व्हायचा ! या राखीव जंगलामुळें कांहीं खेडयांतून जंगली श्वापदांचा एवढा त्रास होऊं लागला कीं त्यांना आपल्या जीविताची व घरच्या गुरांच्या जीविताची चिन्ता पडली ! रात्रीं वाघ जणू काय वस्तीच्याबाहेर गस्त घालूं लागले ! सरकारी जंगलाचें उत्पन्न कसें तरी करून वाढवावें असा या नवीन कार्ययोजनेचा उद्देश उघडच दिसत होता. पण, जंगलचें संरक्षण व व्यवस्था हीं मुख्यतः सरकारी तिजोरींत भर टाकण्याचें साधन समजून करावयाचीं नाहींत, तर प्रथमतः शेतकरी वर्गाची सोय पहावयाची, त्यांची गुरेंढोरें यांना पोटभर चरूं द्यायचें, त्यांना लागणारें गवत, सरपण, लांकूडफांटा हीं सवलतीच्या दरानें पुरवावयाचें, आणि एवढें झाल्यानंतर बाकीच्या जंगलमधून निघेल तें उत्पन्न सरकारनें घ्यावयाचें असें हिंदुस्थान सरकारचें धोरण असल्याचें, बापूजींनीं मध्यप्रांत सरकारच्या निदर्शनास आणून या नवीन योजनेचा निषेध केला. पांढरकवडा तालुक्यांतून फिरलेल्या जिल्हासंघाच्या चौकशी समितीनें गोळा केलेली माहिती खोटी आहे असें सरकारास ह्मणतां येईना. त्या माहितीची सत्यता कसोटीस लावण्याकरितां वऱ्हाडप्रांताचे काननाधिपति ( कन्सर्व्हेटर ) यांना स्वतः त्या भागांतून या कमिटीच्या दौऱ्यानंतर फिरावें लागलें ! यावेळेस जंगल खात्याच्या अन्यायाबद्दल जमविलेली

माहिती, तिच्या आधारें पुढें सतत पंधरा वर्षे करण्यांत आलेली खटपट व लोकसंग्रह, आणि, त्या खटपटीस आलेलें अपयश हाच १९३० सालीं लोकनायकांनीं यशस्वीपणें केलेल्या कायदेभंगाचा पाया होय ! असो.

## धडाडीची चळवळ.

जिल्हासंघाच्याद्वारें प्रत्येक लहान मोठ्या सार्वजनिक हिताच्या प्रश्नाचा पिच्छा पुरविण्याचें कार्य हातांत घेऊन लोकनायकांनीं यवतमाळ शहरच्याच नव्हे, तर यवतमाळ जिल्ह्यांतील गांवोगांवच्या लोकांची बुद्धि-मत्ता, कर्तबगारी व वक्तृत्व यांची राष्ट्रकार्याशीं जोड घातली, व त्यांच्या नेतृत्वाखालीं काम करण्याचा प्रत्येकास अभिमान व भूषण वाटूं लागलें. मंडालेच्या तुरुगांतून लोकमान्य टिळक लौकरच सुटून आले व त्यांनीं सर्व परिस्थितीचें निरक्षिण करून स्वराज्यसंघाच्या (होमरुल लीगच्या) चळव-ळीस प्रारंभ केला. वऱ्हाडांतील अत्यंत कुशाग्रबुद्धीचे कार्यकर्ते ह्मणून लोकमान्यांचें लक्ष बापूजींच्या चळवळीकडे असेच. लोकमान्यांनीं १९१६ मध्यें बेळगांवास स्वराज्यसंघ स्थापण्याकरितां परिषद भरविली, तेव्हां बापू-जींनीं नियामक मंडळांत व खाजगी बैठकीवर आपली योग्यता व कार्य-कुशलता लोकमान्यांच्या प्रचीतीस आणून दिली. यानंतर स्वराज्यसंघाची प्रचंड चळवळ झाली; तींत महाराष्ट्र, विदर्भ व मध्यप्रांतांतील कोणत्याहि जिल्ह्यापेक्षां यवतमाळ जिल्ह्यांतील सभासदांची संख्या जास्त होती ! यावरून लोकनायक बापूजी अणे यांनीं केवढी दांडगी मेहनत स्वतः केली व जिल्ह्यांतील किती कार्यकर्त्यांस कार्यप्रवृत्त केलें याची वाचकांस सहज कल्पना करतां येईल ! या धडाडीच्या चळवळीनें बापूजींनीं महाराष्ट्रांतील लोकमा-न्यांच्या संपूर्ण अनुयायांत अग्रेसरत्वाचें स्थान पटकाविलें. या चळवळीच्या वेळची मुद्दाम निर्देश करण्यासारखी गोष्ट ह्मणजे नुक्तीच पांच वर्षांपासून वकिली करावयास लागलेले तरुण वकील लक्ष्मण काशीनाथ ओक यांनीं दररोज एकतरी स्वराज्य संघाचा सभासद मिळविल्याशिवाय अन्नग्रहण करा-

वयाचे नाहीं असा निश्चय करून एकट्यानें १००० सभासद मिळविले! आपल्या अनुयायांत व सहकार्यकर्त्यांत एवढी स्फूर्ति उत्पन्न करणाऱ्या नेत्याचें बळ केवढें असावें! याच प्रमाणें १९१८ सालच्या फेब्रुवारींत लोकमान्यांनीं वऱ्हाडभर आपला नामांकित स्वराज्यसंघाचा दौरा काढिला; त्यावेळींहि बापूजींनींहि त्यांचें गांवोगांवीं यथायोग्यप्रकारें स्वागत केलें. याच दौऱ्यांत बापूजींचें लोकांवरील असाधारण प्रभुत्व, लोकसंग्रह व त्यांनीं संपादिलेलें लोकप्रेम यांची जाणीव लक्षांत बाळगून लोकमान्यांनीं पुसद येथील पूसनदीच्या वाळवंटांत "ही स्वराज्याची पंढरी होय!" असें भविष्यसूचक उद्गार काढले! माधवरावजींनींहि लोकमान्यांचे चरण साक्ष ठेवून त्याचवेळीं मनांतल्या मनांत प्रतिज्ञा केली काय कोण जाणे, पण अहर्निश लोकमान्यांचेंच ध्येय डोळ्यांपुढें ठेवून व त्यांच्याच पद्धतीनें कार्य करून योग्य संधि प्राप्त होतांच याच पुसद शहरीं याच वाळवंटांत जंगल सत्याग्रहाचा बाहुटा स्वतः उभारून आपल्या गुरूंचे शब्द गुरुपौर्णिमेच्या सुमुहूर्तावर सार्थ केले! धन्य ते गुरु व धन्य ते शिष्य!

## बापूजींचें स्थिर स्मारक हेंच.

बिगार, बलुतें इत्यादि लोकांना उपद्रव देणारे प्रश्न हातांत घेऊन त्यांचा यशस्वी रीतीनें निकाल लावून जिल्हासंघानें लोकांचा विश्वास संपादन केला. बिगार व बलुतें या दोन्ही बाबतींत लोकांच्या तक्रारी वृथा व अतिशयोक्त आहेत, लक्ष घालून चौकशी करण्याच्या योग्यतेच्या त्या नाहींत असें ह्मणणाऱ्या मध्यप्रांत सरकारास बापूजींनीं सरकारी चौकशी समिती नेमण्यास भाग पाडलें आणि यद्यपि या दोन्ही समितींपुढील विचाराचे मुद्दे, [ Points of reference ] त्यांची कार्यपद्धत व त्यांजवरील कामें करणारे सभासद या सर्व बाबी समाधानकारक नव्हत्या--त्या असमाधानाबद्दल निषेध करणारे ठराव जिल्हा संघानें पास केले होते--तरी लोकांना त्या समितीपुढें साक्षी द्यावयास लावून, तत्प्रीत्यर्थ आपण स्वतः वऱ्हाडप्रांत-

भर दौरा करून, त्यांनीं या 'असमाधानकारक सरकारी चौकशी, कामावर लोकमताची छाप पाडून आपला कार्यभाग साधून घेतला. हे दोन्ही महत्वाचे प्रश्न यशस्वी रीतीनें सोडविलें याचें कारण नुस्तें सरकारी चौकशी कमिटीचें भ्रमण नसून तिच्या कामावर लोकमताचें पाडलेलें दडपण होय ! समित्यांचे अहवाल व त्यावरील सरकारचे अभिप्राय बाहेर पडल्यानंतर त्यांच्या शिफारसी अमलांत येतात कीं नाहीं यावर निगराणी ठेवण्याकरितांहि त्यांनीं जिल्हा-संघ-समिती नेमेली होती, यावरून ते हातीं घेतलेल्या कामाचा पिच्छा किती चिकाटीनें व निग्रहानें घेत होते याची कल्पना करतां येण्यासारखी आहे ! जिल्हासंघानें बापूजींच्या नेतृत्वाखालीं अशा रीतीनें काम चालविलें आहे, व टिळकांचा जसा केसरी, गोखल्यांची जशी भारत सेवा समिती, ( Servants of India Society ) लजपतरायांची जशी लोक सेवा समिती ( Servants of People Society ), मदनमोहन मालवीयांचें जसें बनारस हिंदु विश्वविद्यालय, त्याप्रमाणें बापूजींचा जिल्हा संघ हें त्यांचें खरें व स्थिर स्मारक होय.

## विदर्भ बिगार निवारक मंडळ.

बिगारीच्या अन्यायाचें उच्चाटन करण्याकरितां विशेषतः बाबासाहेब परांजपे यांचे खटपटीनें जिल्हासंघाच्या विद्यमानें 'विदर्भ बिगार निवारक मंडळ' नांवाची एक संस्था ३० नोव्हेंबर १९२० रोजीं स्थापण्यांत आली; यायोगें अर्थात्‌च तिच्या कार्यक्षेत्राचा व्याप यवतमाळ जिल्ह्याबाहेर म्हणजे संपूर्ण वऱ्हाड प्रांतांत पसरला. यापूर्वी वऱ्हाड प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष या नात्यानें बापूजींचा अमरावती, अकोला व बुलढाणा या तिन्ही जिल्ह्यांतील प्रमुख कार्यकर्त्यांशीं संबंध येतच असे, पण विदर्भ बिगार-निवारक मंडळ निघाल्यावर बापूजींच्या नेतृत्वाखालीं वऱ्हाडांतील सर्व राष्ट्र-कार्यकर्त्यांचें परस्पर संघटन उत्पन्न झालें, आणि बापूजींच्या सेनेमधील अधिकारी व अनुयायी यांची संख्या वाढली. बिगार निवारणाच्या चळ-

वळींत शामरावजी देशपांडे, बाबासाहेब परांजपे व गोपाळराव कोटेकर यांनीं अभूतपूर्व कामगिरी करून दाखविली; आणि महारवंलुत्याचें उच्चाटन करण्याच्या 'गोवर्धनोद्धारांत' खेड्यापाड्यांतील प्रत्येक नांगऱ्या 'गो-पालानें' आपली काठी उभी करून आपली सर्व शक्ति लोकनायकांच्या पायीं अर्पण केली ! या शिवाय इतर प्रत्येक महत्वाच्या सार्वजनिक बाबींत जिल्हासंघ लक्ष घालीत असल्यामुळें व्यापारी, उदमी इत्यादि सर्व प्रकारची जनता लोकनायकांच्या बाहुछ्याखालीं उभी राहिली. जिल्हासंघानें आजवर जी कामगिरी केली तिचें मुख्य श्रेय लोकनायकांच्या स्फूर्तीकडे, बुद्धिमत्तेकडे व कार्यचतुरतेकडेच आहे. अर्थात् त्याच्या कार्याचा इतिहास ह्मणजे बापूजींच्या आयुष्यांतील कामागिरीचा एक–संपूर्ण नव्हे–महत्वाचा भाग होणारा आहे. हा इतिहास प्रसिद्ध होण्याची खटपट सुरू आहे ही आनंदाची गोष्ट होय. असो.

## लोकनायकांचा अभ्यासशीलपणा.

बापूजींच्या अभ्यासशीलपणाची साक्ष ह्मणून एका गोष्टीचा उल्लेख करून यापुढील सुधारणांच्या काळाकडे वळूं. १९१५ सालीं यवतमाळास प्लेग होता, व बापूजी येथून तीन मैलांवरील लोहारे या खेड्यावर रहावयास गेले होते. तेथें रोजच्याप्रमाणें बोलायला स्नेहीसोबती विशेषसे नव्हते. मग वेळ कसा घालवायचा ? त्यांचा कल्पनाप्रचुर मेंदु स्वस्थ बसणारा नव्हे. यावेळीं इजारदारांचे हक्क संकुचित करून त्या त्या गांवच्या कुळींना तेथील शेतीचे मालक बनविण्याच्या हेतूनें सरकारनें एक वऱ्हाड कुळांचा कायदा (बरार टेनन्सी ॲक्ट) करूं घातलेला होता. तेव्हां बापूजींनीं नाना प्रकारचीं प्रमाणें, पुरावे, विविध ग्रंथ, इतर प्रांतांतील कायदे, सरकारी रिपोर्ट वगैरे जमवून त्यांचा अभ्यास चालविला. त्यांत न्यायमूर्ति रानडे यांनीं बंगाल टेनन्सी ॲक्टविरुद्ध केलेली खरमरीत टीका त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आली. रानडे कधीं आंकडे व प्रमाणें यांस सोडून बोलावयचेच नाहींत. बंगाल टेनन्सी ॲक्ट हा वरून रयतांचें हित साधण्याचें निमित्त दाखवून सरकार

पास करवून घेत आहे, तरी त्यांचा खरा उद्देश ह्मणजे एका बलवान् वर्गाचे पंख तोडण्याचा आहे, त्यानें रयतांचे खरें हित साध्य होणार नाहीं—अशा प्रकारची ती टीका होती. ती बापूजींना प्रस्तुत प्रकरणांत बरोबर लागू पडणारी आढळली. एवढा भक्कम आधार मिळाल्यावर बापूजींनीं आपल्या अशीलांची ह्मणजे इजारदारांची बाजू तयार केली आणि ती प्रमाणशीर पद्धतीनें पुढें मांडून खास प्रिव्ही कौन्सिलपर्यंत तें भांडण लांबविलें. पण सरकारनेंच स्वतः विरुद्ध पक्ष उचललेला असल्यामुळें या मुकदम्यांत इजारदारांस यश येऊं शकलें नाहीं. असो.

## ' विद्यमान डिस्ट्रिक्ट असोसिएशनच्या सेवेसीं '

डिस्ट्रिक्ट ॲसोसिएशनच्याद्वारें लोकमत प्रबल करीत राहिल्यामुळें बापूजींच्या कार्यकर्तृत्वाची छाप सरकारवर पडूं लागली. गॅझेटमध्यें एखादी महत्वाची बाब मतप्रदर्शनाकरितां किंवा आक्षेपाकरितां प्रसिद्ध झाली, आणि तिजवर जिल्हासंघानें आपलें अधिकारयुक्त मत प्रदर्शित केलें नाहीं असें सहसा घडलें नाहीं; आणि हें मत नेहमीं संपूर्ण माहितीच्या आधारावर प्रमाणयुक्तपणें स्थापित केलेलें असल्यामुळें सरकारास त्याचा विचारच करावा लागे. किंबहुना, एखादी सरकारी योजना किंवा बिल गॅझेटमध्यें प्रसिद्धीकरितां लिहिणाऱ्या सेक्रेटरीएटमधील लेखकाच्या मनश्चक्षूंसमोर बापूजींची मनोमय मूर्ति खास वसत असली पाहिजे, इतका चरित्रनायकांनीं आपला वचक सरकारांत बसविला ! दुसऱ्या बाजूनें, लोकांमध्येंहि डि. ॲसोसिएनची एवढी प्रतिष्ठा वाढली कीं आपला दुःखनिवारण करण्याचा अर्ज डेप्युटी कमिशनरकडे पाठविण्याऐवजीं तो ' विद्यमान डिस्ट्रिक्ट ॲसोसिएशनच्या सेवेसीं ' पाठविलेला बरा अशी लोकांत समजूत होऊन गेली ! असले अर्ज आले ह्मणजे या संस्थेस त्या अर्जदारांस लिहून कळवावें लागे कीं तुमच्या तक्रारींवर आह्मी योग्य त्या प्रकारें लक्ष ठेवूंच, पण तुह्मी आपला अर्ज अमुक एका सरकारी अधिकाऱ्याकडे पाठवा !

## माँड-फर्ड सुधारणांचा जन्म.

सामान्य जनतेंत या संस्थेचा एवढा मान होऊं लागला, व त्यांचें संख्याबल व नैतिकबल यांचा उपयोग स्वराज्यसंघाची सार्वभारत चळवळ अभूतपूर्ण प्रमाणावर करण्याकडे जिल्हासंघानें केला. यानंतर माँटेग्यु-चेम्स-फर्ड सुधारणांचा जन्म झाला. स्वराज्यसंघाची चळवळ लोकमान्य टिळक यांनीं एवढ्या निकरानें केली व तिच्या वतीनें ते शिष्टमंडळ घेऊन विलायतेस जाऊन आले याचाच तो परिणाम होता. त्यांवर मत प्रदर्शित करण्याकरितां कोणती शब्द योजना करावी यावर लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांच्या दरम्यान अमृतसर राष्ट्रीय महासभेच्यावेळीं सहा दिवसपर्यंत तुमुल वाग्युद्ध होउन अखेरीस प्रचंड बहुमतानें असें ठरविण्यांत आलें कीं सुधारणा जरी ' अपुऱ्या, असमाधानकारक व निराशाजनक ' असल्या तरी हातची लंगोटी समजून त्या खिशांत टाकाव्यात, आणि त्यांचा उपयोग यापुढील स्वराज्याचे खरे हक्क प्राप्त करून घेण्याकडे करावा. महायुद्धांत हिंदुस्थाननें इंग्लंडचे प्राण वांचविण्याकरितां द्रव्यद्वारा व मनुष्यद्वारा एवढी मदत केली तिचा मोबदला काय, तर अमृतसरचे हत्याकांड ! आणि स्वराज्यसंघाच्या प्रचंड चळवळीचा निष्कर्ष काय, तर असल्या फाटक्या सुधारणा ! यामुळें त्या पदरांत पाडून घेऊन लौकरच पुढील खरेंखुरें स्वराज्य प्राप्त करण्याचा निर्धार करून लोकमान्यांनीं आपल्या भावी कार्याची रूपरेषा तयार करून राष्ट्रीय लोकशाही पक्षा-( काँग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी ) चा जाहीरनामा १९२० च्या मे महिन्यांत प्रसिद्ध केला, व या पक्षातर्फेचे उमेदवार कार्यमंडळांत निवडून पाठविण्याची खटपट चालू केली. पण परमेश्वरी योजना कांहीं वेगळीच होती.

## असहकारितेचें नवयुग.

शुद्ध सनदशीर मार्गानें हा कालपर्यंत चालत आलेल्या राजकारणांत लोकांच्या प्रत्यक्ष बलाची ( Direct action ) भर पडावयास पाहिजे

असा ईश्वरी संकेत होता. असें यापुढें झालेल्या प्रकारांवरून व राजकारणांस दिल्या गेलेल्या नवीन वळणावरून ह्मणावयास पाहिजे. लोकमान्य एकाएकीं १ आगस्ट १९२० रोजीं कालवश झाले, आणि महात्मा गांधी या उदयोन्मुख प्रभावी पुढाऱ्यानें काँग्रेसच्या राजकारणास नॉन–को–ऑपरेशन ह्मणजे सरकारशीं संपूर्ण असहकारिता करण्याचें अभिनव वळण लावून दिलें. कांहीं एका विशिष्ट कार्यपद्धतीनें आजवर काम करीत आलेल्या टिळकानुयायांस हें मत पसंत पडलें नाहीं, व त्यानंतर सात आठ वर्षांच्या कालांत सबंध महाराष्ट्रभर या दोन मतांच्या अभिमान्यांत व कार्यकर्त्यांत फारच तीव्र मतभेद पडला. कलकत्ता स्पेशल काँग्रेसमध्यें म. गांधी हे नॉन–को–ऑपरेशनचा ठराव आणणार होते, त्यावेळीं बहुतेक हिंदुस्थान या नवीन मतास येऊन मिळाला असल्याचें पाहत असतांहि बापूजींनीं या प्रचंड बहुमताविरुद्ध आपल्या मताची मांडणी करावयास कमी केलें नाहीं. त्यावेळीं बापूजी व त्यांचे वऱ्हाडांतील २७ अनुयायी यानींच विरुद्ध मतें दिलीं !! सरकारविरुद्ध जनता हें दृश्य मोठ्या प्रमाणावर उभें करून निकराचा लढा केला पाहिजे हे त्यांचें मत होतेंच, पण सरकारशीं साहचर्य करणें ह्मणजे त्यांच्याशीं सहकार्य करणें होय, व ह्मणून त्यांजशीं जेथें जेथें संबंध पडतो तेथून आपण सर्वस्वीं दूर राहिले पाहिजे अशी जी विचारसरणी प्रवृत्त झाली होती ती त्यांच्या तर्कशास्त्रास व व्यावहारिक अनुभवास पटेना. कलकत्ता काँग्रेसला जमलेल्या महाराष्ट्रीयांपैकीं बहुतेकांनीं या नवीन प्रकारच्या राजकारणाच्या अगतिकत्वानें ह्मणा, किंवा या नवीन मताची शास्त्रशुद्धता पटली ह्मणून समजा, या नवीन राजकारणाचा उघड उघड स्वीकार केला. बापूजींनीं मात्र कलकत्त्यास करावयाचा तितका कसून विरोध केला, पण प्रचंड बहुमत असहकारितेच्या बाजूस झुकलें असल्यामुळें तो ठराव पास झाला, आणि असहकारितेचें नवयुग सुरू झालें.

## प्रचंड लोकमताच्या प्रवाहाविरुद्ध.

कलकत्ता काँग्रेस आटोपून परत आल्यानंतर पाहातात तों सर्वच स्थितींत पालट पडलेला ! ज्याच्या त्याच्या तोंडीं असहकारिता आणि संपूर्ण स्वातंत्र्य व लोकसत्तात्मक राज्यपद्धति ( रिपब्लिक ) !! ज्या स्वातंत्र्याच्या ध्येयानें प्रेरित होऊन बापूजींनीं आजवर आपलें बुद्धिसर्वस्व राष्ट्रकार्यास अर्पण केलेले तें ध्येय प्राप्त करण्यास राष्ट्र बद्धपरिकर झालें हें पाहून त्यांना पराकाष्ठेचा हर्ष झाला असेल हें सांगावयास नकोच; पण आपल्या राष्ट्रांतील जनतेची कुवत आणि हें उच्च ध्येय साध्य करण्याकरितां आखण्यांत आलेला राजकीय कार्यक्रम यांचा विचार करतां या नवीन पद्धतीनें हें ध्येय साध्य होईल हें त्यांस पटेना, व ह्मणून कलकत्ता स्पेशल काँग्रेसनंतर दरवर्षीची मामुली काँग्रेस १९२० च्या डिसेंबरांत नागपुरास भरावयाची होती तो प्रांत आपला, आणि त्या प्रांतांतील लोकमत या ठरावाच्या विरुद्ध आहे असें दर्शविण्याचा उद्योग त्यांनीं आरंभिला. वऱ्हाडप्रांतभर त्यांनीं बिगार व बलुतें या बाबतींत प्रचंड जागृति करून जनतेचीं गाऱ्हाणीं यशस्वी-रीतीनें नाहींशीं करून दाखविण्याचा खटाटोप चालविलेला होता व त्यामुळें गांवोगांवचे कार्यकर्ते त्यांच्या नेतृत्वाखालीं कामें करीत होते. त्यांनीं हें नवीन धोरण सद्यःफलदायी होणार नाहीं, कायदे मंडळांत प्रवेश करून प्रचंड जनता सरकारच्या विरुद्ध आहे व ती आपला विरोध त्यांच्या तोंडा-वर प्रगट केल्याशिवाय राहणार नाहीं, या मताचा प्रसार चालू केला, आणि ठिकठिकाणचें वऱ्हाडांतील लोकमत बापूजींस अनुकूल झालें. कारण, बिगार व बलुतें या अत्यंत तापदायक बाबींचा निकाल बापूजींच्या नेतृत्वाखालीं ते सांगतील त्या मार्गानें लढूनच लावतां येईल असा वऱ्हाडांतील समस्त कार्यकर्त्यांचा विश्वास होता. वऱ्हाडभर त्यांच्या मताचा प्रचार सुरू होता हे ' लोकमत, ' ' उदय ' व ' प्रजापक्ष ' या वर्तमानपत्रांच्या तेव्हांच्या फायली चाळल्या असतां सहज दिसून येणार आहे. बापूजींनाहि आपल्या मताच्या

खंबीरपणाचा एवढा विश्वास होता कीं नागपूरशहरांतील सुशिक्षित लोकमत आपल्या बाजूनें वळविण्याकरितां नागपूर कॉंग्रेसच्या आधीं थोडे दिवस त्यांनीं तेथें जाऊन तळ ठोकला, आणि व्याख्यानमालिका दिली. त्यांची तर्कशुद्ध विचारसरणी, प्रभावी वक्तृत्व व तोंडांतून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक शब्दामागें स्पष्टपणें दिसून येणारी राष्ट्रकार्याची तळमळ यांचा तेथील सुशिक्षित वर्गावर बराच खोल परिणाम झाला. प्रचंड जनसमूहाच्या मताविरुद्ध जाणाऱ्या या वक्त्याच्या अंगावर एका जाहीर सभेंत कोणी एकानें क्षुब्ध होऊन पादत्राणहि फेकलें, पण बापूजींनीं त्याकडे यत्किंचित्‌हि लक्ष दिलें नाहीं; उलट हा पाजीपणा करणाऱ्या इसमाचीच सभेंतील लोकांनीं हजरी घेतली ! पण अखेरीस नागपूर कॉंग्रेसला जमलेल्या सुमारें १५–२० हजारांच्या समुदायानें म. गांधी यांचा असहकारितेचा ठराव पास केला, आणि कलकत्ता स्पेशल कॉंग्रेसच्या धोरणावर आपल्या मताचें शिक्कामोर्तब केलें.

## कौन्सिल बहिष्कारास विरोध.

असहकारितेचा पुरस्कार राष्ट्रीय सभेनें केला तो बापूजींस पूर्णपणें पटला नाहीं, ह्मणून आजवर ज्या कॉंग्रेसच्या आश्रयानें लोकांत जागृति ते करीत होते, तिजविरुद्ध मत प्रदर्शन करण्याचा व त्या मतास अनुसरून कामें करण्याचा त्यांजवर चमत्कारिक प्रसंग येऊन पडला ! जनता ह्मणजे जीवन असें समजणारा हा पुढारी आतां राष्ट्रीयसभेशीं मतभेद दर्शवून कायदेमंडळाच्या मोहांत कसा पडला, याचें कांहींकांस आश्चर्य वाटलें. पण त्यांनीं धारण केलेली भूमिका कोणत्या पायावर रचलेली होती याचें रहस्य त्यांना कळेना. या नवीन असहकारितेच्या नांवाखालीं अज्ञलोकांना राष्ट्रकार्यास जुंपणें हा जो तिच्या मूळ उत्पादकाचा मुख्य उद्देश तो बापूजींस मान्यच होता, पण अशा रीतीनें समरांगणावर टाकलेले नवसैनिक हे प्रत्यक्ष राष्ट्रकार्य करण्यापेक्षां परस्परांचा उपहास करून, व आपापल्या

मतानें राष्ट्रसेवा करणारांस तुच्छ लेखतील व त्यामुळें कार्य हानी होण्याचा संभव आहे असे त्यांस वाटे.

## विरोधाचें स्वरूप.

पण या किरकोळ तपशिलापेक्षां बापूजींचा विरोध असहकारीतेच्या मुळ कल्पनेशींच होता. त्यांचें ह्मणणें असें होतें कीं परकीय सत्तेचें उच्चाटन करावयाचें तें सर्वंध देशभर असंतोषाचा व प्रत्यक्ष प्रतिकाराचा वणवा पेटवून केलें पाहिजे. आपण असें एकहि स्थान मोकळें सोडतां कामा नये कीं जेथें वन्हिदग्ध नोकरशाहीला आश्रयास उभें राहतां येईल. ह्मणून असहकारितेच्या विधायक कार्यक्रमाबरोबरच कौन्सिलांतूनहि सरकारवर मारा करावयास पाहिजे. या विरोधांचें प्रतिपादन करतांना ते ज्या एका मुद्यावर भर देत तो असा कीं नोकरशाहीचें राज्ययंत्रच बंद पाडलें पाहिजे; पण तें काम नुस्तीं कोर्टें, कचेऱ्या व कौन्सिलें हीं ओस पाडण्याचा निष्फळ प्रयत्न केल्यानें व्हायचें नाहीं; तर एकसमयावच्छेदानें सर्व प्रकारच्या वर्गांत हल्लींच्या राज्यपद्धतीविरुद्ध असंतोष पसरवून त्याची मजल येथवर पोहोचविली कीं राज्यकारभार चालविणें अशक्य व्हावें, याला ते " राष्ट्रियसंप " असें नांव देत. असला संप घडवून आणावयाचा असला तरच कॉंग्रेसच्या असहकारितेच्या कार्यक्रमाचा कांहीं उपयोग, पण या कार्यक्रमाचा उद्देश तसा नाहीं, एवढेंच नव्हे तर त्याचा उपयोग नोकरशाहीचें बळ संपुष्टांत आणण्याऐवजीं आपसांत एकमेकांचीं मनें दुखवून व कांहीं विशिष्ट वर्गांविरुद्ध ओरड करून त्यांना राष्ट्रसेवेच्या कार्यापासून परावृत्त करणें याकडेच होईल असें त्यांना वाटे, व ह्मणून या ऐन असहकारितेच्या काळांत ते कौन्सिलविषयक धोरणाच्या बाबतींत कॉंग्रेसशीं सहमत होऊं शकले नाहींत.

## मध्यप्रांत कौंसिलच्या निवडणुकी यशस्वीपणानें लढविल्या.

कौंसिलांत पूर्ण राष्ट्रीय बाण्याचे धैर्यवान प्रतिनिधि निवडून पाठविले पाहिजेत असें त्यांचें मत असल्यामुळें त्यांनीं मॉंट-फर्ड सुधारणानंतर विस्ता-

रिलेल्या नवीन कौंसिलांच्या पहिल्या निवडणुकी लढविण्याचें निश्चित केलें, व बाबासाहेब परांजपे, शामरावजी देशपांडे, अण्णासाहेब जतकर, दादासाहेब काणे व स्वतः अशांच्या सह्याखालीं जाहीरनामा काढून कौंसिल निवडणुकी लढविल्या पाहिजेत असें आपलें मत प्रसिद्ध केलें. उघड उघड कॉंग्रेसच्या धोरणास विरोध करणारा हा संपूर्ण महाराष्ट्रांतील पहिलाच जाहिरनामा होता ! मुंबई इलाख्यांतील कांहीं महाराष्ट्रीयांनीं पोटांतून कॉंग्रेसचें धोरण मान्य नसतांहि प्रचंड लोकमतास मान तुकवून कौन्सिलप्रवेश अमलांत आणण्यास मदत केली. इकडे बापूजी अणे यांनीं कौंसिलांत राष्ट्रीय वृत्तीचे प्रतिनिधि पाठविण्याचें धोरण निश्चित केलें ! मात्र स्वतःविषयीं कोणाचा गैरसमज होऊं नये ह्मणून ते कोठल्याहि जागेकरितां उभे राहिले नाहींत, व त्यांनीं आपले जीवलग स्नेहि व कार्यकर्ते अण्णासाहेब जतकर यास दिल्लीच्या वरिष्ठ कायदेमंडळांत ( लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्लींत ) निवडून पाठविले, आणि डिस्ट्रिक्ट ॲसोसिएशनचा एक खंबीर आधार असलेले व चिकाटीचे कार्यकर्ते दादासाहेब काणे यांस मध्यप्रांत कायदेमंडळांत निवडून पाठविले. सर्व हिंदुस्थानभर असहकारितेच्या मतानुसार त्या त्या प्रांतांतील कौंसिलांत कॉंग्रेसविरोधी लोकांच्या मतांचें प्राबल्य झालें असतां मध्यप्रान्त कौंसिलांत नोकरशाहीचे दांत उपटणारे सभासद जाऊन बसले होते, व ह्मणूनच प्रिन्स ऑफ वेल्सच्या आगमनाबद्दल अभिनंदन करण्याच्या ठरावास याच कौंसिलांत विरोध होऊं शकला ! त्याचप्रमाणें, अबकारी खात्याचें अंतिम ध्येय मद्यपान अजीबात बंद करण्याचें आहे या मताची घोषणा इतर कोणत्याहीं प्रांतांत आजवर झाली नव्हती ती या प्रांताच्या कौंसिलनेंच मध्यप्रांत सरकारच्या तोंडून वदविली. अर्थात् कॉंग्रेसचे असहकारितावादी पुढारी कौंसिलच्या बाहेर राहून ज्या मतांचा पुरस्कार करीत होते त्यांचाच अनुवाद मध्यप्रांताच्या कौंसिलांत जाऊन बसलेले राष्ट्रीयबाण्याचे प्रतिनिधि करीत होते.

हें असहकारितेचें नवयुग उदित होण्यापूर्वी एक वर्ष म्हणजे ४ एप्रिल १९१९ पासून बापूजींच्या मतांचा पुरस्कार करण्याकरितां प्रस्तुत लेखकानें विशेषतः बाबासाहेब परांजपे, गणपतराव माळवी, यशवंत खुशाल देशपांडे व दादासाहेब काणे यांच्या मदतीनें 'यवतमाळ मुद्रण मंडळ' नांवाची कांहीं निवडक स्नेह्यांनीं बनविलेली अशी एक संस्था स्थापन करून, तिच्या मालकीचा एक छापखाना खरेदी केला व 'लोकमत' नांवाचे मराठी साप्ताहित सुरू केलें होतें. बापूजींच्या धोरणाशीं समरस झालेल्या त्यांच्या सहकार्यकर्त्यांचे विचार या पत्रांत प्रकट केले जात. या पत्राच्याद्वारें बापूजींचीं भाषणें व मतें प्रसिद्ध केलीं जात, व त्याचा त्यांच्या संघटन कार्यास पुष्कळच उपयोग झाला. उदय व प्रजापक्ष हींहिं पत्रें बापूजींच्या जीवलग स्नेह्याचीं असत. या तिन्ही पत्रांमुळें बापूजींच्या मताची छाप संपूर्ण वऱ्हाडवर राहूं शकली. 'लोकमत' हें पत्र १९३० च्या जून महिन्यापर्यंत अव्याहत चालत आलें, पण जंगल कायदेभंग करण्याचें बापूजींनीं निश्चितपणें जाहीर केल्यानंतर सरकारनें ऑर्डिनन्सचा वरवंटा त्याजवर फिरविला त्यामुळें तें बंद पडलें. पुनश्च गेल्या विजयादशमीपासून तें त्र्यंबक सदाशिव उर्फ बाबासाहेब बापट, बी. ए. एल्एल्. बी. या तरुण व उत्साही संपादकाच्या संपादकत्वाखालीं चालू झालें आहे. व १९३२ च्या जादा वट हुकुमामुळें बंद आहे, असो.

## केवळ राष्ट्रकार्यार्थच वकिलीचा धंदा.

कॉंग्रेसच्या कौंसिलविषयक धोरणाशीं बापूजींचा विरोध होता. त्या आठ नऊ वर्षांच्या अवधींत त्यांना वऱ्हाड प्रांताच्या कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्षाचें काम करावें लागलें. देशभर कौंसिलबहिष्काराचा बोलबाला सुरू; पण त्याविरुद्ध असलेला मनुष्य एका प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचा अध्यक्ष, असा विचित्र देखावा या प्रांतांत होता! त्यांनीं स्वतःच्या मतांचा त्याग न करितां

'कट्टर' असहकारितावाद्यांना त्यांच्या त्यांच्या कार्यांत मदत केली, आणि निष्कपटपणें वागून त्यांचें प्रेम संपादन केले. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी-मध्यें महात्मा गांधी यांच्या मताविरुद्ध प्रतिपादन करण्याचे प्रसंग त्यांजवर नेहमीं येत. एकदां दिल्ली येथें ऑल इं. कॉं. कमिटीची सभा झाली तींत माधवरावजींनीं स्वमतसमर्थनार्थ जो युक्तिवाद केला तो पाहून म. गांधीं यांनीं आपल्या "यंग इंडिया" नामक इंग्रजी साप्ताहिकांत 'The calm logic of Mr. Aney' (मि. अणे यांचा अकुण्ठित युक्तिवाद) असे प्रशंशोद्गार काढले होते! ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीवर ते मानाकरतां राहिले नाहींत, तर केवळ कामाकरितां राहिले. ती सभा मुंबईस असो, कलकत्ता-अहमदाबादेस असो, कीं कराची वेझवाड्यास असो, ते हजर राहिले नाहींत असें सहसा झालें नाहीं. नॉन-को-ऑपरेशनच्या ठरावास अनुसरून त्यांनीं आपली वकिली सोड-ल्याचें कधींच जाहीर केलें नाहीं, पण राष्ट्रकार्यार्थ त्यांनीं १९२० पासून आपल्या निर्वाहाच्या या धंद्यावर जवळपास पाणी सोडल्यासारखेंच आहे. त्यांची प्राप्ति पहिल्या प्रतीच्या वकिलाइतकी होती, तरी त्यांची घरांतील राहणी अगदीं सामान्य वैदिक ब्राह्मणाच्या घरच्यासारखीच राहिली, कारण, धंद्यांत कमाई करण्याचा उद्देश राष्ट्रकार्य करतां यावें एवढाच होता. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या सभेस जाणें, कॉंग्रेसला जाणें, (लखनौ कॉंग्रेसपासून त्यांनीं एकहि कॉंग्रेस टाळली नाहीं.) जिल्हा परिषदा, परगणा परिषदा यांस जाणें, राष्ट्रीय शाळा, वाचनालयें किंवा आखाडे उघडण्यास जाणें; व्याख्यानांचे दौरे काढणें, हिंदु-मुसलमानांचे तंटे मोडण्यास जाणें इत्यादि प्रवासाप्रीत्यर्थ त्यांचे वर्षास दोन अडीच हजार रुपये खर्च होत असत! यावरून त्यांचा खाजगी प्रपंच कितपत थाटामाटाचा असेल याची वाचकांनींच कल्पना करावी! गुदस्तांचें वर्ष कायदेभंगाच्या धामधुमींत गेलें, तो वेळ व्याख्यानांच्या दौऱ्यांत आणि तुरुंगवासांत गेला, पण त्याच्या

आधींच्या वर्षी देखील ते काय ते फक्त २७ दिवसच कचेरींत गेले! यावरून त्यांच्या अहर्निश देशसेवेच्या तळमळीची कल्पना करतां येईल!

## वकिलीच्या धंद्यांतील लौकिक.

वकिलीच्या धंद्यांत इतकें दुर्लक्ष असतां त्यांची कायद्याच्या मूळ तत्वांची पकड केवढी दांडगी आहे, आणि त्यांची बुद्धि व स्मरण-शक्ति केवढी लोकोत्तर आहे याची कल्पना येण्याकरितां यवतमाळच्या बाररूममधील एका नामांकित वकिलाच्या तोंडचे उद्गार सांगतों ते पहा. बापूजी अणे वकिली करावयास लागले तेव्हांपासूनहि ते बाररूममध्यें कधी रंगले असे नाहींत. कारण त्या धंद्याची किंवा द्रव्योत्पादनाची आवड त्यांना नसून त्यांचें अंतरंग बाळपणापासून देशसेवेच्या विचारांनींच व्याप्त झालेलें होतें; व वकिलीचा धंदा हा केवळ उदरनिर्वाहार्थच त्यांना करावा लागला. म्हणून कचेरीचें काम केव्हां संपतें, व घरीं जाऊन गप्पा मारायला मी केव्हां मोकळा होतों अशी त्यांची वृत्ति असे. घरीं गेल्यावर त्यांची वाट पहात बसलेला कोणीं नाहीं असें सहसा होत नसे, पण असा कोणी नसला म्हणजे त्यांचें वाचन चालें. गेल्या सुमारें पंधरा वर्षांपासून तर त्यांचें बाररूममध्यें जाऊन बसणें जवळपास बंदच झालेलें आहे, व तेथें तिष्ठत बसण्याचा एखादे वेळीं प्रसंग आलाच तर तेथील कायद्याचीं पुस्तकें ते चाळित बसतात. पण एव-ढ्याशा वाचनानें त्यांना झालेलें 'केस लॉ' चें ज्ञान एवढें दांडगें असतें कीं त्याला उद्देशून वरील नामांकित वकिलानें असे उद्गार काढले कीं, "आह्मी वर्षाचे ३६५ दिवस याच धंद्यांत रात्रंदिवस राबणारे असता आह्मांला आढळत नाहीं असा एखादा मुद्दा किंवा आधार बापूजी त्याच पुस्तकांतून चटकन कसा काढून दाखवितात कोण जाणे!"

## बापूजींच्या पायाचा भोंवरा.

नागपूरच्या कॉंग्रेसपासून बापूजींनीं राष्ट्रकार्याचा भार वऱ्हाड प्रांताचे पुढारी म्हणून उचलला, व तेव्हांपासून त्यांना यवतमाळ शहरच्या स्थानिक

प्रश्नांत लक्ष घालावयास सवडच मिळेनाशी झालेली आहे. आणि लेजि-स्लेटिव्ह ॲसेंब्लीमध्यें वऱ्हाड प्रांताचे एकमेव प्रतिनिधि ह्मणून निवडून गेल्यापासून तर प्रांताच्या बाहेरील परिस्थिति हाहि त्यांच्या मननाचा विषय झालेला असल्यामुळें ते जणों काय यवतमाळचे राहिलेच नाहींत असें झालें आहे ! ॲसेंब्लीकरितां दोन दोन तीन तीन महिने दिल्ली सिमल्यास; ऑल-इंडिया--कॉंग्रेस कमिटीकरितां मुंबई—कलकत्त्यास; रेल्वे बोर्डच्या फिनान्स कमिटीचे सभासद ह्मणून कोहट—पेशावरास; आणि गांवीं येऊन राहतांच त्यांना महत्वाच्या मुकदम्याकरितां नागपूरास, किंवा एखाद्या समारंभाकरितां घेऊन जाण्याकरितां टपून बसलेल्या लोकांच्या गांवीं—असा त्यांचा वेळ यवतमाळ शहरापेक्षां यवतमाळच्या बाहेरच ज्यास्त जात आहे. एकदां असें झालें कीं बरेच दिवसाचा प्रवास करून ते घरीं आले, आणि घरांत पाय ठेवतात न ठेवतात तोंच अहमदाबादेहून एक अर्जंट तार आली कीं 'ताब-डतोब निघून येणें.' झालें, घाईघाईनें स्नानसंध्या व जेवण आटोपून मोटरनें ते रवाना झाले. यावेळीं त्यांचा लहान मुलगा गणू घरीं नव्हता. तो शाळेंतून घरीं परत आल्यानंतर बोरीकरांनीं [ भास्कर वामन बोरीकर नांवाचे स्वतंत्र धंदाकरून उदरनिर्वाह करणारे एक राष्ट्रकार्यप्रेमी तरुण बापूजींच्या घरची व्यवस्था घरच्या माणसाइतकी दक्षतेनें करतात व कित्येक वेळीं आपला धंदा बाजूस ठेवून बापूजींच्या बरोबर बाहेर महिनामहिना फिरावयास जातात. हे एक अत्युत्कृष्ट व जलद टायपिस्ट आहेत. ] गणूला झटलें गणू ! बापूजी येऊन पुनः गेले देखील ! त्याचा यावर विश्वास बसेना. तो ह्मणाला बापूजी आलेच नाहींत; कोठें आहे त्यांची ट्रंक ? तुह्मी कांहींतरी खोटें सांगतां ! काम आटोपून बापूजी घरीं परत आले. तेव्हां गणूनें आठवण ठेवून बापूजींना पहिला प्रश्न केला, होय कांहो बापूजी, तुह्मीं त्या दिवशीं घरीं आलां होतां ? हे पहा बोरीकर मला खोटेंच सांग-तात ! बापूजींनीं त्याला हंसून झालेला प्रकार सांगितला व तो गप्पच

बसला. देशहितार्थ झटण्याकरितां पायास भोंवरा लावून गेलेले देशभक्त बापूजीसारखे दुर्मिळच !

## कर्तव्यनिष्ठा.

गंगाधर नागोराव उर्फ तात्यासाहेब हूड, वकील, यांच्या कल्पनेनुसार जिल्हाभर परगणा स्थापन करण्याचा उपक्रम सुरू झाला, तेव्हांपासून राष्ट्रीय मतांचा प्रसार खेड्यापाड्यांतून फार मोठ्या प्रमाणावर व पद्धतशीर रीतीनें करण्याचें साधन उपलब्ध झालें. बापूजी शक्य तोंपर्यंत असल्या सभांस नियमानें हजर राहतात; व ते येणार असें कळलें कीं परगणासभांस लोकहि दूरदूरचे जमतात. या ठिकाणीं जमणाऱ्या निरक्षर खेडवळांच्या अंतःकरणाशीं ते केवढे समरस होतात, आणि ह्मणून असल्या सभांस ते केवढे निर्धारानें हजर राहतात हें पुढील एका प्रसंगावरून ध्यानांत येईल. एकदां भर उन्हाळ्यांत–हें साल १९१९ किंवा १९२० असावें–मुंबईस राष्ट्रीय पक्षाची सभा सरदारगृहांत झाली. ती सभा आटोपून त्यांना मेलनें तावडतोब निघून दुसऱ्याच दिवशीं ठरविलेल्या एका परगणा सभेस हजर रहावयाचें होतें. बापूजींचा हा कार्यक्रम लोकमान्य टिळकांना माहीत नव्हता. ह्मणून त्यांनीं बापूजींना कांहीं महत्वाच्या बाबतींत खाजगी रीतीनें व सावकाशीनें बोलण्याकरितां 'पुण्यास एक दिवसाकरतां चला' असें ह्मटलें. परमपूज्य अशा गुरूंच्या शद्बास नाहीं असें थोडेंच ह्मणायचें. पण त्यांनीं उत्तर दिलें, मला उद्यांच्या परगणा सभेस हजर राहण्याची परवानगी द्या; ती आटोपून मी पाहिजे तर पुण्यास येतों, असें ह्मणून त्यांनीं लोकमान्यांची परवानगी घेतली, व रेल्वे सोडून दूर असलेल्या त्या परगणासभेस नेमके येऊन दाखल झाले ! या त्यांच्या कर्तव्यप्रेमाचा व तळमळीचा लोकमान्यांच्या मनावर केवढा परिणाम झाला असावा, आणि आपल्या या कार्यकुशल शिष्याबद्दल त्यांना केवढे कौतुक वाटलें असावें याची कल्पना वाचकांनींच करावी ! " महत्वाचें काम, टिळकांबरोबर पुण्यास जातों, येणें होत नाहीं

दुःखी " अशी बारा आण्याची तार त्यांना सहज पाठवितां आली असती; पण टिळक प्रेमानें बोलावतात व त्यांच्या पुण्य सहवासाचा आपणांस लाभ मिळतो, या विचारानें पुण्यास जाण्याऐवजीं ते आपल्या कतर्व्य-निष्ठेस्तव एवढा प्रवास करून एका खेड्यांत आले. गोष्ट अगदींच छोटी व दिसावयास किरकोळ, पण या एका लहानशा प्रसंगावरून त्यांच्या अंतःक-रणाचा ठाव लागतो. असो.

## स्वराज्यपक्षाची स्थापना.

कौन्सिलप्रवेशाच्या एकाच बाबतींत बापूजींचा कॉंग्रेसच्या धोरणाशीं मतभेद होता, व तो त्यांनीं अखेरपर्यंत असाच सुरू ठेविला. या अवधींत कौन्सिलमध्यें राष्ट्रीय धोरणाचे प्रतिनिधि निवडून पाठविण्याच्या कामावर, त्याचप्रमाणें ते कौन्सिलांतील कामें कशीं करताहेत याजवर त्यांचें लक्ष सदा वेधलेलें असे. बॅ. रामराव देशमुख, बाबासाहेब खापर्डे, दादासाहेब काणे, यादवराव काळे, रामभाऊ कानिटकर, माधवराव कोल्हे इत्यादि-कांना बापूजींचा सल्ला अवश्य होऊन बसला. कौन्सिलप्रवेशास कॉंग्रेसचे मत अनुकूल करून घेण्याकरितां बापूजींनीं जे जंगी प्रयत्न केले त्याचेंच फळ ह्मणजे गया कॉंग्रेस समाप्त होतांच त्याच शहरीं १ जानेवारी १९२२ रोजीं स्थापन करण्यांत आलेला ' स्वराज्य पक्ष ' होय. हा कालपर्यंत कॉंग्रेसच्या कौन्सिलबहिष्कारांत गुरफटलेले पं. मोतीलाल नेहरू व गया कॉंग्रेसचे अध्यक्ष देशबंधु चित्तरंजन दास यांना असला एक पक्ष स्थापन करण्याची आवश्यकता पटवून देणें, व त्यांजकडून तें कार्य करवून घेणें याला केवढी शक्ती खर्च करावी लागली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी ! बापूजींच्या मागे नुस्ता वऱ्हाड प्रांतच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्र आहे हें पं. मोतिलाल व दे. बं. दास यांच्या लक्षांत येऊन चुकलें होतें. बापूजी जीं मतें बोलत तीं केवळ पुस्तकांतील सूत्रें व सिद्धांत नसून त्यांनीं आपल्या प्रांतांत घडवून आणलेल्या परिस्थितीचें तें चित्र असे, यामुळें

मोतीलाल नेहरू व चित्तरंजन दास यांच्या आदरास ते पात्र झाले होते. काँग्रेसशीं मतभेद असतां तिची शिस्त न मोडतां तिजमध्यें राहूनच त्यांनीं स्वराज्य पक्ष स्थापिला, व एकप्रकारें तिजविरुद्ध बंडाचें निशाण उभारलें!

## हिंदुस्थानच्या राजकारणावर प्रभाव.

हें 'बंड' यशस्वी करण्याकरितां त्याची पूर्व तयारी ह्मणून अखिल महाराष्ट्रांतील पुढाऱ्यांचें एकीकरण करण्यांत, समस्त प्रतिनिधींची आकोला येथें १ डिसेंबर १९२१ रोजीं आखिल महाराष्ट्रीय परिषद भरवून व तिच्या द्वारें आपल्या मताची घोषणा करून काँग्रेसला आपल्या मतांत बदल करण्याची सूचना करण्यांत बापूजींनीं जें अपूर्व कौशल्य, बुद्धिमत्ता व लोकसंग्रहशक्ति दर्शविली ती अवर्णनीय आहे. या आखिल महाराष्ट्रीय परिषदेच्याद्वारें बापूजींनीं हिंदुस्थानच्या राजकारणावर आपल्या कर्तृत्वाचा शिक्का बसविला, व काँग्रेसच्या धोरणाचा ओघ आपल्या मतानुसार वळविला! स्वराज्य पक्ष स्थापन केल्यानंतर मोतीलाल नेहरू व दास यांचे बापूजी हे जिवलग स्नेही व विश्वासू सल्लागार बनले. या पक्षानें १९२३ च्या दिल्लीच्या स्पेशल काँग्रेसच्या अधिवेशनांत असहकारवाद्यांकडून ( कौन्सिल बहिष्कारवादी बहुमतवाल्या काँग्रेसपक्षीयांकडून ) तडजोड करवून घेतली, आणि या कौन्सिलप्रवेशावर त्याच सालच्या कोकोनाडाच्या काँग्रेसकडून तिच्या मान्यतेचा शिक्कामोर्तब करवून घेतला! अशा रीतीनें काँग्रेसमधील प्रचंड बहुमतास जी गोष्ट नागपुरच्या अधिवेशनाचे वेळीं मुळींच रुचत नव्हती, ती स्वराज्य पक्ष स्थापून कौन्सिलवादी अल्पसंख्याकांनीं काँग्रेसला मान्य करावयास लाविली, आणि आपल्या बुद्धिमत्तेचा ध्वज काँग्रेसवर फडकाविला! बापूजी हे वऱ्हाड प्रांतांतील स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष होते. यावेळीं या पक्षाच्या मतांचा प्रसार करावयास एखादे इंग्रजी दैनिक हाताशीं पाहिजे होते. एवढ्यांत दे. बं. दास यांनीं कलकत्यास फॉर्वर्ड नांवाचें एक इंग्रजी दैनिक सुरू केलें. बापूजींनीं दासबाबूंना

बुलढाणा येथें ७ मे १९२३ रोजीं भरलेल्या वऱ्हाड प्रांतिक परिषदेच्या अध्यक्षस्थानाकरितां आणले, आणि या फॉर्वर्ड पत्रास या प्रांतांतून सहाय्य करण्याचा एक ठराव पास करवून घेतला. तपस्वी डॉ. बाबासाहेब परांजपे यांच्या सहाय्यानें बापूजींनीं एक महिन्याच्या आंतबाहेर दासबाबूंकडे सुमारें सात आठ हजार रुपये 'फॉर्वर्ड'च्या मदतीकरितां पाठवून दिले. कॉंग्रेसकडून कौन्सिलप्रवेशास मान्यता मिळविल्यानंतर बापूजी हे स्वत: खास कॉंग्रेस-मन् ह्मणून १९२३ च्या निवडणुकींत लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्ली करितां उभे राहिले, आणि प्रचंड बहुमतानें निवडून आले. त्याचप्रमाणें त्यांनीं या पक्षातर्फे सी. पी. कौन्सिलकरितां राष्ट्रीय मताचे खंबीर उमेदवार उभे केले व तेहि असेच निवडून आले. या सभासदांनीं इतर कोणत्याहि प्रांतांतील कौन्सिलपेक्षां आपल्या कौन्सिलच्याद्वारें असहकारितेच्या कार्यक्रमास ज्यास्त मदत केली.

## प्रतिसहकार पक्षाची स्थापना.

या प्रकारें कौन्सिल प्रवेशाचें अघटित कार्य घडवून आणण्यांत आलें खरें; पण उठल्यासुटल्या बऱ्यावाईट अशा प्रत्येक गोष्टीस कौन्सिलांत विरोध करावा, किंवा कौन्सिलांत निवडून येऊन नुस्त्या तेथील खुर्च्या कांहीं एक काम न करतां अडवून ठेवाव्या ही बापूजींची कल्पना नव्हती. लोकांची मतें मागून त्यांचें बरें करण्याकरितां जर आपण कौन्सिलांत जातो तर तेथें जाऊन सरकारच्या कॅबिनेटमध्यें ह्मणजे अंतर्गृहांत प्रवेश करून राज्ययंत्राचें चक्र आपल्या प्रतिनिधींच्या हातांत घेतलें पाहिजे, व सरकारवर आपल्या मताची छाप पाडून सरकारी राज्ययंत्र लोकमतानुसार अर्थात् कॉंग्रेसच्या धोरणानुसार चालविण्याचा प्रयत्न केला पाहिजे—ही बापूजींची कल्पना होती. 'जबाबदारीच्या जागा स्वीकारणार नाहीं' हा जो स्वराज्यपक्षानें निर्बंध घालून घेतला होता तो अशाकरितां कीं कौन्सिलप्रवेशास कॉंग्रेसची संमती मिळावी, आणि ही अट घालून घेऊन त्यांनीं हें कार्य साधलेंहि. पण

कौन्सिलांत नुसते जाऊन बसल्यानें निर्वाह होत नाहीं, तेथील जबाबदारीच्या स्थानीं लोकप्रतिनिधि नेऊन बसविले पाहिजेत, व कौन्सिल हॉलच्या बाहेर लोकमताचा जो ध्वनि होतो, तो सरकारच्या माजघरांतूनहि काढला पाहिजे या उद्देशानें बापूजी यापुढें असें प्रतिपादन करूं लागले कीं जबाबदारीच्या जागा स्वीकारिल्या पाहिजेत. सरकारच्या होस हो लावणारा मिनिस्टर हा त्यांना नेहमीं भिऊनच काम करणार; या ऐवजीं उघडपणें स्वतःला काँग्रेसवाला ह्मणवून घेणारा लोकप्रतिनिधि मंत्रिपदावर आरुढ झाला तर तो लोकमताच्या आकांक्षा यथाशक्य तृप्त करण्याचा प्रयत्न करील. त्याला यश आलें तर तो लोकांचा फायदा; व यश न आलें तर लोकक्षोभाचा डोंबाळा उडवून द्यावयास एक तें साधन होईल. शिवाय, सरकारच्या कॅबिनेटमध्यें लोकांचा प्रतिनिधि जाऊन बसतो, व तेथें जाऊन सरकारचे कान पिरगाळितो हें दृश्य पाहूनहि लोकांच्या आकांक्षा ज्यास्त प्रदीप्त होतील—असल्या विचारांनीं प्रवृत्त होऊन बापूजी असें प्रतिपादन करूं लागले कीं स्वराज्यपक्षानें जबाबदारीच्या जागा स्वीकारल्या पाहिजेत. अर्थात्, प्रत्यक्ष परिस्थिति अवलोकन करून तरी स्वराज्यपक्षीनें जबाबदारीच्या जागा न स्वीकारावयाची अट काढून घ्यावी आणि कौन्सिलांत जाण्याचा मुख्य उद्देश ह्मणजे सरकारास विरोध करणें हा साधावा. अखेरीस, तात्यासाहेब केळकर, डॉ. मुंजे व बॅ. जयकर यांच्या सहाय्यानें बापूजींनीं आकोला येथें १४ फेब्रुवारी १९२६ रोजीं बॅ. मुकुंदराव जयकर यांच्या अध्यक्षतेखालीं एक सभा भरवून तींत प्रतिसहकारपक्षाची स्थापना केली, व कॉंग्रेसविरुद्ध उभारलेलें बंड यशस्वी केलें! यावेळीं स्वराज्यपक्षांत दुफळी झाली. मोतीलाल नेहरूंनीं या बंडाचा बीमोड करण्याकरितां नागपूर—मुंबई—पुणें या भागांत स्वतः दौरा काढला, पण त्यांना या ‘ बंडखोरी ’ चा पाडाव करतां आला नाहीं, आणि केळकर-जयकर-अणे-मुंजे या चतुष्टयीनें आपल्या ऐक्यबलानें प्रतिसहकारपक्षातर्फे आपलें कार्य चालू ठेविलें.

## दिवाणगिरी काबीज करविली.

स्वराज्यपक्षाच्या तिकिटावर जे प्रतिनिधि मध्यप्रांत कौन्सिलांत जाऊन बसलेले होते त्यांनीं हा पक्ष स्थापन झाल्यानंतर आपआपल्या जागांचे राजिनामे दिले, व फेरनिवडणुकीस उभे राहून पुन: निवडून आले; अर्थात्, या नवीन प्रतिसहकारपक्षाच्या मतांचीच छाप मतदार वर्गावर आहे असें त्यांनीं सिद्ध केलें. यावरून या मतपरिवर्तनाच्या बाबतींत बापूजींच्या मतास केवढी किंमत होती, त्यांच्या शब्दास लोकांमध्यें केवढा मान होता, व प्रांतांतील मतदार वर्गाचा केवढा मोठा पाठिंबा त्यांना होता याचें अनुमान सहज करतां येईल. बापूजी स्वत: दिल्लीच्या वरिष्ठ कायदे मंडळा-करितां ( लेजिस्लेटिव्ह असेंब्लीकरितां ) उभे राहिले तेव्हां त्यांना विरोध कराव-यास एकहि उमेदवार उभा राहूं शकला नाहीं, हें सर्व मतांच्या लोकांचा त्यांच्यावर विश्वास असल्याचें समजा, किंवा त्यांना विरोध करण्यास इतर सर्व पक्ष असमर्थ असल्याचें समजा प्रत्यन्तरच होय! मंत्रिपदाचा स्वीकार करण्याचें ठरल्यानंतर बापूजींचे अनुयायी बॅ. रामराव देशमुख हे वऱ्हाड-प्रांताचे सी. पी. कौन्सिलांतील एक सभासद मंत्रिपदावर जाऊन बसले. रामराव देशमुख मंत्रिपदारूढ होण्यास, किंवा श्रीपाद बळवंत उर्फ तात्या-साहेब तांबे हे कौन्सिलच्या अध्यक्षस्थानीं विराजमान होण्यास जीं कारणें घडलीं त्यांत त्यांना बापूजींचें पाठबळ हें एक प्रमुख कारण होतें असें म्हटलें तर तें सत्यास सोडून होणार नाहीं. तांबे अध्यक्ष झाल्यानंतर ते एक प्रकारें ‘ पक्षातीत ’ बनले, त्यांच्या ग्रहयोगानें त्यांना अचानकपणें गव्हर्नरच्या सिंहासनावर कसें बसविलें याचा मात्र बापूजींस मागमूसहि लागला नाहीं! हें वृत्त ऐकून इतर सारे लोक जसे स्तिमित झाले तसेच बापूजीहि झाले.

## पं. मोतिलाल नेहरू यांचें साहचर्य व सख्य.

लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्लीमध्यें असतांना बापूजींनीं जी महत्वाची कामगिरी केली ती त्यांचीं तेथील भाषणें वाचलीं असतां दिसून येण्यासारखी आहे.

ते स्वतः परिणामकारक वक्ते असले तरी व्याख्यानें देणें हा त्यांच्या कामगिरीचा मुख्य व प्रधान भाग नव्हे. लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्लीमध्यें जो नॅशनॅलिस्ट पक्ष स्थापन करण्यांत आला होता व ज्याचें अध्यक्षपद पं. मोतीलाल नेहरू यांच्याकडे होतें. त्याच्या सूत्रचालकत्वाची माळ बापूजींच्या गळयांत अडकविण्यात आली होती. अर्थात् कोणी कोणती सूचना करावी, ठरावाची भाषा कशी तयार करावी, पार्टीचा कार्यक्रम कसा आंखावा, मतें देण्याकरितां सभासद कसे जुळवावें हें जें बुद्धिमत्तेचें आणि चातुर्याचें काम तें करण्याची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली, आणि हें काम त्यांनीं इतक्या दक्षतेनें पार पाडलें कीं पं. मोतीलाल नेहरू यांना ते जीव कीं प्राण होऊन बसले होते ! कधीं महत्वाच्या कामांत सल्लामसलत करावीशी वाटली कीं पंडीतजी तार करून बापूजींना अलाहाबादेस बोलावून घेत असत. सायमन कामिशनवर राष्ट्रानें बहिष्कार पुकारला तेव्हां त्याच्या बरोबरच देशांतील सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांच्या मतांचें एकीकरण करून सर्वानुमतें एक रिपोर्ट प्रसिद्ध करावा असें ऑल पार्टीज् कान्फरन्सनें ठरविलें, तेव्हां सर्वांच्या चर्चेचा व मतांचा निष्कर्ष काढण्याकरितां व तो रिपोर्टांत ग्रथित करण्याकरितां जी एक कमिटी नेमली गेली तिजमध्यें बापूजी हे एक महत्वाचे सभासद होते. यावेळीं मोतीलालजींच्या आनंदभुवनांत अहो-रात्र बसून, जगांतील सर्व देशांच्या राज्यघटनांचीं पुस्तकें पालथीं घालून व सभासदांशीं चर्चा करून जो ' नेहरू रिपोर्ट ' लिहिण्यांत आला ( आगस्ट १९२८ ) त्यांत बापूजींइतकें सहाय्य पं. मोतीलालजींना सप्रू किंवा जवाहिरलाल नेहरू याखेरीज दुसऱ्या कोणाहि सभासदांचें झालें नाहीं ! या रिपोर्टावर लोकमताच्या अनुकूलतेचा शिक्का मारण्याकरितां बापूजींनीं १९२९ च्या जानेवारींत वऱ्हाडप्रांतांत स्वतः व्याख्यानांचा प्रचंड दौरा काढिला, आणि एका आठवड्याच्या आंत वऱ्हाडांतील प्रत्येक मोठ्या गांवीं जंगी सभा भरवून व शेंकडों कार्यकर्त्यांची व वक्त्यांची त्या

कामीं नेमणूक करून त्यांनीं नेहरू रिपोर्टास अनुकूल असे ठराव पास करवून घेतले. असला जंगी मतप्रचार करावयास लागणारी साधनसामुग्री जुळविण्यांत व तो यशस्वी करण्याचे कामांत लोकनायक बापूजी अणे हे अद्वितीय आहेत ! अस्तु.

## मिठाच्या कायदेभंगाच्या मोहिमेस सुरुवात.

सायमन कमिशन आलें, लोकांच्या बहिष्काराच्या आरोळ्या ऐकत व काळीं निशाणें पाहत फिरलें, आणि विलायतेस परत गेलें ! त्याचा कोठेंहि आदरसत्कार झाला नाहीं. उलट मुंबईच्या बंदरावर प्रथम पदार्पण करतांना व त्या बंदरावरून परत निजधामास प्रयाण करतांना, तसेंच ज्या ज्या गांवीं हें श्वेतसप्तक गेलें त्या सर्व गांवीं लोकांच्या तिरस्कारयुक्त धिक्काराशिवाय त्यांना दुसरा ध्वनि ऐकावयास मिळाला नाहीं. त्यानंतर गोलमेज परिषद भरविण्याची घोषणा प्रसिद्ध करण्यांत आली. इजवरहि कॉंग्रेसनें कडकडीत बहिष्कार पुकारला, व या गोलमेज परिषदेच्या कोणत्याहि कारभारांत राष्ट्रानें भाग घावयाचा नाहीं असें ठरविलें. लोकांच्या आकांक्षा निर्घृणपणें पायांखालीं तुडवीत असतां लोकेच्छानुसार आह्मीं हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविण्यास तयार आहोंत व त्याकरितांच सर्व मतांच्या लोकांस पाचारण करून आणण्यांत येत आहे असा तमाशा साम्राज्यवाद्यांनीं उभा केला, पण त्यानें भुरळून जाण्याइतकी कॉंग्रेस भोळी राहिली नव्हती. तिनें सरकारशीं उघड विरोध करण्याचें ठरविलें होतें. लाहोरच्या कॉंग्रेसनें ३१ डिसेंबर १९२९ रोजीं संपूर्ण स्वातंत्र्य हें राष्ट्राचें ध्येय असल्याचें जाहीर केलें होतें. साम्राज्यान्तर्गत स्वराज्याची भाषा कोणाच्याहि तोंडीं शिल्लक राहिली नव्हती. राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा दर्शक असा तिरंगी झेंडा कॉंग्रेसनें निश्चित करून तो गांवोगांवीं व घरोघरीं स्थापन केला होता. म. गांधींनीं राष्ट्राच्या मागण्या निश्चित करून त्या असंदिग्ध शब्दांत पुढें मांडल्या, व व्हॉइसरायशीं

पत्रव्यवहार करून त्या पुरविण्यास मुदत घालून दिली. ती मुदत संपतांच म. गांधीं यांनीं साबरमती आश्रमांतील आपले ६९ अनुयायी घेऊन मीठाचा कायदेभंग करण्याकरितां पश्चिमेकडील समुद्रावर दांडी येथें ६ मार्च १९३० रोजीं प्रयाण केलें. हा एकटा म्हातारा आपल्या दुबळ्या निष्प्रतिकारी अनुयायांसह युद्धावर निघून इंग्रज सरकारचें काय वांकडें करणार अशी साम्राज्यवादीपक्षानें त्यांची कुचेष्टा चालविली ! प्रभु रामचंद्राच्या माकडसेनेची अशीच चेष्टा दशवदन लंकाधिपतीनें केली होती !! अखेरीस मुक्कामीं मुक्कामीं पायीं कूच करीत, व रस्त्यावरील लोकांचेंच नव्हे, तर रोजच्या रोज या प्रयाणाच्या बातम्या वाचणाऱ्या समस्त हिंदुस्थानांतील लोकांचें नैतिक पाठबळ मिळवीत, म. गांधी दांडीस जाऊन पोहोचले, व त्यांनीं आपल्या हातानें मीठाच्या कायद्याचा भंग करून आपला पण पुरा केला ! ' गुन्हेगार ' म्हणून त्यांना ५ मे १९३० रोजीं विनचौकशीनें अटक करण्यांत आली व त्यांच्या अनुयायांना शिक्षा करण्यांत येऊन महात्माजींना येरवड्याच्या तुरुंगांत नेऊन कोंडण्यांत आलें !

## बापूजींची विशिष्ट कायदेभंगाची योजना.

यावेळीं बापूजी वरिष्ठ कायदे मंडळांत लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें सभासद असून दिल्लीस काम करीत होते. म. गांधी यांना कैद केल्याचें वृत्त वाचतांच त्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा व्हाइसरॉयकडे पाठविला, आणि कायदेभंगांत सामील व्हायचें निश्चित करून वऱ्हाड प्रां. कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष वीर वामनराव जोशी यांच्याकडे कॉंग्रेसचा एक स्वयंसैनिक म्हणून काम करण्याचा ' अर्ज ' त्यांनीं पाठवून दिला ! पाहतां पाहतां हिन्दुस्थानभर अपूर्व जागृति व प्रक्षोभ उत्पन्न होऊन गांवोगांवीं मीठाचा, त्याचप्रमाणें जप्त केलेलें वाङ्मय वाचण्याचा कायदेभंग करण्यांत आला. त्याचा अनुनाद बापूजींच्या नेतृत्वाखालीं वऱ्हाड प्रांतांतहि यथायोग्य प्रमाणांत झाला.

इतर प्रांतांत सर्वत्रच जो कायदेभंग होतो त्याचा नुस्ता प्रतिध्वनि उठविण्यांत आपलें वैशिष्ठ्य तें काय? म. गांधी यांनीं कायदेभंगाचें जें निशाण उभें केलें त्याचें रहस्य हिन्दुस्थानच्या लोकांस खरोखरच कळलें आहे, हें दर्शविण्याकरितां तें बंड ज्या तत्वावर उभारलें त्याची व्याप्ति मीठाचा कायदा सोडून दुसऱ्या एखाद्या कायद्याच्या बाबतींत लागू केली पाहिजे हा विचार बापूजींच्या कल्पनाप्रचुर मेंदूंत जोरानें खेळत होता; ह्मणून त्यांनीं आपली बुद्धिमत्ता खर्च करून आपल्या सहकार्यकर्त्यांच्या सहाय्यानें जंगल कायदेभंगाची योजना निश्चित केली. व ती वर्किंग कमिटीकडून मंजूर करून घेतली. वऱ्हाड प्रांतिक कॉंग्रेस कमिटीला ती हवीच होती, ह्मणून तिनें ती मान्य केली. यावेळीं बापूजी हे वऱ्हाड प्रां. कॉं. कमिटीचे अध्यक्ष नसून अध्यक्षांचे नुस्ते एक 'आज्ञाधारक सभासद' होते; पण वऱ्हाड प्रांतिक युद्ध मंडळानें या कायदेभंगाचें नेतृत्व बापूजीकडेच सोंपविलें. बापूजींनीं स्वतः वऱ्हाडच्या चारहि जिल्ह्यांत व्याख्यानांची जंगी मोहीम काढून लोकमत आपणांस कितपत अनुकूल आहे, व कायदेभंग सुरूं केला तर आपणांस लोकांचें प्रत्यक्ष सहाय्य कितपत मिळेल हें अजमाविलें. त्यांच्या व्याख्यानास आसपासच्या शेंकडो खेड्यांतून लोक जमत, व वीस पंचवीस हजारांच्या समुदायांपुढें त्यांचीं रात्रीं दोन दोन वाजेपर्यंत व्याख्यानें चालत! अशा रीतीनें बापूजीनीं सर्व वऱ्हाडभर आपल्या कायदेभंगास लागणारा फौजफाटा व द्रव्यबळ मिळविण्याची जय्यत तयारी केली. गांवोगांवचे वृद्धतरुण त्यांच्या हांकेस ओ देऊन या रणयज्ञांत आपली आहुति देण्यांस बद्धपरिकर झाले! बापूजींच्या बुद्धिमत्तेवर व कार्यकर्तृत्वावर आपली अढळ निष्ठा आहे असें दर्शविण्याकरितां नागपूर प्रांताचे पुढारी डॉ. मुंजे यांनीं बापूजींच्या पाठोपाठ कायदेभंग करण्याचें ठरविलें; तसेंच नागपूरच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुढारी डॉ. हेडगेवार यांनीं आपल्या निवडक कार्यकर्त्यांचें एक पथक बनवून या रणसंग्रामांत उडी घेण्याचें निश्चित केलें.

## बापूजींनीं जंगलाचा कायदेभंग-केला !

अगाऊ जाहीर केल्याप्रमाणें बापूजींनीं यवतमाळाहून पुसद येथें कायदेभंगाकरितां प्रयाण केलें. तेथें शंकराव सरनाईक प्रभृति कार्यकर्त्यांनीं शिबिराची सिद्धता करून ठेविलेलीच होती. जाहीर केलेला दिवस उजाडला आणि गुरुपौर्णिमेच्या सुमुहूर्तावर ता. १० जुलै रोजीं सकाळीं सूर्योदयास स्वयंसेवकांच्या पथकासमवेत लोकनायक बापूजींनीं पुस नदीच्या वाळवंटांत आपले परमपूज्य गुरु कै. लोकमान्य टिळक यांचे स्मरण करून लोकांचा निरोप घेतला, व हजारों स्त्री पुरुषांच्या समोर कायदेभंगास प्रयाण केलें ! या वेळचा लष्करी थाट, स्वयंसैनिकांची शिस्त, नारिंगी स्वस्तिक मंडळाची औषधपाण्याची योजना व स्पेशल मोटर, लोकांनीं शिस्तीनें बसण्याची व रस्त्यानें रांगा करून चालण्याची कवायत, जंगलांतील स्त्रीपुरुषांची गर्दी लोकनायकांनीं चांदीच्या मुठीच्या विळ्यानें वेदशास्त्रसंपन्न दासभटजी अयाचित याजसारख्या पुरातन आचाराच्या विद्वान पंडिताबरोबर कापलेलें गवत, त्यावेळीं हें दिव्य दृश्य पाहण्याकरितां मुद्दाम धांवून आलेले मध्य-प्रांताच्या सरकारांतील बडेबडे अधिकारी, जिल्हाधिपती व काननाधिपति वगैरे, इत्यादि देखाव्याचें वर्णन करण्याचें हें स्थळ नसल्यामुळें त्याची कल्पना वाचकावर सोपविणें बरें ! या दिवशीं वऱ्हाड–मध्यप्रांतांतील एकूणएक ठिकाणचे लहान मोठे पुढारी लोकनायकांचें दर्शन घेण्यास उपस्थित झाले होते. वऱ्हाड–मध्यप्रांताची राजधानी नागपूर आहे, कीं पुसद आहे असा संदेह उत्पन्न झाला ! कायदेभंग करून परत येतांना लोकनायकांस कैद करण्यांत आलें, आणि झटपट न्यायाचा फार्स होऊन लोकनायकांस ३७९ कलमाखालीं ह्मणजे

## ' चोरी ' केली ह्मणून ६ महिन्यांची शिक्षा

ठोठावून देण्यांत आली ! त्यांच्या पथकांतील दास भटजी अया-चित, डॉ. हरी विश्वनाथ वैद्य, बाबूराव सरमोकदम प्रभृतींनाहि त्याच गुन्हा-

खालीं तेवढीच शिक्षा देण्यांत आली. यानंतर दुसऱ्या दिवशी डॉ. मुंजे यांनीं जंगलचा कायदेभंग केला, पण त्यांस 'कोर्ट उठेपर्यंत' शिक्षा देण्यांत आली, ह्मणून त्यांनीं पुनश्च तो कायदेभंग करण्याचें जाहीर केलें. त्यांस दुसऱ्यानें शिक्षा देण्यांत आली ती एका आठवड्याची. लोकनायक बापूजींना त्याच दिवशीं संध्याकाळीं यवतमाळच्या तुरुंगांत आणि नंतर तेथून शिवणीच्या तुरुंगांत पाठविण्यांत आलें. लोकांनीं कापलेल्या गवताच्या कांहीं काड्या पवित्र ह्मणून पुसदहून कोणी यवतमाळास आणल्या त्यापैकीं एका काडीचा जाहीर लिलांव १०१ रुपयास झाला!!

## 'लोकनायक' हें उपपद.

लोकनायक हें उपपद बापूजी अणे यांना कायदेभंगाची मोहीम प्रवृत्त केल्यापासूनच जनतेनें स्वयंस्फूर्तीनें अर्पण केलें! लोकनायकांच्या दिव्यस्फूर्तीनें वऱ्हाडांतील समस्त जनता जंगल कायदेभंगास सिद्ध झाली; हजारों गांवच्या स्त्रीपुरुषांनीं जंगलचा कायदा अधिकाऱ्यांच्या देखत मोडला, आणि सुमारें २००० जणांनीं स्वत: दंड किंवा कारावास भोगून लोकनायकांवरील आपल्या निष्ठेचें व उज्वल देशभक्तीचें प्रत्यन्तर आणून दिलें! लोकांनीं आपली असामान्य कल्पकता लढवून, आणि तिला कॉंग्रेसच्या वर्कींग कमिटीची मान्यता मिळवून प्रवृत्त केलेला हा जंगलचा कायदेभंग ह्मणजे हिंदुस्थानच्या इतिहासांतील एक महत्वाची गोष्ट होऊन बसली आहे! असो. लोकनायकांची तुरुंगांत रवानगी झाली, पण त्यांनीं प्रयाण करण्यापूर्वीं आपलें काम पुढें चालविण्याची सर्व जबाबदारी डॉ. भास्कर महादेव टेंबे, एल्. आर्. सी. पी अँड एस्; एल्. एफ्. पी. एस्. यांजवर सोंपविली. डॉक्टर साहेब हे इंदूर संस्थानांत उच्चतम दर्ज्यावर 'सर्जन' चें काम करीत होते, पण तेथील संस्थानी वातावरण या स्वातंत्र्यवीरास न मानवल्यामुळें त्यांना तें शहर सोडून बाहेर पडावें लागलें. ते १९२२ सालीं या शहरांत धंदा करावयास आले. डॉक्टरसाहेब राजकारणाच्या उलाढालींत प्रत्यक्ष

असा भाग घेणारे नव्हते, तरी त्यांचा सल्ला मूल्यवान् समजला जात असे, आणि हातीं घेतलेलें काम जबाबदारीनें, बिनबोभाट्यानें आणि कुशलतेनें पार पाडण्याची त्यांची हातोटी लोकनायकांस विदित होती, ह्मणून प्रसिद्धीच्या सूर्यप्रकाशांत आजवर कधीं न तळपलेल्या, किंबहुना स्वतः अप्रसिद्धीच्या अन्धकारांत राहूनच कार्यकर्त्यांस सल्लामसलत व साहाय्य देणाऱ्या या खंबीर सेनापतीवर लोकनायकांनीं पुढील कठिण कार्याची जबाबदारी टाकली यांत त्यांची योजकताच दिसून येते. लोकनायक तुरुंगवासी बनल्यानंतर पुसद येथें एक आठवडापर्यंत, आणि त्यानंतर २१ जुलैपासून खास यवतमाळ येथें सुमारें चार महिनेपर्यंत कायदेभंग सुरू ठेवण्यांत आला. यवतमाळ जिल्हा युद्ध–मंडळाचे डिक्टेटर डॉ. टेंबे यांनीं तो इतक्या बेमालूम व्यवस्थेनें, चतुराईनें, व प्रत्येक लहानशा गोष्टींत बारीक लक्ष घालून व सर्वांचीं मनें संभाळून चालविला कीं या शिस्तशीरपणास तोड अन्यत्र दाखवितां येणार नाहीं! कुशल डॉक्टर ह्मणून त्यांचा लौकिक होता तो कुशल सेनापति ह्मणूनहि झाला, आणि संपूर्ण वऱ्हाड–मध्यप्रांतांतील पुढारी व कार्यकर्ते यांच्या आदरस्थानीं ते जाऊन बसले. डॉ. टेंबे यांनीं सव्वा महिनापर्यंत कायदेभंगाची मोहीम चालू ठेवून ता. २१ आगस्ट रोजीं स्वतः तुरुंगांत प्रयाण केलें. त्यांनीं जी ही अश्रूतपूर्व कामगिरी केली तिच्या स्फूर्तीचें जनकत्व लोकनायक बापूजी अणे यांच्या अद्वितीय योजकतेकडेच आहे यांत शंका नाहीं.

## शिवणीच्या तुरुंगांत रवानगी.

लोकनायकांना पुसदहून यवतमाळास १० जुलै रोजींच संध्याकाळीं आणण्यांत आलें. ही वार्ता कळतांच त्यांच्या दर्शनास उत्सुक असलेल्या हजारों नागरिकांनीं तुरुंगास वेढा घातला! कित्येक लोक रात्रभर तुरुंगाच्या भोंवतालीं झोंपले. अखेरीस दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यांना तुरुंगाच्या मुख्य फाटकापाशीं आणण्यांत आलें, तरी सुद्धां लोकांची गर्दी कमी होईना

जनताजनार्दनाच्या अंतःकरणाचा ठाव अचूक रीतीनें जाणणाऱ्या लोकनायकांनीं—जे यावेळीं अंगांत नुस्ता एक सदरा घालून शिरस्त्राणविरहित उभे होते—तुरुंगाच्या अधिकाऱ्यास सांगितलें कीं माझी पगडी आणून द्याल तर आतां गर्दी ओसरते. याप्रमाणें त्यांनीं पगडी घालून दर्शन दिलें; हात जोडून सर्वांस सप्रेम प्रणाम केला, व घरोघर जाण्याची संज्ञा हातानें करतांच लोकांची गर्दी पांगली, आणि विषण्ण अंतःकरणानें ते घरोघर चालते झाले. यवतमाळहून त्यांना एके दिवशीं रात्रीं १२ वाजतां शिवणीच्या तुरुंगांत रवाना करण्यांत आलें. त्यांना 'ए' क्लास दिला होता. तेथें त्यांचे सोबती वीर वामनराव जोशी, बॅ. मोरोपंत अभ्यंकर, रविशंकर शुक्ल व कांहीं दिवस नारायणराव बामणगांवकर हे होते. तुरुंगवासाच्या अवधींत लोकनायकांनीं स्नानसंध्या खेरीज बाकीचा सर्व वेळ 'महाभारता'च्या अध्ययनांत घालविला; व कांहीं ठिकाणीं नवीन सुचलेल्या विचारांचीं टिपणेंहि तयार केलीं. त्यांच्या आधारें कांहीं लेखन करण्याचाहि त्यांचा मानस आहे, पण राजकारणाच्या प्रतिदिन वृद्धिंगत होणाऱ्या धुमश्चक्रींत लेखनास आवश्यक सवड केव्हां मिळेल तो सुदिन !

## बंधमुक्ततेनंतर.

लोकनायकांनीं आपल्या कारावासाची पूर्ण सहा महिन्यांची शिक्षा भोगली, व ९ जानेवारी १९३१ रोजीं ते बंधमुक्त होऊन शिवणीच्या तुरुंगांतून बाहेर आले. नागपुरास कांहीं तास थांबून, आप्तेष्टांच्या व मित्रांच्या झटपट भेटी घेऊन त्याच रात्रीं ते वरोडा मार्गानें प्रथम आपल्या परमप्रिय मातुःश्रीच्या व साधुवर्य आपाजी महाराज यांच्या दर्शनास वणीस यावयास निघाले. शनिवार ता. १० जाने. रोजीं सकाळीं वरोडा स्टेशनवर उतरतांच तेथील लोकांनीं त्यांस घाईघाईनें उतरवून घेऊन बाजार चौकांत जाहीरपणें पुष्पहारादिकांनीं गौरविलें. तेथें त्यांच्या स्वागतार्थ वणीचे प्रमुख नागरिक आधींच जाऊन बसले होते. तेथून त्यांना वणीस आणण्यांत आलें. गांवाच्या

बाहेर सुमारें सवा मैलपर्यंत शहरांतील सेवादलें, अखाड्यांतील स्वयंसेवक, विद्यार्थी, व्यापारी, वृद्ध नागरिक इत्यादि सामोरा आले होते. लोकनायक बापूजींची बुद्धिमत्ता, स्वभावमाधुर्य, लोकसंग्रहचातुर्य इत्यादि गुणांची सर्व लोकांस जाणीव असल्यामुळें सर्व प्रकारच्या जनतेचें त्यांच्यावर प्रेम बसलेलें होतेंच; तरीपण ही कारावासाची तपश्चर्या संपवून परत आल्यानंतर जनतेस त्यांचें स्वरूप अदृश्यपूर्व दिव्य तेजोवल्यानें चमकणारें असें दृश्यमान झालें ! व हे केवळ यवतमाळ जिल्ह्याचे किंवा वऱ्हाड प्रांताचेच पुढारी नसून अखिल हिंदुस्थानच्या प्रभावशाली कार्यकर्त्या पुढाऱ्यांमध्यें विशेषत्वानें शोभणारे लोकोत्तर नेते आहेत ही भावना उदित होऊन लोक त्याजकडे निराळ्याच दृष्टीनें व साश्चर्य कौतुकादर भावनांनीं निरखून पाहूं लागले ! अर्जुनाला श्रीकृष्णांनीं दिव्य स्वरूप दाखविल्यानंतर त्याच्या तोंडून "सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं हे कृष्ण ! हे यादव ! हे सखेति..." इत्यादि उद्गार निघाले तसे त्यांचें बालपणचे संवगडी व अहोरात्र बरोबर राहून त्यांच्या नेतृत्वाखालीं कामें करणारे याच्या अंतकरणांतून उस्फूर्त झाले ! असो. वणी शहर यावेळीं लोकनायकांच्या आगमनोत्सवाप्रीत्यर्थ नागरिकांनी ध्वजापताकांनीं विभूषित केलें होतें ! पुरवासिनींनीं आपापल्या घरापुढें रांगोळ्या घातल्या व दारांस आम्रपल्लवादिकांचीं तोरणें लाविलीं ! सारें शहर हास्यमय व आनंदमय होऊन गेलें. त्यांचीं शहरांतील प्रमुख रस्त्यांतून मिरवणूक काढून त्यांस त्यांच्या घरीं पोहोचविण्यांत आलें. मातुःश्रीस व आप्तेष्टांस वंदन करून रोजच्याप्रमाणें घरीं बैठकीवर बसले. सकाळीं १०॥ च्या सुमारास त्यांनीं गृहप्रवेश केला, स्नानाची वेळ झाली, पण आल्यागेल्यांची गर्दी एवढी उसळली कीं एकेकास चार दोन प्रश्न विचारतां विचारतां त्यांना स्नानास उठण्याला दुपारचे दोन वाजून गेले ! नंतर भोजनें आटोपलीं. संध्याकाळीं लायब्ररीच्या पटांगणांत विशेषत्वानें शृंगारिलेल्या जागीं उच्च सिंहासन मांडून त्याजवर लोकनायकांना

## वणी म्युनिसिपालिटीचें मानपत्र

देण्यांत आलें! दिगंतरीं कीर्ति मिळविणें हा लहान पराक्रम नव्हे, पण एवढ्या पराक्रमी वीराचा स्वतःच्या गांवीं सन्मान होतोच असें नाहीं; बाहेर सर्वत्र सन्मान झाल्यानंतर बहुशः हा घरच्या मानाचा अलभ्य लाभ प्राप्त होत असतो. पण लोकनायकांच्या बाबतींत हा साधारण नियम खोटा ठरला व त्यांच्या जाहीर सन्मानाचा प्रारंभ घरच्या पहिल्या अहेरापासूनच झाला. यापूर्वीहि त्यांना तेथील शाळातर्फे मानपत्रें देऊन गौरविण्यांत आलेलें होतें. पण या वेळचा सन्मान हा वणीच्या समस्त नागरिकांतर्फे मकर संक्रमणाच्या तिळगुळानिमित्त होता. दुसऱ्याच दिवशीं सकाळीं लोकनायक यवतमाळास यावयास निघाले. ते येणार अशी वार्ता लागल्यामुळें सडकेवरील गांवोंगांवच्या लोकांनीं त्यांची मोटर थांबवून त्यांस सुमनहार अर्पण केले.

## यवतमाळांत कारावासोत्तर प्रवेश.

सकाळीं ११ च्या सुमारास लोकनायक यवतमाळास येऊन पोहोचले. त्यांचें दर्शन आधी कोण घेतो या अहमहमिकेनें त्यांचे अनेक स्नेही मोटारी भरधांव सोडून समोर गेले होते! शहरच्या बाहेर दोन तीन फर्लांगपर्यंत त्यांच्या दर्शनास उत्सुक असलेल्या बालवृद्धांची व स्त्रीपुरुषांची एवढी भीड जमली होती कीं यवतमाळच्या वस्तींत एकहि नागरिक यावेळीं उरला नाहीं कीं काय असें वाटे! लोकनायकांची मोटर दृश्यमान होतांच लोक दुतर्फा झाले. स्वयंसैनिक दलें शिस्तीनें उभे राहून रणवाद्यें वाजवूं लागले! अनेक मित्र व संस्थांचे प्रतिनिधि आपापले पुष्पहार घेऊन लोकनायकांच्या मोटारीवर गर्दी करूं लागले! त्यांची शहरांतील मुख्य रस्त्यांतून सवाद्य मिरवणूक काढण्यांत येऊन लोकनायक 'रामा'चे बंधु अण्णासाहेब 'भरत' यांचे निवासस्थानीं त्यांना पोहोचविण्यांत आलें. संध्याकाळीं टौनहॉलमध्यें नगर संस्थेचें मानपत्र गोविंदराव बारी, अध्यक्ष, यांचे हस्तें देण्यांत आलें. यानंतर

ठिकठिकाणचे स्नेही व कार्यकर्ते यांना भेटण्याकरितां लोकनायकांनीं वऱ्हाड प्रान्तभर दौरा काढला व तुरुंगांत होते त्यांच्या घरच्या माणसांच्या भेटी घेतल्या. गांवोगांवीं त्यांचें अपूर्व स्वागत करण्यांत आलें, आणि त्यांच्या दर्शनास स्त्री पुरुषांची एवढी गर्दी जमे कीं जणों काय त्यांच्या गांवीं लोकमान्य टिळक किंवा म. गांधीच आले आहेत! दौऱ्यांत व त्यानंतर त्यांना उमरावती शहर म्युनिसि. वणी म्युनिसि. वरोडा म्युनिसि. चंद्रपूर म्युनिसि. गणपति संस्थान, यवतमाळ, कारंजा स्थानिक स्वराज्य, गोरक्षण संस्था पुसद, हनुमान आखाडा, पुसद, बालाजी संस्थान, पुसद, यवतमाळ ब्रह्मवृन्द, पुसद नागरिक, मेहकर तालुक्यांतील रहिवासी, आकोट म्युनिसि, आर्वी लोकलबोर्ड, बडाबझार वानरसेना, कलकत्ता, हिंदीनाट्य परिषद, कलकत्ता इत्यादि ठिकाणीं मानपत्रें देण्यांत आलीं.

## राष्ट्रीय सभेच्या मंत्रिमंडळांत.

म. गांधी आणि इतर पुढारी यांची बंधमुक्तता करून सरकारनें त्याजशीं गोलमेज परिषदेमध्यें भाग घेण्याविषयीं समेटाचें बोलणें सुरू केलें होतें. लोकनायक सुटून आले, ह्मणून सर्व हिंदुस्थानांत अपूर्व अशा जंगल सत्याग्रहाचे जनक जे लोकनायक माधवरावजी अणे त्यांस महात्मा गांधी यांनीं मुद्दाम तार करून १९३१ च्या मार्चमध्यें दिल्लीस बोलावून घेतलें. बापूजी यावेळीं काँग्रेसच्या वर्किंग कमिटीचे सभासद तर नव्हतेच, पण वऱ्हाड प्रां. कॉ· कमिटीचेहि अध्यक्ष नव्हते; परंतु त्यांच्या कर्तृत्वानें म. गांधीं यांचें लक्ष इतकें वेधलें होतें कीं सरकारशीं समेटाची बोलणीं करण्यासारख्या महत्वाच्या कामांत बापूजी अणे यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेचें साहाय्य घेणें त्यांना आवश्यक वाटलें! यानंतर कराची येथें काँग्रेसचें अधिवेशन झालें त्यावेळीं त्यांना काँग्रेस वर्किंग कमिटीचे सभासद करून घेण्यांत आले! काँग्रेसशीं पटत नव्हतें तेव्हां जिल्हासंघासारखी चिमुकली

संस्था लोकहितार्थ स्थापन करून स्वतःस बसावयाचें स्थान निर्माण करणाऱ्या बापूजींनीं आतां हिंदुस्थानच्या राजकारणाचीं सूत्रें चालविण्याच्या अधिकारस्थानावर पदार्पण केलें व सार्वभारत नेत्यांत त्यांची निःसंशयपणें गणना झाली ! ! त्यांची लोकोत्तर बुद्धिमत्ता, तीव्र तळमळ व आपसांतील मतभेद काढून त्याजागीं ऐक्य स्थापन करण्याची कुशलता ओळखून काँग्रेसच्या वर्किंग कमिटीनें त्यांची योजना बंगाल प्रांतिक काँ. कमेटीने मधील कलह मोडण्याच्या कामीं केली.

सेनगुप्त आणि सुभाषचंद्र बोस यांच्या पक्षामध्यें बेबनाव उत्पन्न होऊन काँग्रेसच्या कार्याचा नाश होण्याचा प्रसंग उद्भवला होता. लोकनायकांची त्या कामीं योजना झाली तेव्हां त्यांनीं अगाऊ तारखा मुक्रर करून घेऊन कलकत्त्यास प्रयाण केले , आणि रोजच्या रोज दोन्ही पक्षांच्या गांठीं घेऊन त्यांचे वाद पूर्णपणें समजावून घेतले, व दोघांच्याहि आपसांत समजुती घालून त्यांचें ऐक्य घडवून आणलें ! या समेटाचा सर्व पत्रव्यवहार वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध झालेला आहे, त्यावरून लोकनायकांची कलह शमन करण्याचे कामांतील लोकोत्तर कुशलता दिसून येते. यावेळीं त्यांनीं सेनगुप्त व सुभाषचंद्र या दोघांचाहि विश्वास संपादन केला, आणि त्यानंतर या समेटानुसार बंगाल प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या ज्या निवडणुकी झाल्या त्याहि लोकनायकांच्या चालकत्वाखालींच करण्यांत आल्या. याहि वेळीं त्यांना कलकत्त्यास कांहीं संस्थांकडून बंगाली भाषेंत मानपत्रें देण्यांत आलीं. बंगाली लोक व महाराष्ट्रीय यांच्यामध्यें राष्ट्रबन्धुत्वाचें नातें राष्ट्रीय आंदोलनाच्या जन्मापासूनच आहे. इतर बहुतेक प्रांत तमोमय आलस्यांत व निद्रेंत पडले होते त्यावेळीं हे दोन प्रांतच हालचाल करूं लागले होते. बंगाल्यांत 'अमृत बझार पत्रिके' चे शिशिरबाबू राष्ट्रीय जागृति करित होते त्यांचें एक प्रकारचें शिष्यत्व लोकमान्य टिळकांनीं केलें होतें, आणि कलकत्त्यास १९०६ ची राष्ट्रीय सभा झाली तेव्हां बंगाली लोकांनीं महाराष्ट्रीयां-

विषयीं आपला आदर प्रकट करण्याकरितां टिळक व खापर्डे यांच्या टोलेजंग मिरवणुकी काढल्या होत्या. तेव्हांपासून या दोन प्रांतांतील बन्धुत्वाचें नातें वृद्धिंगतच होत आलें. अरविंद घोष, दासबाबू, सुभाषचंद्र बोस यांजसारख्या अलौकिक बंगाली पुढाऱ्यांचा मान करण्याची संधी महाराष्ट्रीयांनीं दवडली नाहीं; तद्वत् आदरास पात्र झालेल्या लोकोत्तर महाराष्ट्रीय पुढाऱ्यांचा गौरव करण्याचा प्रसंग बंगाली लोकांनीं गमाविला नाहीं. लोकमान्य टिळक आणि दादासाहेब खापर्डे यांच्या मागून भावनाप्रधान व राष्ट्रीय वृत्तिच्या बंगाली जनतेचीं अन्तःकरणें व प्रेम वश करून घेण्याचें सद्भाग्य कोणा महाराष्ट्रीयास लाभलें असेल तर ते लोकनायक बापूजी अणे यांनाच! धन्य ते गुरु लोकमान्य टिळक व धन्य त्यांचे शिष्य लोकनायक बापूजी अणे !!

## कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाकरतां !

तुरुंगांतून सुटून आल्यानंतर मुंबई इलाख्यांतील महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या खास निमंत्रणावरून लोकनायकांनीं त्या प्रांतांत दौरा काढला, व सातारा, सोलापूर जिल्हा परिषदांचें अध्यक्षस्थान मंडित केलें. तेथील जनतेनें त्यांच्या मोठेपणास शोभण्यासारखें आदरातिथ्य करून त्यांजविषयीं आपला हार्दिक आदर प्रदर्शित केला हें सांगणें नकोच. संपूर्ण महाराष्ट्रीयांस वंदनीय असें एकमेवाद्वितीय स्थान लोकनायकांस प्राप्त झालें असल्यामुळें त्यांना ठिकठिकाणचीं निमंत्रणें येऊं लागलीं; व तींहि यथाशक्य स्वीकारून लोकनायक त्या त्या गांवीं गेले. जगन्नाथपुरी राष्ट्रीय अधिवेशनाकरितां जी अध्यक्षांची नांवें सुचविण्यांत आलीं होती त्यांत लोकनायक बापूजी अणे यांचें नांव महाराष्ट्र प्रांतिक कमिटीनें सुचविलें यावरून त्यांस सार्वभारत पुढाऱ्यांत केवढा दर्जा प्राप्त झाला आहे याचें अनुमान सहज करतां येण्यासारखें आहे. भविष्य काळाचें पोटांत काय आहे कोणीं सांगावें ? ते राष्ट्रीय सभेचें अध्यक्ष झाले, तर त्यांत आश्चर्य कोणतें ?

## सरदार वल्लभभाई यांचें वऱ्हाडांत आगमन.

खामगांव येथें जून १९३१ रोजीं दुसरी वऱ्हाड प्रांतीय राजकीय परिषद झाली. तिच्या अध्यक्षस्थानीं कराची कॉंग्रेसचे अध्यक्ष सरदार वल्लभभाई पटेल यांची योजना लोकनायक बापूजी यांनीं केली. बापूजी अणे यांचा वऱ्हाड प्रांत आहे तरी कसा हें पाहण्याची उत्कंठा कॉंग्रेसच्या अध्यक्षांस लागलेलीच होती व ती पूर्ण करण्याकरितांच त्यानीं या आमंत्रणाचा आनंदानें स्वीकार केला. या परिषदेच्या वेळींच वऱ्हाड प्रांताचा दर्जा हिन्दुस्थानच्या भावी स्वराज्य घटनेंत इतर स्वतंत्र व स्वायत्त प्रांताच्या बरोबरीचा असावयास पाहिजे असें मत व्यक्त करण्याचा, व त्या प्रीत्यर्थ जरूर पडेल ती खटपट करण्याचा ठराव एकमतानें पास झाला. हें पुढील कार्य वऱ्हाड प्रांताच्या कॉंग्रेस कमिटीनें पार पाडावयाचें होतें. लोकनायक बापूजी अणे हे यावेळीं वऱ्हाड प्रां. कॉं. कमिटीचे अध्यक्ष नव्हते, पण या कामाची जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन ती अखेरपर्यंत पार पाडण्यांत त्यांनीं आपलें सारें बुद्धिबल, संग्रहचातुर्य व धडाडी खर्च केली.

## वऱ्हाड सर्वपक्षीय परिषद.

खामगांवची ही परिषद आटोपतांच ते तातडीनें आकोल्यास गेले. अखिल महाराष्ट्रीय परिषद, प्रतिसहकार पक्षाची स्थापना इत्यादि हिन्दुस्थानच्या राजकारणास नवीन वळण लावणाऱ्या प्रश्नांचा उगम ज्या आकोला शहरांत बसून लोकनायकांनीं केला व त्या शहरास महत्व आणिलें तेथील त्यांचे जीवलग स्नेही एकनिष्ठ अनुयायी व धडाडीचे कार्यकर्ते मामासाहेब जोगळेकर यांच्या बंगल्यांत एक दिवस मुक्काम केला. वऱ्हाडच्या प्रश्नाचा पिच्छा पुरविण्याकरितां वऱ्हाड सर्व पक्षीय परिषद बोलावण्याचें ठरलें होतें पण ती केव्हां व कशी बोलवावी, कोणाकोणास निमंत्रणें द्यावीं, सभेपुढें कोणती माहिती ठेवायची, ठराव कोणत्या स्वरूपांत व कोणत्या

शब्दांत मांडावयाचे या संबंधाच्या विचारांनीं त्यांच्या कल्पनाचतुर मेंदूत इतकें काहूर माजवून सोडलें होतें कीं दुपारचें जेवण झाल्यानंतर, उन्हाळा ह्मणतो मी !– आकोला ह्मणजे दुसरें जलालाबादच आहे– पंचमढीच्या थंड हवेंत काम करणाऱ्या बड्या ऑफिसरांना देखील जी वेळ विश्रांतीची व सुस्तीची वाटत असेल, अशा ऐन उन्हाच्या वेळीं तेथें त्यांच्याभोंवतीं बसलेल्या आपल्या स्नेह्यासोबत्यांशीं वऱ्हाडच्या प्रश्नासंबंधीं सुमारें चार तासपर्यंत ते एकसारखे बोलत बसले होते ! व संध्याकाळीं संध्या करण्याकरितां ते उठले तेव्हां त्यांच्या तोंडून उद्गारहि निघाले कीं अनेक वर्षांत ज्या गोष्टींचें स्मरण करण्याचा प्रसंग आला नव्हता त्या गोष्टींचा चित्रपट आज डोळ्यासमोर आला ! लोकनायकांचा स्मृतिकोप केवढा अगाध आहे, त्यांत एकेका बारीक प्रसंगाची जागा किती व्यवस्थितपणें आखून ठेवण्यांत आलेली आहे, आणि ज्यावेळीं ज्याची जरूरी पडते तो विषय नेमका त्यांना कसा अचूक आठवतो हें पाहून तेथें हजर असलेले सर्वजण थक्क होऊन गेले ! एवढी जय्यत तयारी ज्या विशाल मेंदूत भरलेली होती त्याला वऱ्हाडप्रांताचा प्रश्न व्यवस्थित रीतीनें गोलमेज परिषदेपुढें मांडण्यास लागणारी सामग्री जुळविण्यास अडचण ती कोणती ? गोलमेज परिषद लौकरच सुरू व्हायची होती ह्मणून तिला हजर राहण्याकरितां येथून म. गांधीप्रभृति प्रतिनिधि रवाना होण्यापूर्वी वऱ्हाड-सर्वपक्षीय परिषद भरविणें, तिजमध्यें सर्व धंद्याचे सर्व मतांचे, सर्व जातींचे लोक बोलाविणें, त्या सर्वांची योग्य प्रकारें समजूत घालून त्यांच्या ऐक्य बलावर योग्य त्या भाषेंत वऱ्हाड प्रांताच्या दर्जासंबंधाचा ठराव पास करवून घेणें, त्याची अंमलबजावणी करण्याकरितां एक मंडळ नेमणें त्या मंडळाकडून वऱ्हाडचा प्रश्न पद्धतशीर रीतीनें लिहून काढून तो अल्पावधींत छापून लंडन येथें भरणाऱ्या गोलमेज परिषदेपुढें सादर करणें, गोलमेज परिषदेला जाणाऱ्या म. गांधीप्रभृति पुढाऱ्यांस या प्रश्नाचें स्वरूप यथातथ्यपणें

समजावून सांगणें इत्यादि अनेक कामें फारच जलदीनें करावयाचीं होतीं, व तीं त्यांनीं आपल्या नैसर्गिक धडाडीनें व शान्ततेनें वेळच्या वेळींच पार पाडलीं ! या वऱ्हाड सर्वपक्षीय–परिषदेचें अध्यक्षस्थान त्यांच्याकडेच आलें, आणि तिनें जी उपसमिति नेमिली तिच्या सूत्रचालकत्वाचीहि माळ त्यांच्याच गळयांत टाकण्यांत आली. या पोटकमिटीचे एक सभासद बुलढाण्याचे रामभाऊ कानिटकर हे गोलमेज परिषदेच्या सभासदांस भटून, त्यांना हा विषय समजावून सांगून, वऱ्हाडला स्वतंत्र प्रांताचा दर्जा व भारतीय राज्यघटनेंत ( All India Federation) स्वतंत्र घटकाचें स्थान प्राप्त करण्याची खटपट करण्याकरितां १५ ऑगस्ट १९३१ रोजीं विलायतेस गेले. ते या प्रश्नाचें महत्व मनावर ठिंबल्यामुळें स्वतःच्या तळमळीनें गेले हें तर खरेंच, पण लोकनायकांवरील निस्सीम प्रेम, व त्यांचा अनुयायी ह्मणवून घेण्यांत भूषण हेंच त्यांच्या निर्गमनाचें मुख्य कारण होय. असो.

## चरित्रलेखकाची असमर्थता.

लोकनायकांच्या जीवनक्रमाचें धांवतें कथानक वर संक्षेपतः दिलें आहे त्यावरून या महनीय पुरुषाच्या अंतरंगाची कांहींशीं तरी कल्पना वाचकांस आली असली पाहिजे. वरील वृत्तांतांत त्यांच्या गुणांचा अतिशय तर नाहींच, पण त्यांचा योग्य परामर्षहि करण्यांत आला नाहीं असा पूर्ण विश्वास आहे; कारण अगाध सागरतलाच्या बुडाशीं असलेलीं मौक्तिकें वर आणण्यास तत्सदृश अशा प्रचंड शक्तीचाच पाणबुड्या पाहिजे असतो. तें सामर्थ्य प्रस्तुत लेखकांत नाहीं. ह्मणून वरील वृत्तांतनिवेदन अतिशयोक्तीपेक्षां न्यूनोक्तीच्याच आरोपास पात्र होण्याचा जास्त संभव आहे अशी लेखकाची खात्री आहे. कारण " लोकोत्तराणां चेतांसि कोनु विज्ञातुमर्हति ! " लेखकाचा लोकनायकांशीं १९०५ पासून परिचय आहे. अमरावतीस शिवाजी विद्यालय काढलें तेव्हां या दोघांचा स्नेह जुळला व तेव्हांपासून लोकनायकांचें चरित्र अवलोकन करण्याची संधि लेखकास

प्राप्त झाली. इतका निकट सहवास घडला असतांहि प्रस्तुत लेखकाकडून या चरित्राचा यथायोग्य परामर्ष न व्हावा याचें कारण त्याचें बुद्धिमांद्यच होय. विहिरींत टाकलेला पोहरा पाण्यांत बुडलेला असतो तेव्हां जलसंचयाशीं समरस होऊन आपली व्याप्ति जलाएवढी आहे असें तो समजतो पण तो ओढून बाहेर काढतांच त्यांत त्याच्या परिमाणाचेंच जल येतें व त्याला आपलें अल्पत्व कळून येतें! लोकनायकांच्या सहवासांत असलेल्या लोकांना तें आपणांपैकींच एक आहेत असें वाटणें स्वाभाविक आहे, पण त्यांच्या उरुविक्रमाचा चित्रपट मनश्चक्षूंपुढें आणला ह्मणजे मग विश्वरूप दर्शनानंतर श्रीकृष्णासंबंधानें पार्थाची जशी स्थिति झाली तशीच त्यांच्या सहकार्यकर्त्यांची झाल्याशिवाय रहात नाहीं! तथापि " आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी " या न्यायानें सच्चरित्र कथन करणें—मग तें कथन करतांना अल्पमतीस अनुसरून न्यूनोक्तीचा अपरिहार्य दोष पदरीं पडला तरी तो स्वीकारून—हें आपलें कर्तव्य समजून लेखकानें हा प्रयत्न केलेला आहे. अस्तु. येथवर चरित्रनायकांच्या देशसेवेच्या बाबतींतील राजकीय कामागिरीचें निरूपण झालें. आतां त्यांच्या अंगच्या इतर गुणांचें थोडक्यांत दिग्दर्शन करून या कथानकाची पूर्ति करूं या.

## वक्तृत्व.

चरित्रनायकांनीं मॉरिस कॉलेजमध्यें शिक्षण घेत असतां तेथील वक्तृत्वसभेचें चालकत्व स्वीकारून आपल्या बुद्धिप्रभावानें नागपूरच्या विद्वान्, वाङ्मयप्रेमी व प्रगतिप्रिय थोरांचें चित्त कसें वेधलें याचा उल्लेख वरील कथानकांत आलाच आहे. वक्तृत्व हा गुण त्यांच्या ठिकाणीं उपजतच आहे, आणि स्वतः विद्याविशारद आणि भाषाप्रभु असल्यामुळें तर त्यांच्या वक्तृत्वांत शब्दसौष्ठव, बहारीचे दृष्टांत, मौजेचे श्लेष, गमतीच्या कोट्या, खोचदार विनोद, काव्यमय व भावनोद्दीपक वर्णनें, व पल्लेदार वाक्यें यांची रेलचेल भरलेली असते! त्यांचें वक्तृत्व ह्मणजे देशाच्या सद्य-

स्थितीरूपी आंबट दह्यांत राष्ट्रभक्तीची साखर घालून गाळलेलें, व त्यांत आपल्या सच्चारित्र्याचें केशर आणि मोहक वाणीचें जायफळचूर्ण घालून घोटलेलें मधुर श्रीखंडच होय ! त्यांच्या व्याख्यानांत प्रमुखत्वानें चमकणारा गुण ह्मणजे प्रतिपाद्य विषयाचें विवेचन करतांना त्याच्या मुळाशीं जाणारी त्यांची खोल विवेचक शक्ति व तद्विषयक तळमळ ही होय. यामुळेंच त्यांच्या ओजस्वी भाषणांचा श्रोत्यांच्या मनावर परिणाम झाल्याशिवाय राहत नाहीं. त्यांची प्रतिपाद्यविषयक तन्मयता श्रोत्यांस रंगवून सोडते आणि त्यांचें भाषण इतकें लौकर कसें संपलें असें श्रोत्यांच्या तोंडून उद्गार निघतात. लोकांमध्यें प्रसार करण्याच्या ( प्रॉपेगँडिस्ट ) भाषणांत त्यांचा निस्सीम स्वार्थत्याग, निरिच्छपणा, व देशप्रेम व्यक्त होतात, आणि जेथें इतिहास किंवा कार्यकारणभाव संबंधाचें विवेचन करावयाचें असतें तेथें त्यांचा अभ्यासशीलपणा व दीर्घव्यासंग प्रतिबिंबित होतो. लोकमान्य टिळक विद्यमान असतांनाच त्यांस वाई, संकेश्वर इत्यादि ठिकाणच्या जिल्हा परिषदांच्या अध्यक्षस्थानीं बसावें लागलें होतें, व तेथें जातांना आणि परत येतांना शिवरामपंत परांजपे व कृष्णाजीपंत खाडिलकर यांच्यासारख्या कसलेल्या वक्त्यांच्या सहवासांत फिरून त्यांना जागोजाग व्याख्यानें द्यावीं लागलीं. शिवरामपंत परांजपे यांच्यासारख्या वयोवृद्ध व अभिजात वक्त्याच्या आधीं किंवा मागाहून बोलणें यास केवढा अधिकार लागतो याची कल्पना वाचकांनीं करावी, ह्मणजे लोकनायकांच्या वक्तृत्वास महाराष्ट्रांत कोणता दर्जा प्राप्त झाला आहे याचें अनुमान सहज करतां येईल. प्रस्तुत लेखक मुंबईस ' सन्देश ' दैनिकांत उपसंपादकाचें काम करीत असतांना होमरूल लीगची चळवळ सुरू झाली तेव्हां वैद्य आपाशास्त्री साठे यांच्या घरीं जमलेल्या दहा पांच विद्वान मित्रमंडळींत बापूजी अणे यांची बुद्धिमत्ता व वक्तृत्व यासंबंधीं गोष्टी निघाल्या. तेव्हां एकानें छातीठोकपणानें असें उद्गार काढले— या सद्गृहस्थास छातीवर थाप मारून बाणेदारपणाचें भाषण

करण्याची संवय आहे—कीं 'लोकमान्यांस उदंड आयुष्य असो, पण त्यांच्या पश्चात् बुद्धिमत्तेचें केंद्र पुणें—मुंबईकडून वऱ्हाड मध्यें ओढलें जाणार आहे हें खास'! या खाजगी बैठकींतील भाषणांत तथ्य नसेल, तरी कांहीं अंशीं ही उक्ति भविष्यवाणीसारखी खरी ठरली आहे यांत काय संशय? आज संपूर्ण महाराष्ट्र लोकनायक बापूजी अणे यांच्या नेतृत्वाकडे पाहत आहे!

## लेखनसामर्थ्य.

लेखनाच्या व्यवसायास लागणारें स्वास्थ्य त्यांना कधीं मिळालें नाहीं, पण लेखनास लागणाऱ्या सामग्रीची जय्यत तयारी त्यांच्याजवळ इतकी विपुल आहे कीं अनेक ग्रंथ लिहिल्याचा अभिमान बाळगणारा ग्रंथकार त्यांच्या बैठकीवर थोडा वेळ बसला व विविध विषयांवर त्यांच्या तोंडून होणारी चर्चा त्यास ऐकावयास मिळाली ह्मणजे पुस्तकसंग्रहालयांत जाऊन वाचण्याचे श्रम करण्यापेक्षां या चालत्याबोलत्या विद्यामंदिरापासूनच आपणास पुष्कळ उद्बोधक व स्फूर्तिदायक विषयांचें ज्ञान होण्यासारखें आहे असा त्याचा समज झाल्याशिवाय राहात नाहीं. त्यांनीं लेखन ह्मणण्यासारखें केलें नाहीं, तथापि उत्तमश्लोककृत प्राकृत सप्तशती, आनंदगीत, संस्कार-मीमांसा इत्यादि ग्रंथांस त्यांनीं ज्या मार्मिक व संशोधन बुद्धिसूचक प्रस्तावना लिहिल्या आहेत त्यांत, त्याच प्रमाणें 'मराठीचा जयजयकार,' 'निःशस्त्र प्रतिकार' या लेखांतून त्यांची वाङ्मयविषयक व राजकारणविषयक 'नवनवोन्मेषशालीं' प्रतिभा दृग्गोचर झाल्याशिवाय राहत नाहीं. ग्रंथरूपानें व्यक्त न झालेला, पण खाजगी संभाषणांतून क्षणोक्षणीं दृष्टीस पडणारा—इंग्रजी भाषा-प्रयोग करावयाचा झाल्यास, 'त्यांच्या भालपट्टलावर ठळक अक्षरांनीं लिहिलेला' त्यांचा गाढ विद्याव्यासंग व सूक्ष्म विवेचनशक्ति हीं तात्यासाहेब केळकर, चिंतामणराव वैद्य यांजसारख्या पहिल्या प्रतीच्या ग्रंथकारांच्या परिचयाची आहेत ह्मणूनच लोकनायकांना १९२८ सालीं ग्वाल्हेर शहरीं झालेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानीं नियोजित करण्यांत

आलें होतें. ' या अध्यक्षानें असे कोणते ग्रंथ निर्माण केले आहेत ' असें ह्मणून त्यांच्यावर ज्या टीका करण्यांत आल्या होत्या त्यांजकडे कोणीच लक्ष दिलें नाहीं याचें कारण चरित्रनायकांची सर्वमान्य योग्यताच होय. ज्यांच्या तोंडून सहज बाहेर पडणाऱ्या उक्ति ग्रथित केल्या असतां त्यांचें लोकादरास पात्र होणारे ग्रंथ बनतात, त्या वाङ्मयनिधीनें आपल्या हातानें ग्रंथ लिहिला नाहीं ह्मणून त्यास ग्रंथलेखकांत किंवा साहित्यसेवकांत अग्रेसरत्वानें बसण्याची योग्यता नाहीं असें ह्मणणें, ह्मणजे गणितावर भाराभर ' शालोपयोगी ' पुस्तकें लिहून प्रसिद्ध करणाऱ्या एखाद्या गणिती शिक्षकाची योग्यता लोकमान्य टिळकांस नाहीं असें सिद्ध करण्यासारखेंच हास्यास्पद आहे ! असो. ग्वाल्हेर साहित्य संमेलनाचें अध्यक्षीय भाषण लोकनायकांनीं यवतमाळास लिहिण्यास प्रारंभ केला, पण नित्याच्या बहुविध व्यवसायापायीं त्यांना तें चतुर्थांश देखील लिहून काढावयास फुरसत मिळाली नाहीं, ह्मणून तें रेल्वेच्या डब्यांत लिहून काढण्याचा उद्योग त्यांना करावा लागला, पण त्या दिवशीं फर्स्टक्लासमध्यें जागा न मिळाल्यामुळें सेकंड क्लासनें प्रवास करावा लागला व भाषणहि अपुरेंच राहिलें. आजवर एकाहि साहित्यसेवकाच्या तोंडून ऐकावयास मिळाला नाहीं असा एक अपूर्व विषय शिरगणतींतील आंकड्याच्या आधारानें प्रतिपादन करण्याचा त्यांचा मानस होता; त्यांचें कच्चें टिपण गोपाळराव ओगले, नागपूरच्या महाराष्ट्राचें संपादक यांनीं पाहिलेंहि होतें; पण तो विषय पूर्ण करावयास व लिहून काढावयास त्यांना अवकाशच मिळाला नाहीं. त्यांनीं ही आपली ' थिअरी ' पुरी करून साहित्य संमेलनापुढें मांडली असती तर साहित्यसेवकांना एका अभूतपूर्व पक्वान्नाचें खाद्य खास मिळालें असतें.

## अजातशत्रुत्व.

लोकनायकांची प्रखर धर्मनिष्ठा व कर्माचा आग्रह यांचा या ग्रंथाच्या प्रारंभींच उल्लेख आलेला आहे. रात्रींचे दोन वाजले तरी त्यांची सायंसंध्या

व जपादिकाचें आन्हिक चुकावयाचें नाहीं असा त्यांचा नित्यक्रम आहे. तथापि आपल्या धर्मश्रद्धेचें स्तोम माजवून इतरांना कमी लेखण्याचा शब्द त्यांच्या तोंडून कधींहि बाहेर पडला नाहीं. आपण जें आपलें कर्तव्य ह्मणून निश्चित केलें आहे तें ज्याचें त्यानें करावें, तें करताना इतरांना हिणविण्याचें कारण काय? ही त्यांची विचारसरणी या बाबतींत, तशी इतरत्रहि आहे. नागपूर कॉंग्रेसपासून जुना सनदशीर मार्ग व नवा असहकार संप्रदाय यांत सामान्य जनतेमध्यें तुमुल रण माजलें असल्याचें सर्वांच्या परिचयाचें आहे, पण लोकनायकांची विचारसरणी अशी आहे कीं ज्यांचा ज्या पद्धतीवर विश्वास आहे त्यानें ती पद्धत प्रामाणिकपणानें आचरावी. मला जो मार्ग किंवा जें मला पसंत वाटतें तें तुला कां नाहीं वाटत? असा आग्रह जर आपण धरूं लागलों तर सर्व दुनिया माझ्या मताची होईपर्यंत मला कोणाशीं सहमत करून वागतांच येणार नाहीं अशी अनिष्टापत्ति प्राप्त होते! यापेक्षां सर्वांनीं आपापल्या प्रामाणिक बुद्धीस शरण जाऊन पटेल व परवडेल त्या मार्गाचें अवलंबन करावें, सर्वांच्या सर्वांगीण प्रयत्नांचें फल जें कांहीं व्हायचें असेल तें होईल, अशा तऱ्हेची त्यांची विचारसरणी असल्यामुळें त्यांचा कोणाही पुढाऱ्याशीं आजन्म कधीं खटका उडाला नाहीं. किंवा भिन्न मत धारण करणारास त्यांच्यापासून दोन पावलें दूर राहण्याची बुद्धि झाली नाहीं. अशा रीतीनें ते व्यक्तिस्वातंत्र्याचे निस्सीम भोक्ते असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं मनाचा उदारपणा आकंठपूर्ण भरलेला आहे. भिन्न मताचा अभिमानी आपल्या समजुतीप्रमाणें काम करतो, त्यानें माझ्या कार्याचा विनाश होत नाहीं तर त्याच्या वाटेस जाण्याचें प्रयोजन काय? आणि तो जर माझ्या खोड्या काढूं लागलाच तर आपण त्याजशीं टक्कर देऊन आपलें स्थान अटळ राखण्यास समर्थ आहोंत ही जाणीव व आत्मविश्वास त्यांच्या ठिकाणीं असल्यामुळें मतभेद माजविण्याच्या कामांत ते कधींच लक्ष घालीत नाहींत. या नैसर्गिक उदार भावामुळेंच त्यांना सम्पूर्ण महाराष्ट्रांत किंबहुना

हिंदुस्थानांतील सर्व पुढाऱ्यात अजात शत्रुत्वाचें अनन्यसामान्य महत्पद प्राप्त झालें आहे! त्यांचीं सामाजिक व राजकीय मतें नेमस्तांच्या मतांशीं जुळणारीं नाहींत हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे, तथापि सर मोरोपंत जोशी, रा. ब. नारायणराव केळकर, रा. ब. ब्रह्म इत्यादिकांशीं त्यांचा जीवलग स्नेहसंबंध आहे, आणि चरका-खादीच्या बाबतींत त्या संप्रदायाच्या आद्य प्रवर्तकांशीं त्यांचें तंतोतंत जुळणारें नसलें तरी एकाहि खादीनिष्ठ देश-भक्ताचा त्यांच्याविषयीं गैरसमज झालेला नाहीं. सार्वजनिक कार्य करण्या-करितां पुढें सरसावलेला पुढारी किंवा कार्यकर्ता केवढाहि विचित्र मनोवृत्तींनीं भरलेला असो, त्याजशीं मिळते घेऊन त्याच्या प्रेमवृत्ति काबीज करण्याच्या बाबतींत लोकनायक अगदीं हातखंडा आहेत! गेल्या दहा वर्षांतील कौन्सिल-वादी व बहिष्कारवादी यांच्या धुमश्चक्रींत सर्व पुढाऱ्यांवर विरुद्ध पक्षाकडून टीकास्त्रांचे एवढे मार झाले, पण या मारांतून सर्वांशी मुक्त असलेला महा-राष्ट्रीय पुढारी दाखवायचा असेल तर लोकनायक बापूजी यांच्याकडेच अंगुलिनिर्देश करावा लागेल!

## प्रगतिप्रियता.

समाजसुधारकांनीं जे प्रश्न सामाजिक सुधारणेचे ह्मणून हाताशीं घेतले—उदाहरणार्थ विधवाविवाहादि—त्यांजशी ते कधीं समरस झाले नाहींत. लोकमान्य टिळक हे त्यांचे राजकीय गुरु आहेत, व आधी राजकीय मोक्ष संपादन केल्याशिवाय सामाजिक सुधारणा करणें शक्य व इष्टहि नाहीं असें त्यांना वाटतें; ह्मणून त्यांनीं आपलें सर्व बुद्धिबल राजकीय मोक्ष संपादना-च्याच कामीं खर्च केलें आहे. अस्पृश्योद्धार ही जी सामाजिक सुधारणेची बाब राष्ट्रीय सभेच्या विधायक कार्यक्रमांत समाविष्ट करण्यांत आली आहे तिचा पुरस्कार लोकनायक आवेशानें करितात, पण तें सामाजिक सुधारक या नात्यानें नव्हे, तर राष्ट्रसुधारक ह्मणूनच. सभोंवतालचे लोक ओंवळ्यानें, कपड्यांनीं, किंबहुना बूट पाटलोणीसह जेवायला बसले असतां लोकनायक

असल्याहि पंक्तींत आपला कद परिधान केल्याशिवाय राहत नाहींत ! ब्राह्मणाचें सोंवळें इतकें नितांत शुद्ध व पवित्र असतें कीं तें इतरांच्या संपर्कानें विटाळूंच शकत नाहीं असें ते वारंवार ह्मणत असतात. लोकनायकांची गणना करावयाची तर सनातन मतानुयायांतच करावी लागते, पण डोळे झांकून अंधपणानें तो मार्ग अनुसरणारे ते नव्हत. त्यांनीं आपला ज्ञाननेत्र पूर्णपणें उघडलेला आहे. हल्लीं ब्राह्मणांमधील भिन्न शाखा आपसांत विवाह करीत नाहींत व ही रूढि बरीच प्राचीन कालापासून चालत आलेली दिसते; पण केवळ रूढि ह्मणूनच ती ते सर्वस्वी प्रमाण मानणारे नाहींत. धर्माची प्रतिष्ठा समाजाच्या धारणाकरितां व त्याच्या अभिवृद्धीकरितां आहे, अर्थात् हें साध्य ज्या योगें साध्य होईल तें करण्यास प्रवृत्त होणें हा धर्माचा मुख्य उद्देश आहे. तो लक्षांत बाळगून ते प्रत्येक धार्मिक बाबीचा आमूलाग्र विचार करितात, व मग शास्त्रोक्त पद्धति न सोडतां विचार करून बुद्धीस जें पटेल त्याचा स्वीकार करितात. खामगांव येथें कण्व परिषद झाली तिचें निमंत्रण आल्यावरून लोकनायक तेथें गेले. या परिषदेंत भिन्नशाखीय द्राविड ब्राह्मणांनीं परस्परांत विवाह सुरूं करावयास शास्त्राची आडकाठी नाहीं असा एक ठराव तुमुल वाग्युद्धानंतर बहुमतानें पास झाला. या ठरावाच्या समर्थनार्थ परिषदेमध्यें भाषण करण्याच्या कामीं लोकनायकांची योजना करण्यांत आली. परिषदेस शास्त्री व पंडित बहुत जमलेले होते, व रूढीस सोडून असलेल्या या मताचा विरोध करणारेहि त्यांत अनेक होते. विषयनियामक मंडळाच्या बैठकींत व परिषदेमधील भाषणांत त्यांनीं या मताची मांडणी शास्त्रीय प्रमाणें व व्यावहारिक युक्तिवाद यांस धरून इतकी सुंदर केली कीं प्राचीन रूढीच्या अभिमान्यांच्या मनावरहि त्याचा खोल परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. शास्त्र खरें, रूढि ही त्या शास्त्राच्या आधारावर उभारलेली, ह्मणून रूढीचें प्राबल्य शास्त्राचा शिरच्छेद करण्याइतकें माजूं देतां कामा नये अशी त्यांची विचारसरणी आहे, व ही त्यांच्या प्रगतिप्रियत्वाचीच साक्ष होय.

# धर्मकोविदत्व.

ते रूढीचे अंधभक्त नाहींत यावरून रूढीस कस्पटासमान लेखणारे आहेत असा जर कोणाचा समज असेल तर तो साफ चुकीचा होणारा आहे. रूढि या प्रत्यक्ष व्यवहारांत अडथळा आणीत नाहींत तोंवर त्या पाळण्यास हरकत नाहीं, कारण त्यांस एक प्रकारचें पावित्र्य आलेलें असतें. वंदनीयाचा आदर करणें हा अभिजात संस्कृतीचा एक भाग आहे. रूढि अहृदयपणें लाथाडल्यास प्रचंड संख्याक अशा सनातन धर्मानुयायी जन-समाजाचें मन दुखविलें जातें, व आपण त्यांच्या सहानुभूतीस व प्रेमास आंचवतों, या विचारानेंहि ते रूढींचें परिपालन करण्याची दक्षता बाळगीत असतात. लोकसंग्रहचातुर्य त्यांच्या ठिकाणीं पूर्णपणें भरलेलें आहे याचेंच हें प्रत्यन्तर होय. सनातनधर्माविषयीं त्यांना एवढा ज्ञानमूलक पराकाष्ठेचा आदर आहे ह्मणूनच ते जितके राष्ट्रीय दृष्टीचा चरित्रक्रम चालविणाऱ्या नवीन समाजांत, तितकेंच प्राचीन परंपरानुरूप चालणाऱ्या ब्रह्मवृन्दादि समाजांत लोकप्रिय झालेले आहेत. लोकनायकांनीं कायदेभंगास प्रयाण करण्यापूर्वी येथील ब्राह्मणांनीं स्वयंस्फूर्तीनें श्रीकेदारेश्वरावर अभिषेक सुरू केला, व जातांना त्यांनीं लोकनायकांस वेदमंत्रांनीं आशिर्वाद देऊन त्यांस प्रसा-दाचा नारळ दिला. यावेळचें त्यांचें परस्परांचें हृदयमीलन, त्या वेदघोषानें व त्यांतील राष्ट्रीय भावनास पोषक अशा मंत्रांनीं उचंबळून आलेल्या लोकनायकांच्या सद्भावना, वेद प्रतिपादित कर्ममार्गाच्याच अनुरोधानें आपण आपल्या वैभवशाली व पराक्रमशील प्राचीन पूर्वजांचें अनुकरण करीत आहोंत हा त्यांच्या नेत्रांत चमकणारा अढळ आत्मविश्वास इत्यादि दृश्य ज्यांनीं अवलोकन केलें त्यांना लोकनायक बापूजी अणे हे सनातन धर्मी-यांच्या अंतरंगांत किती खोल वसतिस्थान करून राहिलेले व त्यांचे खरे नेते व प्रतिनिधि आहेत हें दिसून आल्याशिवाय राहिलें नाहीं. त्यांच्या अंगची धर्मशीलता व शास्त्रीय वाङ्मयाचा सखोल व्यासंग महाराष्ट्रभर

प्रसिद्ध आहे. पुण्याच्या मीमांसा विद्यालयानें हिंदु धर्माच्या संरक्षणार्थ व त्या धर्मातील आद्य सिद्धांतांच्या ज्ञानाच्या अभावीं हायकोर्टाकडून भलभलते निवाडे केले जातात त्याच्या प्रतिकारार्थ हिन्दु लॉ रिचर्स कमिटी नेमलेली आहे तींत न्यायमूर्ति माडगांवकर ( मुंबईचे माजी हायकोर्ट जज्ज ) पांडुरंग वामन काणे, वामनशास्त्री किंजवडेकर, नारायणशास्त्री मराठे प्रभृति विद्वान आहेत, व याच कमिटीवर लोकनायक बापूजी अणे यांची सभासद ह्मणून निवडणुक करण्यांत आलेली आहे यावरून धर्मकोविदात त्यांची केवढी प्रतिष्ठा आहे हें दिसून येतें.

## राष्ट्रोन्नतींत स्त्रीसमाजाचें कर्तव्य.

विधवा विवाहादि सामाजिक सुधारणाच्या बाबतींत तें कधीं कोणाशीं वादविवाद करतांना आढळले नाहींत, तथापि राष्ट्राच्या कल्याणास पोषक व धर्माच्या आड येणार नाहीं अशी आचार सुधारणा करण्यास व ती अमलांत आणण्यास त्यांनीं मागें पाय घेतला नाहीं. स्त्रियांनीं राष्ट्रीय कार्यांत अवश्य भाग घेतला पाहिजे असें ते आवेशानें प्रतिपादन करीत असतात. स्वदेशी व बहिष्कार हें जे कॉंग्रेसच्या विधायक कार्यक्रमाचें अंतरंग त्याची परिपूर्णता व्हावयाची तर अर्धा, किंबहुना या संबंधाचा सगळा भार भगिनी-वर्गानें उचलला पाहिजे असें ते जोरानें प्रतिपादन करितात. पुरुषांनीं आपल्या मलीन व व्यवहारकठोर मनोवृत्तींस अनुसरून स्वदेशी व बहिष्काराच्या व्रतपरिपालनाच्या बाबतींत प्रमाद करणें संभवनीय आहे, पण अत्यंत शुद्ध मनोभावना व कोमल अन्तःकरणें धारण करणाऱ्या स्त्रीसमाजानें स्वतःचें गृह हें राष्ट्रीय सभेचें एक उपासनामंदिर समजून, व तेथें वास्तव्य करून राष्ट्रोपासना करण्याकरितां आपणांस राष्ट्रीय सभेनें देशसेविका ह्मणून नियुक्त केलें आहे अशी भावना पूर्णपणें बाणून घेऊन, आपल्या घराच्या चार भिंतींच्या आंत परदेशी वस्तू येऊं द्यावयाच्या नाहींत, या अमंगल वस्तूंनीं आपलें मंदिर भ्रष्ट होऊं द्यावयाचें नाहीं, आणि आपल्या स्वयंपाक-

गृहांत तर परदेशी वस्तूचा प्रवेश होऊं द्यावयाचाच नाहीं असा निर्धार केला व आपल्या घरांत येणाऱ्या प्रत्येक वस्तूवर त्यांनीं काळजीपूर्वक लक्ष ठेविलें तर बाजारांत उभें राहून पिकेटिंग करण्याचा प्रसंग न येतां स्वदेशी, बहिष्कार-व्रत सिद्धीस नेल्याचें श्रेय मिळेल, आणि हजारों व्याख्यानांनीं जो परिणाम घडून यावयाचा नाहीं तो स्त्रियांच्या असल्या निर्धारानें घडून येईल, व राष्ट्राची महत्सेवा केल्याचें श्रेय त्यांस मिळेल असें ते फारच बहारीनें भगिनीवर्गाच्या मनावर बिंबवीत असतात. पुसदसारख्या प्राचीन मतें व पुराण आचार यांचें आगर असलेल्या गांवीं तेथील स्त्रीसमाजानें कायदेभंगाच्या वेळीं वीरांस ओंवाळून त्यांच्या हातांत कंकणें बांधण्याचा, रस्त्यानें मिरवणुकी काढून राष्ट्रीय पद्यें ह्मणण्याचा व प्रभात फेऱ्या काढण्याचा जो नवीनच परिपाठ सुरू केला त्याच्या स्फूर्तीचें मुख्य श्रेय लोकनायकांकडेच आहे.

## सर्वाध्यक्षत्व.

लोकनायक बापूजी अणे हे या प्रान्तांतील राष्ट्रीय आन्दोलनाचे अग्रेसर ह्मणून पैसा फंड, होमरूल लीग फंड, टिळकट्रस्ट फंड इत्यादि महत्वाच्या संस्थांचे सभासद आहेत. लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्ली मधील नॅशनॅलिस्ट पक्षाचे ते सेक्रेटरी होतेच, पण ॲसेंब्लीनें त्यांची योग्यता जाणून त्यांना रेल्वे फिनान्स बोर्डावरहि निवडून दिलें होतें. या जागेवर काम केल्यामुळें रेल्वेच्या कारभारांतील खडानखडा माहिती त्यांनीं अवगत करून घेतली आहे. वऱ्हाडांत अशी एक महत्वाची संस्था नाहीं कीं जी त्यांची सल्ला घेत नाहीं. लोकनायक हे विदर्भ साहित्य संघाचे व येथील शारदाश्रमाचे अध्यक्ष आहेत. डिस्ट्रिक्ट असोसिएशनही त्यांनींच अस्तित्वांत आणलेली संस्था पहिलीं आठ नऊ वर्षें रिपब्लिकच्या पद्धतीवर निरध्यक्षत्वानेंच चालली होती, पण तिला अध्यक्ष असावा असा ठराव सभासदांनीं पास केला, आणि तदनुसार तिच्या अध्यक्षस्थानीं योजना करण्याचें काम पडलें तेव्हां तें पद त्यांनाच देण्यांत आलें, आणि दरवर्षी सेक्रेटरी व कार्यकारी सभासद यांच्या निवडणुकी

होऊन नवीं नवीं माणसें येतात, तरी त्यांचें अध्यक्षपद ध्रुवच आहे. किम्ब-हुना ज्या ज्या संस्थेंत त्यांना कार्य करावें लागतें तेथें तेथें अध्यक्षपद त्यांच्या-करितांच राखून ठेवलेलें आहे असें विधान केलें ह्मणजे यवतमाळची ज्युबिली लायब्ररी किंवा गीता धर्ममंडळ यांचेहि तेच अध्यक्ष आहेत असें निराळें सांगण्याचें प्रयोजनच उरत नाहीं.

## सामान्य राहणी.

'साधी राहणी व उच्च विचारसरणी' याचें लोकनायक बापूजी अणे हें उत्कृष्ट उदाहरण आहेत. लहानपणचे दिवस गरीबींत गेले असल्यामुळें त्यांना दारिद्र्याविषयीं पराकाष्ठेची अनुकंपा व सहानुभूति वाटते. गरीब आप्ते-ष्टांच्या घरीं जेवणास किंवा कार्यप्रसंगास जाऊन त्यांचा समाचार घेणें यांत त्यांना फार आनंद वाटतो. कायदेभंगास येथून पुसदला जाण्यापूर्वी ते घरोघरीं फिरून ह्मातारे, स्नेहीसोबती, इष्टमित्र इत्यादिकांस आठवण ठेवून भेटले, आणि तुरुंगवास संपवून परत आल्यानंतरहि आठवण ठेवून त्यांस भेटावयास घरोघर फिरले, यावरून त्यांचें अंतःकरण केवढें प्रेममय आहे, व या प्रेमशक्तीनें ते आबालवृद्धांचीं मनें कशीं स्ववश करून टाकतात तें दिसून येईल. अभ्यासीपणाच्या बाबतींत शाळाकॉलेजांतील विद्यार्थ्यांनींहि त्यांचा कित्ता घेण्यासारखा आहे. वेळ मिळाला कीं कधीं महाभारताची पोथी तर कधीं व्याकरणग्रंथ, तर कधीं पूर्वमीमांसा तर कधीं स्मृतिग्रंथ, आणि पुष्कळदां सरकारी कमिशनांचे रिपोर्ट किंवा राजकीय घटनांचीं पुस्तकें वाच-ण्यांत ते निमग्न होतात. जेवतांना पंक्तींत बोलावयास कोणी सोबती असला तर बोलण्याच्या नादांत आज काय पदार्थ खाल्ले याचेंहि भान त्यांना राहत नाहीं! एकदां दिपवाळीच्या सुमारास ह्मणजे आंब्याचा मोसम नसतां लेखकाच्या घरीं ते जेवणास आले. त्या दिवशीं आयतें तयार करून ठेवलेलें आंब्याचें पन्हें जेवणांत होतें. गोष्टीच्या भरांत त्यांनीं त्याचा एखादा भुरका मारला असेल पण पुनः त्यांचा हात तिकडे गेला नाहीं. लेखकास वाटलें

याना हा पदार्थ आवडत नसावा. भोजनोत्तर त्यांना प्रश्न करण्यांत आला कीं तुह्मांला आयत्यावेळीं पाणी घालून तयार केलेलें पन्हें आवडत नाहीं? होय, ह्मणून त्यांनीं उत्तर दिलें, आणि आज तर जेवणांत तेंच होतें असें जेव्हां त्यांना निक्षून सांगण्यांत आलें तेव्हां ते ह्मणाले, मला तेव्हांच सांगितलें असतें तर त्याच्या पांच चार वाट्या उडविल्या असत्या! जेवणांत त्यांची मेधा गोड पदार्थांपेक्षां खारट, तेलकट व तिखट पदार्थांकडे ज्यास्त आहे. भातांत वडा किंवा भजीं कालवून त्यावर कढेल तेल घेण्याची वऱ्हाडांत वहिवाट आहे. हल्लीं पुणेशाही भोजनाची रीत चोहोकडे, विशेषतः कार्यादिकांच्या पंक्तींत पडली असल्यामुळें, असलें भोजन सहसा कोणी जेवत नाहीं; पण ज्यांना बापूजींची ही आवड माहीत आहे ते त्यांच्या करतां कढेल तेल आणावयास चुकत नाहींत! वर्णीस चांगले तीसतीस चाळीस चाळीस लाडू-जिलब्या पचविणारे भक्षक अजूनहि थोडे विद्यमान आहेत. बापूजींनीं वकीली पास होईपर्यंत असल्या पद्धीच्या भक्षकांचाहि वेळप्रसंगीं बार्वपरिहार केला आहे!

## आवडीनिवडी.

लोकमान्य टिळक हे बापूजींचे राजकीय गुरु, ह्मणून लोकमान्यांची विचार करण्याची पद्धत, गंभीर मुद्रा, खोल अभ्यास, संग्रह नैपुण्य, भाषणशैली इत्यादिकांचा त्यांच्या मनावर विलक्षण खोल परिणाम झालेला त्यांच्या आचारांत दृष्टीस पडतो. आणि ध्येयभूत व्यक्तींच्या आनुषंगिक चेष्टांचेंहि न कळत अनुकरण अनेकदां होतें ह्मणूनच कीं काय सुपारी खाण्याचा बापूजींना लोकमान्याप्रमाणें फार नाद आहे. लिहितांना काय, वादविवाद चालला असतां काय, विचारांस चालना यावी ह्मणून कीं काय ते हातांत सुपारीची डबी घेऊन एकेक खांड तोंडांत टाकत असतात! प्रवासास किंवा कचेरींत जातांना एकपरी त्यांचें घड्याळ किंवा फौंटनपेन विसरून राहील, पण सुपारीची डबी सहसा विसरायची नाहीं! वैवाहिक आयुःक्रमास

प्रारंभ झाल्यापासून त्यांनीं पानसुपारी खाण्यास सुरुवात केली, आणि पत्नीचा वियोग झाला तेव्हांपासून विडा अजीबात सोडला आहे! या मध्यंतरींच्या काळांत विडा खाण्याचा त्यांचा नाद एवढा वाढला होता कीं दिवसांतून ते किती पानें खात याची गणती नसे, एवढेंच नव्हें तर रात्रीं दोन तीन वाजतां त्यांना जाग आला तर विडा खाऊन तंबाकू तोंडांत सोडल्याशिवाय ते पुनः झोपीं जात नव्हते! बैठकीवर बसले आहेत, आणि तबकांतली पानें संपलीं असून तीं घरांतून आणून टाकण्यास कोणी नोकर किंवा मुलबाळ समोर नाहीं, अशा वेळीं विडा खाऊन अलग टाकलेल्या देठांच्या भोवतालचा पानाचा अंश काढून त्यावरच विड्याची तृप्ति भागवितांना ते अनेकदां दिसत व असें करतांना ‘कशी आहे तंबाकूची लजत?’ असें विनोदानें ह्मणून विड्याच्या ‘तल्फी’ चें पुराण सांगत! विनोदीपणा, आनंदी वृत्ति व हजरजबाबीपणा या संबंधांत तर ते अद्वितीय आहेत!!

## लोकोत्तरपणा.

असामान्य बुद्धिमत्ता व लोकोत्तर स्मरणशक्ति यांना बन्धन सहन होत नाहीं ह्मणून कीं काय लोकनायक बापूजी अण्यांना डायरी लिहिणें माहीत नाहीं! पण डायरी नसली तरी गेल्या वीस पंचवीस वर्षांतील गोष्टींचा पाडा ते अचूक सांगूं शकतील! त्यांना व्याख्यानांतील मुद्यांचें टिपण करणें माहीत नाहीं, आणि यद्यपि टिपण जवळ असलें तरी त्यांची कल्पनाशक्ति एवढी दांडगी आहे कीं आयत्या वेळीं स्फुरलेले विचार हेच आगाऊ कल्पना केलेल्या टांचणापेक्षां प्रभावी ठरतात! लोकमान्यांनीं एकदां त्यांस आपलें भाषण लिहून काढावयास सांगितलें. त्यांच्याकडून भाषण लिहिणें झालें नाहीं, आणि तें त्यांनीं तोंडानें दिलें. लोकमान्य पाहतात तो कागदाच्या पुडक्यापैकीं समोरच्या एका कागदावर थोडीशी प्रस्तावना लिहिलेली, पण बाकीचे सारे कागद कोरे! तेव्हां त्यांनीं उद्गार काढले कीं तुह्मी लिहिण्याचे श्रम घेतले नाहींत हेंच बरें झालें ह्मणायचें! लोकनायकांना वर्तमानपत्रकारांस मुलाखत

देणें माहीत नाहीं. प्रसिद्धिपराङ्मुखता हा त्यांच्या स्वभावांतला एक विशेष आहे. बापूजींना केस ठेवणें, नेकटाय, कॉलर, पाटलून, टेनिस, पत्ते, सोंगट्या अजून माहीत नाहीं !! प्रस्तुत लेखकानें १९१९ मध्यें ' लोकमत ' पत्र सुरू केलें व त्यावर घालण्याकरितां आपल्या पत्राच्या धोरणास जुळणारा एक श्लोक लोकनायकांस मागितला. सारा मजकूर कंपोज होऊन तयार, व पत्राचा पहिला अंक काढायला दोनच दिवस उरले, इतक्यांत बापूजी वणी येथील जिल्हा परिषदेस जावयास निघाले. त्यांची धावती मोटर दादासाहेब काणे यांच्या घराच्या कोपऱ्यावर हातानें थांबवून लेखकानें उभी केली, आणि श्लोकाची आठवण दिली; आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं मोटरचें एंजिन न थांबवितां त्यांनीं पुढील श्लोक आपल्या हस्ताक्षरानें चटकन लिहून दिला. तो असा—

अनुगतपरितोपितानुजीवी
मधुरवचश्चरितानुरक्तलोकः ।
सुनिपुणपरमात्मसक्ततंत्रो
विचरति " लोकमतः " प्रदीप्तरश्मिः ॥

कोठल्या तरी काव्यांतल्या तोंडी पाठ असलेल्या एका श्लोकांत चटकन थोडासा फेरफार करून तो श्लोक त्यांनीं एवढ्या त्वरेनें दिला ! ही त्यांच्या विलक्षण बुद्धिमत्तेचीच साक्ष होय. बापूजींच्या हस्ताक्षराचें जरी सर्वांस कौतुकच वाटेल, तरी त्याबद्दल त्यांचें कोणी अभिनंदन केलें असेल असें वाटत नाहीं ! कित्येक दिवस पर्यंत तें अण्णासाहेब जतकर, भास्करराव बोरीकर ( त्यांचे टायपिस्ट ) आणि रामभाऊ जोशी या खेरीज कोणास लावण्याची मारामार पडे ! कामापायीं बापूजींना तहान नाहीं, झोंप नाहीं, भूक नाहीं, ऊन नाहीं, थंडी नाहीं ! एका निवडणुकीच्या वेळीं गुडघाभर चिखल तुडवीत ते चिंचोलीहून दिग्रसला गेले होते ! एकाच विषयावर त्यांनीं पांच ठिकाणीं पांच व्याख्यानें दिलीं तर प्रत्येक वेळची त्यांची विवेचनशैली

आणि प्रमाणें भिन्न असल्यामुळें हें प्रत्येक व्याख्यान श्रवणीय वाटतें. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी या दोघांचे राजकारणाचे मार्ग भिन्न पडल्यामुळें या दोन मतांच्या अभिमान्यांत गेल्या दहा वर्षांत फार तीव्र मतभेद माजला असून त्या योगें कार्यहानीहि पुष्कळ वेळ झाली आहे. पण लोकनायकांना या मतभेदाचा उपसर्ग फारसा पोहोचला नाहीं. टिळक आणि गांधी यांच्यामधील भेद दाखवून एकास श्रेष्ठ व दुसऱ्यास कनिष्ठ लेखण्याचे जे प्रकार अनेकदां घडत ते त्यांस मुळींच खपेनात, व ते या तुलनेची अनिष्टता दाखविण्याकरितां असें प्रतिपादन करीत कीं हे दोन महापुरुष हिंदुस्थानच्या भाग्यानेंच उदयास आले. त्यांनीं आपापल्या परिस्थितीप्रमाणें आपापले मार्ग आंखून कार्य केलें. पण दोघांनीं अगदीं भिन्न परिस्थितींत काम केलें असल्यामुळें त्या दोघांची तुलनाच होऊं शकत नाहीं, आणि या मुद्यांचें प्रतिपादन करून ते 'जर तर' च्या कल्पना लढवून आपसांत यादवी माजविणारांचें सांत्वन करीत असत. दुसऱ्याच्या मतांमधील ग्राह्यांश असेल तेवढाच ग्रहण करून अग्राह्यांशाला बगल द्यावयाची, आणि भिन्नमतवाल्याच्या निर्विवादास्पद बाबींचा युक्तीनें व शहाणपणानें समन्वय करून राष्ट्रकार्याचा गाडा पुढें ढकलायचा हें त्यांच्या कार्यपद्धतीचें रहस्य आहे. लोकनायकांना 'क्लब लाइफ' चा भारी तिटकारा आहे! सुशिक्षितांनीं टेनिस, पत्ते खेळायला त्यांची हरकत नाहीं, पण जणों काय आपलें आयुष्य पोट भरण्याकरितां व मनाची करमणूक करण्याकरितांच आहे अशा प्रकारें सुशिक्षितांनीं आपलें आयुष्य घालविणें ह्मणजे शिक्षणाची, समाजनेतृत्वाची व राष्ट्रहिताची जबाबदारी न ओळखणें होय असें त्यास वाटतें. असो. लोकनायकांच्या वयास आतां ५१ वर्षें पूर्ण झालीं आहेत. " जीवेम शरदः शतम् " या वेदोक्तीस अनुसरून त्यांचें आयुष्य निम्मे होऊन गेलें आहे ह्मणायचें. तथापि त्यांचा प्रतापदिवाकर आतां कोठें उदयाचलावर आरूढ झालेला आहे! तो यापुढें आपल्या दिव्य तेजानें तळपत राहो व ' याच

देहीं याच डोळां ' संपूर्ण स्वातंत्र्याचा सोहळा हिंदुस्थानास भोगण्याविषयीं समर्थ करणाऱ्या पराक्रमशाली स्वातंत्र्यवीरांत त्यांचें नांव अग्रसरत्वानें चमको, आणि यापुढील घोर जबाबदारी पार पाडण्यास त्यांना उदंड आयुष्य व अखंडित आरोग्य लाभो, अशी त्या जगन्नियन्त्यास मनोभावें प्रार्थना करून हें चरित्रकथन संपवितों.

ॐ तत्सत् ।



# लोकनायक बापूजी अणे यांचे वऱ्हाडांतील सहकार्यकर्ते.

## यवतमाळ जिल्हा.

**भीमराव हणमंत उर्फ अण्णासाहेब जतकरः**—हे एल्. एल्. बी. ची परीक्षा पास होऊन लोकनायकांच्या आधीं सुमारें एक वर्ष ह्मणजे १९०७ मध्यें वकीली करावयास आले. ऐन बहिष्कारत्रयीच्या युगांत हे लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्लीकरितां उमेदवार ह्मणून उभे राहिले व प्रचंड बहुमतानें निवडून आले. डिस्ट्रिक्ट ॲसोसिएशनला त्यांनीं आपलें तनमनधन वाहिलेलें असून यवतमाळांतील कोणतीहि चळवळ त्यांच्या सल्याशिवाय होत नाहीं. ते यवतमाळ म्युनिसि. चे सन १९१९ ते १९२५ पर्यंत अध्यक्ष होते, तसेंच ते यवतमाळ सेंट्रल बॅंकेचे १९२६ पासून अध्यक्ष आहेत. ते लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्लीचे सभासद असतांना मद्यपान निषेधाची चळवळ दडपण्याकरितां सरकार येथें १४४ कलम लावून सभाबंदी करणार अशी वार्ता पसरली तेव्हां त्यांनीं ' हें कलम लावल्यास मी पाहिल्यानें कायदेभंग करीन ! ' असा यांनीं सरकारास एका जाहीर व्याख्यानांत इशारा दिला होता ! १९३० च्या कायदेभंगाच्या मोहिमेकरितां निधि जमविण्यांत तेच अग्रेसर होते व ते पांचवे डिक्टेटर झाले होते. स्वभावानें अत्यंत मनमिळाऊ व हुषार आणि उत्तमोत्तम वकील असा त्यांचा लौकिक आहे.

**नरहर शिवराम उर्फ तपस्वी डॉ० बाबासाहेब परांजपेः**— यांचें वय ६० च्या जवळपास आहे. देश किंवा राष्ट्र हा शब्द कोणी उच्चारीत नसे त्या वेळेपासून ते अंगच्या तळमळीनें देशोद्धाराची खटपट करीत आहेत. हे हैद्राबाद मेडिकल कॉलेजांत पास होऊन कांहीं

दिवस तेथेंच हौस सर्जन होते व स्कॉलरशिपमुळें घालण्यांत आलेली सात वर्षांची सरकारी नोकरीची मुदत संपतांच त्यांनीं डॉक्टरकीची नोकरी सोडली व यवतमाळास खाजगी धंदा सुरू केला. पण १९०५ सालींच निर्वाहाकरिता हात पाय हालवायचा नाहीं असा निर्धार करून त्यांनीं स्वतःला देशार्पण करून घेतलें आहे! यांजवर १९०८ व १९१७ सालीं १०८ कलमाखालीं जातमुचलका व जामीन घेण्यांत येऊन त्यांच्या भाषणांस बंदी करण्यांत आली, व १९२१ सालीं त्यास १२४ अ कलमाखालीं २ वर्षांची शिक्षा देण्यांत आली. यवतमाळ जिल्ह्यांतील राजकीय आंदोलनाचे ते जनक आहेत! विदर्भविगार निवारक मंडळ, निरक्षरतानिरास योजना इत्यादि बाबतींत त्यांनीं झटून परिश्रम केले; आणि गेल्या ५-६ वर्षांपासून त्यांनीं ग्रामपंचायतींची स्थापना हा आपल्या मननाचा व चळवळीचा एकच एक विषय केला आहे. हातीं घेतलेलें काम चिकाटीनें व अहोरात्र चिंता वाहून अखेरपर्यंत पार पाडणारे निग्रही कार्यकर्ते त्यांच्या तोडीचे महाराष्ट्रांतच काय, हिंदुस्थानांतहि विरळा! १९०५ पासून ते 'अनिकेतन' वृत्तीनें राहात असून आपल्या कल्पना व्यवहारांत आणण्याकरितां पंजाब, मद्रास, बंगाल इत्यादि प्रांतांत महिनोगणती व वर्षोगणती राहिले आहेत. डॉक्टरी विद्येंत ते अत्यंत कुशल असून आयुर्वेदाचा त्यांना फार अभिमान आहे.

**शामराव प्रल्हाद उर्फ दादासाहेब देशपांडेः**—(जन्म सन १८८२ मृत्यु १९२२.) महागांवकर देशपांडे यांच्या कुळांत बाणेदार देशहितचिंतक आबासाहेब देशपांडे, पोलिसइन्स्पेक्टर यांच्या पोटीं यांचा जन्म झाला. मॅट्रिक्युलेशनपर्यंत यांचें शिक्षण झालें, पण देशहिताच्या तळमळीपायीं त्यांना शिक्षणसंपन्न होऊन वकीली किंवा ऑफिसरी करणें त्यांना रुचेना. हे अत्यंत हुषार, मधुर भाषण करणारे, व कुस्तीमध्यें अजिंक्य ठरलेलें मल्ल होते. शाळा सोडण्याच्या पूर्वीपासून देखील त्यांचें देशसेवेचे उद्योग सुरू होते व म्हणून त्यांच्या स्फूर्तीनें देशसेवेच्या मार्गांत पडलेले अनेक स्नेही वऱ्हाडभर

दा. ४६०३

पसरले होते. यवतमाळ डिस्ट्रिक्ट ॲसोसिएशन स्थापन करणारांत ते प्रमुख होते. प्रपंचाचा कोणताच उद्योग मागें लावून न घेतां ते स्वखर्चानें केवळ देशभक्तीचा उपदेश करीत व गांवोगांवच्या कार्यकर्त्यांची संघटना करीत वऱ्हाडभर फिरत असत. त्यांचीं भाषणें सरकारी अमलदार अत्यंत आतुरतेनें ऐकत, व खेड्यांतील लोकांचीं अंतःकरणें वश करण्याचे कामांत त्याचप्रमाणें खाजगी बैठकींवर लोकांची समजूत घालण्याचे कामांत ते इतके कुशल होते कीं त्यांची जागा अजून देखील भरून निघालेली नाहीं! लोकनायक त्यांना "बैठा प्रॉपेगँडिस्ट" असें ह्मणत. यवतमाळ जिल्हा तयार करण्यांत डॉ. परांजपे यांच्या बरोबरीचे परिश्रम यांनीं केले.

**गणपत कृष्णराव दवंडे:**— हे अमरावती जिल्ह्यांत पोलिस कॉन्स्टेबलच्या जागेपासून आपल्या हुषारीनें सब इन्स्पेक्टर झाले होते. पण कचेरी सोडून सारा वेळ वामनराव जोशी, शामराव देशपांडे, दादासाहेब खापर्डे यांच्या सहवासांत घालवून प्रत्येक सार्वजनिक कार्यांत धडाडीनें पुढाकार घेत, ह्मणून त्यांना नोकरी सोडावी लागली. त्यानंतर १९०७ सालीं त्यांनीं यवतमाळास स्वदेशी कापडाचें दुकान घातलें होतें. यांचा मर्दानी बाणा, पराकाष्ठेचा स्वाभिमान व सडेतोड वृत्ति अवर्णनीय होती. ते चाळिशीच्या आंतच १९१९ सालीं कालवश झाले.

**पांडुरंग गोविंद बल्लाळ:**— (जन्म १८८३ मृत्यु १९२८.) हे दारव्हा प्रगण्याचे देशमुख घराण्यांतील असून दारव्ह्यास राहणारे, प्रस्तुत लेखकाचे चुलत बंधु. यांचें इंग्रजी सहावीपर्यंत शिक्षण झालें व कांहीं दिवस इंग्रजी शिक्षकाचें काम केलें. शामराव दादा देशपांडे व प्रस्तुत लेखक यांच्या सहवासाचा परिणाम ह्मणून त्यांनीं नोकरी सोडली, व ते कापसाच्या धंद्यास लागले. सुशिक्षित महाराष्ट्रीयांनीं धंद्यांत शिरून आपली बुद्धिमत्ता त्यांत खर्च करावी व लक्ष्मी वश करण्यास आपणांतहि शक्ति आहे हें सिद्ध करावें असा त्यांचा तरुणांस उपदेश असे. आपल्या कर्तबगारीनें ते दारव्ह्याच्या सामा-

यिक जिनिंग फॅक्टरींचे मालक व मॅनेजरहि बनले होते. त्यांनीं प्रत्येक राष्ट्रीय चळवळीचा मनःपूर्वक पुरस्कार केला व तालुक्यांतील संपन्न लोकांवर आपल्या बुद्धिकौशल्याची छाप पाडली होती. त्यांनीं आपल्या कर्तबगारीचा व्याप वाढवून यवतमाळ डिस्ट्रिक्ट कौंसिलचें उपाध्यक्षपदहि प्रचंड बहुमतानें काबीज केलें होतें. ते लोकनायकांचे एक विश्वासू सल्लागार बनले होते.

**दत्तात्रय कृष्ण उर्फ दादासाहेब काणे**:—वडिलांच्या अकाल निधनानें यांना वुइल्सन कॉलेजांत शिकत असतां इंटरमीजिएट वर्गांतून शाळा सोडून यावें लागलें. हे अत्यंत चिकाटीचे कार्यकर्ते आहेत. बाबासाहेब परांजपे यांनीं यवतमाळास ज्या चळवळी केल्या त्यांत दादासाहेबांचें सहाय्य व धडाडी यांना फार उच्च स्थान द्यावें लागेल. बहिष्कारत्रयीच्या पहिल्या धुमधडाक्यांत ते सी. पी. कौंसिलांत निवडून आले. महारबलोत्याच्या चळवळींत त्यांनीं अग्रेसरत्वानें भाग घेतला होता. त्यांच्या अवधींत सी. पी. कौंसिलमध्यें जी महत्वाची कामगिरी झाली तिचें श्रेय मुख्यतः यांच्या चिकाटीकडेच आहे. दादासाहेब एक वजनदार इजारदार असून त्यांचें वजन जिल्हाभर आहे. स्थानिक हिंदुमहासभेचे ते आधारस्तंभ आहेत.

**गंगाधर नागोराव उर्फ तात्यासाहेब हूड**:—हे बी. एल्. होऊन १९१० सालीं वकिली करावयास आले. यांची कल्पकता डिस्ट्रिक्ट असोसिएशनच्या फार उपयोगी पडली. परगणा सभा स्थापन करण्याची कल्पना यांची आहे.

**गणपत सीताराम माळवी**:—यांचें मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालें असून शिवरामजी सोनार यांनीं आपल्या स्वतःच्या मालकीच्या विठ्ठलमंदिराचा ट्रस्ट करून आपल्या पश्चात् त्यांस ट्रस्टी नेमले आहे. वयाच्या १७ व्या वर्षापासून त्यांजवर इस्टेटीचा भार पडला आहे, आणि राष्ट्रीय दृष्टी समोर ठेवून ते प्रत्येक चळवळीस पराकाष्ठेचें सहाय्य करीत आहेत. त्यांनीं

१९२५ सालीं शिवराम थिएटर बांधलें व तें येथील सार्वजनिक चळवळींचें एक प्रकारचें हक्काचें स्थान बनलें आहे. यांचा मधुर व भिडस्त स्वभाव आणि मनाचें औदार्य यास तोड सांपडणें कठिण! यांना १९३० च्या कायदेभंगांत ११७ कलमाखालीं नऊ महिन्यांची शिक्षा झाली होती. अपीलाच्या अवधींत ते जामिनावर मोकळे असतां सी. पी. कौंसिलांत प्रचंड बहुमतानें निवडून आले असून हल्लीं एम्. एल्. सी. आहेत. यवतमाळ डिस्ट्रिक्ट कौंसिलच्या कारभारांत त्यांचें स्थान जवळपास अध्यक्षाचें असल्यामुळें जिल्ह्यांतील सर्व प्रकारच्या लोकांवर त्यांचें वजन आहे.

**रामचंद्र बळवंत जोशीः**—हे मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास होऊन मोहपा येथें शिक्षकाचें काम करीत असतां बाबासाहेब परांजपे यांनीं त्यांस डि. असोसिएशनचें काम करण्याकरितां १९१६ सालीं यवतमाळास आणलें. सत्यनिष्ठा, निग्रही स्वभाव, परिमित भाषण व अंगीकृत कार्य चिकाटीनें व प्रसिद्धीची अपेक्षा न करतां पार पाडण्याची संवय यामुळें डि. असोसि. च्या कामांत ते एक अत्यंत महत्वाचें अंग होऊन बसले आहेत. त्यांच्या भरवशावर काम टाकून लोकनायक निर्धास्त राहत असतात. कायदेभंगांत यांनीं पांच आठवड्यांची शिक्षा भोगिली आहे. यांना यवतमाळ जिल्ह्यांतील एकूण एक गांवची व तेथील कार्यकर्त्यांची खडानूखडा माहिती आहे.

**डॉ. भास्कर महादेव टेंबे** एल्. आर्. सी. पी. अँड एस्; एल्. एफ्. पी. एस्.:—हे इंदूर येथें स्टेट सर्जन होते, पण संस्थानी वातावरण न मानवल्यामुळें त्यांना तें शहर सोडावें लागलें. हे अत्यंत नामांकित डॉक्टर व कुशल सर्जन आहेत. डॉ. गोपाळराव देशमुख, डॉ. दिनकर धोंडो साठे, डॉ. लक्ष्मण वासुदेव परांजपे इत्यादिकांचे हे सहाध्यायी व लहानपणचे सोबती आहेत. हे १९२२ सालीं येथें रहावयास आले. त्यांची सत्यनिष्ठा, धर्मप्रेम व देशप्रीति अत्यंत प्रखर असून स्वार्थीपणा, कपट, दिखाऊपणा, नीतिभ्रष्टता यांचा यांना पराकाष्टेचा तिटकारा आहे. कॉलेजांत

विद्यार्थी होते तेव्हांपासून यांना लेखनप्रेम आहे व इंदूर शास्त्रीय ग्रंथमालेंत त्यांनीं 'मातृपद,' 'शिशुसंवर्धन,' 'विद्यार्थी व त्यांचें आरोग्य,' 'चाळिशी उलटल्यानंतर' इत्यादि ग्रंथ अत्यंत सुबोध भाषेंत लिहून प्रसिद्ध केले आहेत. त्यांचा लेखनव्यासंग चालूच असून बापूजी वाङ्मय-मंडळ स्थापन करण्याची कल्पना, व लोकनायकांच्या लेखांचें व भाषणांचें पुस्तक मुद्रित करून प्रकाशित करण्याचा उद्योग याचें मुख्य श्रेय त्यांचेंच आहे. यवतमाळचा कायदेभंग सतत चार साडेचार महिने शिस्तशीरपणें राहिला याचेंहि श्रेय मुख्यतः त्यांनीं घालून दिलेल्या रेखीव टापटिपीकडेच आहे. त्यांना कायदेभंग केल्याबद्दल नऊ महिन्यांची शिक्षा झाली होती.

**त्र्यंबक सदाशिव उर्फ बाबासाहेब बापटः**—हे एल्. एल्. बी. होऊन १९२० सालीं वकिली करावयास लागले. यांचें हायस्कूल शिक्षण यवतमाळच्या 'विद्यागृह' नांवाच्या राष्ट्रीय शाळेंत झालें. त्यांच्या अंगची तेजस्विता शिक्षकांच्या सहवासानें ज्यास्तच वृद्धिंगत झाली, आणि वकिलींत शिरल्यापासून त्यांनीं आपल्या धडाडीनें कार्यकर्त्यांचें चित्त आकर्षित करून घेतलें. प्रस्तुत लेखकास १९२८ सालीं परिस्थितीच्या दाबामुळें लोकमताचें संपादकत्व सोडावें लागलें तेव्हां बाबासाहेबांनीं स्वयंस्फूर्तीनें पुढें येऊन स्वार्थत्यागपूर्वक संपादकीय जबाबदारीची धुरा स्वीकारिली. यवतमाळांतील युवकांचे ते सर्वप्रिय पुढारी आहेत. कायदेभंगाचे वेळीं यांना ११ महिन्यांची शिक्षा झाली होती. ते आजहि "लोकमता" चे संपादक आहेत.

**लक्ष्मण काशीनाथ उर्फ नानासाहेब ओकः**—हे एल्. एल्. बी. होऊन १९११ सालपासून वकिली करीत आहेत. यांचा निग्रही स्वभाव पाहिला ह्मणजे पुण्याच्या पैसाफंड रानड्यांचें स्मरण झाल्याशिवाय राहत नाहीं स्वदेशी-बहिष्कार, मद्यपाननिषेध, विगार, होमरूल लीग इत्यादि चळवळींत त्यांनीं आपल्या निग्रही स्वभावास अनुसरून काम केलें. कायदेभंगाचे मोहिमेंत ते डॉ. टेंबे यांच्यामागून तिसरे डिक्टेटर झाले होते व त्यांना नऊ महिन्यांची शिक्षा झाली होती.

**अमृत रंगराव साकळे:**—हे उमरखेडचे देशमुख घराण्यांतले आहेत. एल्. एल्. बी. होऊन ते १९१९ सालीं वकिली करावयास येथें आले. कुशाग्र बुद्धि, खोल विचार करण्याची सवय, परिमित भाषण, धिमा, स्वभाव व भाषाप्रभुत्व यांच्या योगानें ते सर्वांच्या आदरास पात्र झालें आहेत. त्यांच्या अभ्यासशीलपणामुळेंच त्यांना १९२१ सालापासून डिस्ट्रिक्ट ॲसोसिएशनची सेक्रटरीशिप मिळालेली आहे. त्यांना मॅट्रिक परीक्षेंत सिंक्लेअर प्राइझ् ( संस्कृतचें ) मिळालें होतें. कायदेभंगात त्यांना ९ महिन्यांची शिक्षा झाली होती.

**गोपाळ नागोजा कोंठकर:**—मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाल्यावर यांनीं वकिलाच्या कारकुनाची नोकरी संभाळून खाजगी रीतीनें वकिलीचा अभ्यास केला व ते १९०५ सालीं ही परीक्षा पास झाले. बिगारीच्या चळवळीच्या वेळीं यांनीं अतिशय झटून कार्य केलें, व त्यांच्या देशसेवेचा मोबदला ह्मणून पृथ्वीगीर हरीगीर यांनीं त्यांस अकोला येथील वऱ्हाड प्रांतिक परिषदेच्या वेळीं एक सुवर्णपदक जाहीर रीतीनें दिलें होतें. बिगारीचे मुकदमे मोफत चालविण्याबद्दल त्यांनीं जाहीर आश्वासन दिलें व विदर्भ-बिगार-निवारक-मंडळाचे सर्व कामाचा भार यांनीं एकट्यांनींच उचलला होता. यांचेवर १०८ कलमाखालीं मुकदमा होऊन त्यांची वकिलीची सनद एक वर्षपर्यंत सस्पेंड करण्यांत आली होती. हे माळी ज्ञातींतील या प्रांतांतील पहिले व एकटेच वकील असल्यामुळें त्या ज्ञातीच्या अनेक परिषदांच्या अध्यक्षस्थानीं त्यांना काम करावें लागलें व त्यांचा पुणें-नासक ठिकाणीं त्या ज्ञातीकडून जाहीर सन्मान होऊन "समाज भूषण" ही पदवी मिळाली. अलीकडे हे 'ब्राह्मणतर' पंथांत शिरले, पण हाडाचे पूर्ण राष्ट्रीय असल्यामुळें त्या पंथाशीं एकजीव होऊं शकत नाहींत. त्यांचें भाषण श्रवणीय असतें. यांनीं कायदेभंगाच्या चळवळींत व्याख्यानांचा झोड उठविली होती. त्यांचें वय साठाच्या आंतबाहेर आहे.

**पृथ्वीगीर हरीगीर:**—यांनीं १९०२ सालीं 'हरिकिशोर' पत्र काढलें. केवळ स्वदेशी कागदावर छापलें जाणारें हें महाराष्ट्रांतील पहिलेंच पत्र होय. जाहीर सभांतून त्यांनीं कधीं भाषण केलें नाहीं, पण तें बहुश्रुत व फार समंजस असत. त्यांना एका अप्रकाशित कवि मित्राच्या कवितेपायीं राजद्रोहाच्या कलमाखालीं दोन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झाली होती. त्यांनीं 'गोसावी आणि त्यांचा संप्रदाय' या ग्रंथाकरितां मनस्वी माहिती जुळवून ती स्वतःच्याच छापखान्यांत छापून ग्रंथरूपानें दोन भागांत प्रसिद्ध केली आहे. हे आपल्या वयाच्या ५६ व्या वर्षी मार्च १९३१ मध्यें एक महिना आजारी होऊन निवर्तले.

**दत्तात्रय विष्णु आपटे:**—हे बी. ए. झाल्यानंतर सरकारी नोकरी करायची नाहीं असें ठरवून रामचंद्र गणेश मुंडले यांच्या मुलांस इंग्रजी शिकविण्याकरितां येथें १९०५ सालीं आले. त्यांच्याच भरवशावर बाबासाहेब परांजपे यांनीं १९०६ सालीं विद्यागृह स्थापिलें, व त्याचा सर्व अंतर्गत कारभार त्यांजवर सोंपविला. डिटेक्टिव्ह खात्याचे वरिष्ठ क्लेव्हलंड साहेबांनीं १९०९ सालीं दडपशाही करून विद्यागृह बंद केलें तेव्हां दत्तोपंत पुण्यास जाऊन राहिले. बरेच दिवस चित्रमय जगतांत संपादकाचें काम केल्यानंतर त्यांना आनंदाश्रमांत व्यवस्थापकाचें काम मिळालें. त्यांनीं इतिहास संशोधन,हा आपला मुख्य व्यवसाय केला असून 'श्रीरंगपट्टनचा वेढा' वगैरे पुस्तकें लिहिलीं आहेत. इतिहाससंशोधन मंडळाचे ते पंचप्राणापैकीं एक बनले आहेत.

**विष्णु गंगाधर केतकर:**—हे विद्यागृहांत शिक्षक होते.पृथ्वीगीर हरीगीर यांच्यानंतर हरिकिशोरचे दुसरे संपादक नरहर विठ्ठल भावे यांनाहि राजद्रोहापायीं दीड वर्षांची शिक्षा झाली त्यानंतर विष्णुपंत हे त्या पत्राच संपादक बनले होते.

यवतमाळ सोडल्यानंतर त्यांनीं पुण्यास जाऊन अनाथ विद्यार्थी गृह काढलें, व ही संस्था ह्मणजे त्यांच्या कर्तृत्वाचें चिरस्थायीं स्मारकच होय.

**नरहर विठ्ठल भावे:**—कॉलेजचें शिक्षण पुरें करण्यास सवड नाहीं ह्मणून उद्योगधंदा शोधावयास ते यवतमाळास आले. वृत्तीनें पक्के स्वातंत्र्य-प्रिय असल्यामुळें पृथ्वीगीर हरीगीर हे कैदेंत जातांच यांनीं स्वयंस्फूर्तीनें हरिकिशोर पत्राचें संपादकत्व अंगावर घेतलें. तेव्हां यांचें वय जमतेम २० वर्षांचें असावें. त्यांचे लेख फार तेजस्वी, मुद्देसूद व बाणेदारपणाचे असत. त्यांनाहि तीन वर्षांची शिक्षा झाली. ती भोगून परत आल्यावर त्यांनीं मुंबईस धंदा सुरू केला. म. गांधी यांच्या यंग इंडिया व नवजीवन पत्राचे ते मुंबईचे सोल एजन्ट होते.

**हरी गणेश फाटक:**—हेहि विद्यागृहांत एक अत्यंत उत्साही व कर्तव्यनिष्ठ शिक्षक होते. विद्यार्थी ह्मणजे त्यांना जीव कीं प्राण, ह्मणून त्या वर्गांत ते फार प्रिय असत. त्यांची कल्पकता नेहमीं नवीन नवीन कामें शोधून काढीत असायची. येथून ते पुण्यास जाऊन राहिले आहेत.

**दिवाकर मोरेश्वर उर्फ नानासाहेब दामले:**—एल्. एल्. बी. होउन ते १९१० सालीं येथें वकिली करावयास आले. हे विचारांनीं पक्के राष्ट्रीय व कॉंग्रेसचे पूर्ण अभिमानी आहेत. यांनीं कायदेभंगाचे प्रसंगीं फार झटून काम केलें. हल्लीं डिस्ट्रिक्ट कॉंग्रेस कमिटीचे तेच अध्यक्ष आहेत.

**माधव पैकाजी कोल्हे:**— हे झाडगांवचे राहणारे असून मोठे जमीनदार, इजारदार व सावकार आहेत. एल्. एल्. बी. ची परीक्षा पास झाल्यानंतर यांनीं कांहीं दिवस वकिली केली, पण वडील निवर्तल्यामुळें त्यांना घर संभाळण्याकरितां गांवीं जावें लागलें. १९२३ सालच्या कौंसिल निवडणुकींत ते पूर्व यवतमाळ रूरल कॉंस्टिटयूअन्सीतर्फे निवडून आले व तेव्हांपासून आज तागायत त्यांचें हें स्थान टिकून राहिलें आहे. १९२७ च्या निवडणुकींत ते यवतमाळ डिस्ट्रिक्ट कौंसिलचें अध्यक्ष निवडून आले होते. ते इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीचे अनेक वर्षांपासून सभासद आहेत. लक्ष्मणराव ओकांच्या पश्चात् ते युद्धमंडळाचे चौथे डिक्टेटर बनले होते,

पण कौंसिल निवडणुकीकरितां उभे रहावयाचे म्हणून त्यांनीं डिक्टेटर-शिप्चा राजीनामा दिला.

## पुसद तालुका.

**शंकर सखाराम सरनाईकः**—हे १९०६ च्या चळवळीपासून निस्सीम निष्ठेनें देशसेवा करीत आहेत. वाशिमास राहत असतांना त्यांजवर १०८ कलमाखालीं मुकदमा करण्यांत आला होता. हल्लीं बरेंच वर्षांपासून ते पुसदला राहून एक छोटेंसे स्वदेशी मालाचें दुकान चालवीत आहेत. निस्सीम स्वार्थत्याग, निराभिमान व शुद्ध चारित्र्य यायोगें पुसद्च्या जनतेवर त्यांचें विलक्षण वजन बसलेलें आहे. शंकररावांच्याच भरवशावर लोकनायकांनीं गुदस्तां पुसदला जंगलाचा कायदेभंग सुरू केला. शंकररावांची ही योग्यता ओळखून निर्घृण नोकरशाहीनें त्यांस कायदेभंगावद्दल एक वर्षाची शिक्षा दिली होती.

**गंगाधर बळवंत पांडेः**—हे हिवरीचे पटवारी घराण्यांतील उत्साही तरुण आहेत. मॅट्रिक पास झाल्यावर त्यांनीं अमळनेरास कांहीं दिवस उच्च शिक्षण घेतलें पण प्रकृतीच्या अस्वास्थामुळें त्यांना शिक्षणक्रम सोडावा लागला. वय लहान, पण त्या मानानें विचार फार प्रौढ, म्हणून ते शंकरराव सरनाईक यांचे ,जीवलग सल्लागार व सहकार्यकर्ते बनले. आपल्या धडाडीच्या कामामुळें त्यांनीं लोकनायक बापूजी अणे यांचें प्रेम संपादन केलें. कायदेभंगाचे वेळीं त्यांची लोकप्रियता उत्कृष्टपणें निदर्शनास आली. त्यांना कायदेभंगापायीं सहा महिन्यांची शिक्षा झाली होती.

**बळिराम नागोराव एकबोटेः**—हे उमरखेडचे राहणारे व गरीबींत काळ कंठणारे अत्यंत उज्वल देशभक्त व जोरदार कार्यकर्ते आहेत. यांचें वक्तृत्व काव्यमय, प्रभावशाली व परिणामकारक असतें. कायदेभंग सुरू करण्याच्या आंतच नोकरशाहीनें त्यांजवर १०८ कलमाखालीं मुकदमा करून त्यांस एक वर्षाची शिक्षा दिली होती.

## वणी तालुका.

**हरी गोविंद दामलेः**—घरच्या कारभाराकरितां तीर्थरूपांच्या आज्ञेवरून त्यांस इंटरमीजिएट वर्गांतूनच कॉलेज सोडून यावें लागलें होतें. ते एक बडे जमीनदार व एका जिनिंग फॅक्टरीचे मालक आहेत. विचारांनीं पूर्ण राष्ट्रीय, मनाचे अतिशय उदार व प्रत्येक चळवळीस मनःपूर्वक सहाय्य करणारे ते आहेत.

**सीताराम लक्ष्मण भेदीः**—हे वणी येथील बडे जमीनदार व पिढीजात सावकार असून आचारांत व राहणींत निस्सीम राष्ट्रीय आहेत. हे साधुवर्य आपाजी महाराज यांचे एकनिष्ठ भक्त व लोकनायक बापूजी अणे यांचे एकनिष्ठ अनुयायी आहेत. दामले-भेदी ही जोडी अभेद्य आहे !

**रामचंद्र गंगाधर भागवतः**—हे लोकनायक बापूजी अणे यांचे बालपणापासूनचे स्नेही. अत्यंत कार्यनिष्ठ, वेदांती व राष्ट्रीय बाण्याचे आहेत. वणीच्या कोणत्याहि चळवळींत रामभाऊ उर्फ 'गुरुजी' यांचें सहाय्य अपरिहार्य असतें. यांनीं कायदेभंगांत ६ महिन्यांची शिक्षा भोगली आहे.

**यादव श्रीहरि अणेः**—हे अमरावतीच्या शिवाजी विद्यालयांतून मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर कलकत्त्याच्या नॅशनल मेडिकल कॉलेजांत जाऊन एल्. सी. पी. एस्. ची परीक्षा दिली. त्यानंतर ते वणीस डॉक्टरकीचा धंदा करीत आहेत. वणीच्या चळवळींचे ते पंचप्राण आहेत. कायदेभंगांत त्यांना ९ महिन्यांची शिक्षा झाली होती.

**भगवंत रामचंद्र सस्तीकरः**—डॉ. यादवराव अणे यांचे एकनिष्ठ व विश्वासू सहकार्यकर्ते. यांना कायदेभंगांत ९ महिन्यांची शिक्षा झाली होती. ते वणी तालुका असोसिएशनच्या स्थापनेपासून तिचे सेक्रेटरी आहेत.

**वीर वामनराव जोशी**—वामन गोपाळ जोशी यांचें अमरावतीस बुधवाऱ्यामध्यें पुस्तक विक्रीचें एक दुकन होतें. मॅट्रिकची परीक्षा

१८९९ मध्यें पास झाल्यानंतर यांना शिक्षणक्रम सोडून इंग्रजी शिक्षकाचें काम करावें लागलें. बालपणापासून आखाडे काढणें व देशसेवा करणें या शिवाय दुसरा विचार त्यांना माहीत नाहीं. विद्यार्थीदशेंत त्यांनीं कित्येक नाटकें लिहिलीं. अमरावतीस हौशी मंडळींचीं दर वर्षी नाटकें होत त्यांतील नट व व्यवस्थापक हेच असत. वक्तृत्व ही कला यांच्या घराण्यांत उपजतच आहे. अमरावतीस वक्तृत्वोत्तेजक सभा असे, तिच्या दर वर्षींच्या समारंभांतील अगदीं पहिलें बक्षिस वामनराव किंवा त्यांचें पांच सहा बंधु यांचें ठेवलेलें असे. नाट्य, वक्तृत्व व देशप्रेम या गुणामुळें त्यांजवर दादासाहेब खापर्डे यांचें अत्यंत प्रेम बसलें होतें. प्रस्तुत लेखकानें मुख्यतः यांच्याच मदतीनें शिवाजी विद्यालय स्थापन केलें. १९०६ च्या राष्ट्रीय आंदोलनापासून वामनराव हे तेथील सार्वजनिक जीवनक्रमाचे अंतरात्मा बनून गेले आहेत. अत्यंत विपन्नावस्था व पाठीवरचे पांच सहा बंधु व पोटचे मुलगे लागोपाठ गेलेले—असें असतांहि यांनीं आपल्या निग्रही व तत्वज्ञानी वृत्तीच्या जोरावर देशसेवाव्रत अखंडित चालू ठेविलें आहे ! ' राक्षसी महत्वाकांक्षा ' व ' रणदुंदुभि ' या नाटकांनीं त्यांचें नांव महाराष्ट्र वाङ्मयांत चीरस्थायी झालें आहे. हे टिळकांचे कट्टे अनुयायी असून त्यांच्या निधनानंतर म. गांधी यांच्या राजकारणाचे तितकेच प्रखर अभिमानी बनलेले आहेत. यांचें हस्ताक्षर अत्यंत वळणदार असून गायन, वादन, काव्य, नाट्य व चित्रकला या ललितकलांचा त्यांस फार नाद आहे. १९२१ सालीं अमरावतीनजीक वलगांव येथें झालेल्या एका प्रचंड सभेंत त्यांना " वीर " ही पदवी देण्यांत आली. त्यांनीं राजद्रोहाच्या कलमाखालीं १९२१ सालीं दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा भोगली, व कायदेभंगाच्या आधींच नोकरशाहीनें त्यांस दोन वर्षांची शिक्षा ठोठावून शिवणीच्या तुरुंगांत नेऊन ठेविलें होतें. ते स्वातंत्र्याचे कट्टे भोक्ते असून कॉंग्रेसच्या मतांचा पुरस्कार करण्याकरितां त्यांनीं एक छापखाना विकत

घेऊन त्यांत " स्वतंत्र हिंदुस्थान " नामक साप्ताहिक सुरू केलें होतें. तें कायदेभंगाच्या मोहिमेपूर्वी बंद करण्यांत आलें व पुनरपि सुरू करण्यांत आलें नाहीं.

**नारायण रामलिंग बामणगांवकर**:—हे लिंगायत ज्ञातींतील, इंग्रजी सहाव्या यत्तेपर्यंत शिक्षण घेतलेले तरुण बालदशेपासून वाङ्मयप्रेमी व महत्वाकांक्षी देशसेवक आहेत. यांनीं तात्यासाहेब मुधोळकरांच्या हाताखालीं कारकुनी केली, पण अहोरात्र लोकसेवा करण्याचें वेड मनांत घोळत असल्यामुळें त्यांनीं नोकरी सोडली व 'तरुण भारत' नांवाचें पत्र भाड्याच्या छापखान्यांत सुरू केलें. जवळचे पैसे संपले व पत्र बंद पडलें. त्यांनींहि वामनरावाप्रमाणें कित्येक नाटकें लिहिलीं व फाडून टाकलीं. पैकीं धनुर्भंग व आत्मतेज हीं नाटकें रंगभूमीवर आलीं असून त्यांत त्यांची उज्वल प्रतिभा दृग्गोचर होते. हे सफाईदार वक्ते आहेत, व प्रतिपक्षाचें व्यंग काढून नेमका त्यावर प्रमाणयुक्त मारा करण्याचें त्यांचें कौशल नावाजण्यासारखें आहे. त्यांनीं १९२६ पासून उदय पत्राचें संपादकत्व स्वीकारिलें असून हल्लीं टिळक ट्रस्ट फंडाच्या मदतीनें त्यांनीं अरुण छापखाना व 'उदय' पत्र हीं आपल्या मालकीचीं केलीं आहेत. कायदेभंगाच्या वेळीं यांना १०८ कलमा अन्वयें एक वर्षाची शिक्षा देऊन शिवणीच्या व तेथून जबलपूरच्या तुरुंगांत नेऊन ठेवण्यांत आलें होतें. यापूर्वीहि त्यांना शस्त्र सत्याग्रहाचे वेळीं १९२३ सालीं अकस्मात् पकडण्यांत येऊन तीन महिन्यांची शिक्षा देण्यांत आली होती. ते मार्मिक व चटकदार लेखक आहेत.

**बाळकृष्ण गणेश उर्फ बाबासाहेब खापर्डे**:—हे डेक्कन कॉलेजांतून प्रिंसिपॉल सेल्बी यांच्या प्रशंसेस पात्र होऊन बी. ए. झाले व १९०७ पासून वकिली करूं लागले. यांचें इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व व त्या वाङ्मयाचा विशेषतः उच्च काव्यग्रंथांचा अभ्यास खोल व दांडगा आहे. सफाईदार व परिणामकारक वक्तृत्व यांच्या अंगीं उपजतच आहे. यांनीं थिऑस-

फीचें वाङ्मय फार वाचलें असून ते डॉ. बेझंट यांचे कट्टे अभिमानी होते. पण राष्ट्रीय वृत्ति पूर्णपणें अंगीं बाणली असल्यामुळें लो. टिळक व मिसेस् बेझंट यांच्या मार्गांत भेद पडू लागला तेव्हांपासून ते पूर्णपणें टिळक मतानुयायी बनले आहेत. टिळकांचे जीवलग स्नेही सरदार बाबा महाराज पंडित यांचे हे जांवई, या मुळेंहि टिळकांचें त्यांजवर फार प्रेम असे. १९२३ पासून हे सी. पी. कौन्सिलचे सभासद व राष्ट्रीय पक्षाचे प्रमुख चालक आहेत.

**वामन गोविंद मोहरीलः**—हे अमरावती तालुक्यांतील थूगांव या गांवचे पटवारी. एल् एल्. बी. होऊन ते १९११ पासून वकिली करूं लागले. हाडाचे देशभक्त, निस्सीम निष्ठेनें व जीवापाड कामें करणारे, पराकाष्ठेचे अभिमानरहित आणि स्वभावानें अत्यंत गोड, म्हणून लोकनायकांनीं त्यांना वऱ्हाड प्रांतिक कॉंग्रेस कमेटीचे सेक्रेटरी केले होते. ते प्रचंड मेहनत करून व आपल्या लोकप्रियतेच्या बळावर अमरावती तालुक्यातर्फे सी. पी. कौंसिलांत निवडून आले होते व तेथील कामाचाहि भर त्यांजवरच पडला होता. पण ते अकस्मातपणें थोड्या दिवसाच्या आजारानंतर १९२७ सालीं दिवंगत झाले. त्यांची आठवण प्रस्तुत पिढींतील कार्यकर्त्यांच्या मनांतून केव्हांहि बुजण्यासारखी नाहीं.

**सदाशिव कृष्ण उर्फ भाऊसाहेब दुराणी**—वीरवृत्तीपायीं निधन पावलेल्या पोलिस इन्स्पेक्टरचे हे बाणेदार चिरंजिव लोकनायकांचे बालस्नेही होते. १९०५ पासून ते अमरावतीस वकिली करूं लागले. हे अत्यंत हुषार, स्वभावानें तडफदार, नाट्यप्रेमी, गायनवादनप्रेमी आणि हाडाचे देशभक्त होते. वकिलीपेक्षां सार्वजनिक चळवळींतच यांचें चित्त असे. तेथील शिवाजी विद्यालय, गणपति उत्सव, महाराष्ट्र तालिमखाना, स्वदेशी मंडळ, मुष्टिफंड इत्यादि संस्थांचे ते आत्मा होते. त्यांचें घर म्हणजे देशभक्तांच्या अहोरात्र बैठकीचें स्थान झालें होतें. ते इंग्रजींत व मराठींत सफाईदार व सडेतोड भाषणें करीत, आणि इंग्रजी भाषेवरील त्यांचें प्रभुत्व वाखा-

णण्याजोगें होतें. ते दादासाहेब खापर्डे यांचे ' स्वयंकृत ' सेक्रेटरी होते; हाडापेरानें मजबूत व पीळदार असून त्यांची तब्यत खंगत गेली आणि १९२८ सालीं त्यांचें अकालीं निधन झालें.

**जैराम केशव उर्फ भाऊसाहेब असनारेः**—हे अमरावतीचे मोठ्या प्रांतीचे व नामांकित वकील होऊन गेले. वाङ्मयव्यासंग व चिकित्सक संशोधन यांच्या योगें ते प्रसिद्धीस आले होते. त्यांना गायनवादनाचें पराकाष्ठेचें प्रेम होतें, पण नागपूर कॉंग्रेसपासून त्यांनीं अमरावतीमधील राजकीय चळवळींना आपणांस सर्वस्वी वाहून घेतलें होतें. लोकनायकांपेक्षां ते दहाबारा वर्षांनीं वडील, व त्यांचा वाङ्मयांतील थोर अधिकार, राष्ट्रप्रेम आणि कमालीचा मधुर, दिलदार व उदार स्वभाव यांमुळें बापूजी अणे यांस त्यांजविषयीं फार आदर वाटे.

**गणेश श्रीकृष्ण उर्फ दादासाहेब खापर्डे**—हे लोकमान्य टिळकांचे कट्टे अनुयायी व अमरावतीच्या राष्ट्रीय आन्दोलनाचे पुरस्कर्ते. मराठी, हिंदी, गुजराथी, संस्कृत, इंग्रजी व बंगाली या भाषांमध्यें त्यांच्या इतकें मनमोहक वक्तृत्व करणारा दुसरा वक्ता महाराष्ट्रांत अजून निपजला नाहीं! त्यांचा विद्याव्यासंग अत्यंत अगाध आहे. ते मूर्तिमंत सौजन्य व उदारपणा आहेत! व त्यांच्या उदारपणामुळेंच त्यांना ' वऱ्हाडचे ' नबाब ह्मणतात. ते इंपिरियल लेजिस्लेटिव्ह कौंसिलचे समासद होते. व मॉट-फर्ड सुधारणा सुरू झाल्यापासून ते वऱ्हाडतर्फे कौंसिल ऑफ स्टेटचे सभासद आहेत. असहकाराच्या नवीन कल्पनांशीं ते कधीं समरस होऊं शकले नाहींत ह्मणून त्यांनीं गेल्या दहा वर्षांपासून सार्वजनिक कार्यांतून आपलें अंग काढून घेतलें आहे. ते आकोला येथें झालेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांचें वय ८० च्या जवळ आहे.

**हरिहर वामन देशपांडेः**—हे अमरावती तालुक्यांतील राहणारे व आष्टी ( आमनेर ) चे देशपांडे, पुण्याच्या टिळक राष्ट्रीय विद्यालयांतून ते

वाङ्मयविशारद होऊन बाहेर पडले, त्यांना शरीर बलवर्धनाचा फार शौक असून हिंदुमहासभेचे प्रचारक या नात्यानें त्यांनीं पंजाब, संयुक्तप्रांत इत्यादि दूरच्या भागांत जाऊन संघटनेचें व आखाडे स्थापण्याचें काम केलें. ते सफाईदार वक्ते असून हल्लीं वऱ्हाड प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे सेक्रेटरी आहेत.

**डॉ. शिवाजीराव पटवर्धनः**—हे लो. टिळकांचे कट्टे अनुयायी असून, धंद्यास सुरुवात करतांच असहकारितेचें युग सुरू झालें तेव्हांपासून जीवापाड राष्ट्रीय आंदोलनाची धुरा वाहात आहेत. यांना शारीरिक शक्ति-संवर्धनाचा फार शौक आहे. अमरावतीची नमुनेदार संस्था हनुमान आखाडा हें त्यांच्या श्रमाचें फल आहे. या संस्थेचे प्रचारक हिंदुस्थानभर जाऊन आपल्या कार्याचा प्रचार करीत आहेत. एक विद्यार्थी जर्मनींत जाऊन व्यायामाचें शिक्षण घेत असून दुसरें एक विद्यार्थी जपानांत गेले आहेत. आहे. हे सफाईदार वक्ते असून चांगले अडीच तीन तास भाषण केल्याशिवाय त्यांचें समाधान होत नाहीं. त्यांचीं व्याख्यानें माहीतीनें भरलेलीं असतात. कायदेभंगाच्या पूर्वीं यांना १०८ कलमाअन्वयें १ वर्षाची शिक्षा देऊन डांबून ठेवण्यांत आलें होतें.

**संभाजी विनायक गोखलेः**—हे एल्. एल्. बी. होऊन १९०७ सालीं अमरावतीस वकिली करण्यास आले. यांची बुद्धि अत्यंत प्रखर असून राष्ट्रप्रेम रोमरोमीं भिनलेलें आहे. योजनांची व माणसांची जुळवाजुळव करणें यांत ते हातखंडा आहेत. त्यांनीं आपल्या कर्तृत्वाचा विस्तार अमरावती म्युनिसिपालिटी व त्या जिल्ह्यांतील कौंसिलच्या निवडणुकी यांच्या पलीकडे जाऊं दिला नाहीं.

**बॅ. रामराव माधवराव देशमुखः**—हे हाडाचे देशभक्त व गर्भ-श्रीमंतींत जन्मास आलेले असून एक प्रकारच्या 'फकिरी' वृत्तीनें राहणारे आनदी व स्वार्थत्यागी आहेत. ते बॅरिस्टरच्या परीक्षेस विलायतेंत गेलेले वऱ्हाडच्या पाटील–देशमुख घराण्यांतील पहिले तरुण होत. डोक्यांतील

स्वातंत्र्यप्रेमाच्या वेडानें त्यांना ह्मणण्यासारखी वकिली कधीं करूं दिलीच नाहीं. ते अत्यंत तरल बुद्धीचें व विशाल कल्पनांचे कार्यकर्ते आहेत. ते १९२० सालच्या निवडणुकींत सी. पी. कौंसिलांत निवडून आलेले सर्वांत तरुण गृहस्थ होत. ते सातारा कॉन्फरन्सचे अध्यक्ष झाले होते; व सी. पी. कौंसिलांतील मंत्रिपदावरहि आरूढ झाले होते.

**रावसाहेब उत्तमराव इटकीकरः**—हे दर्यापूर जवळील इटकीचे पाटील. तपस्वी बाबासाहेब परांजपे यांच्या निस्सीम राष्ट्रप्रेमानें मोहित होऊन ते सार्वजनिक कार्यांत शिरले, व जीवाकडे न पाहतां किंवा मानापमानाची पर्वा न करितां ग्रामसंघटना करण्याच्या कामास त्यांनीं स्वतःला वाहून घेतलें. त्यांची कर्तबगारी पाहून लोकनायकांनीं त्यांची यवतमाळ डिस्ट्रिक्ट असोसिएशनच्या विद्यमानें भरलेल्या पांढरकवडा येथील जिल्हा परिषदेच्या अध्यक्षस्थानावर योजना केली. वऱ्हाडांतील ग्रामपंचायतींच्या-संघटनाचें व संवर्धनाचें काम हा एकच त्यांनीं आपल्या चळवळीचा विषय केलेला आहे व त्यांची ही योग्यता जाणून सरकारनें त्यांस रावसाहेबीचा किताब दिला आहे. ते गेल्या सहा वर्षांपासून दर्यापूर–एलिचपूर तालुक्यांतर्फेचे सी. पी. कौंसिलांत सभासद आहेत. बरार–ऑल–पाटीज् कॉन्फरन्समध्यें त्यांनीं फार महत्वाची कामगिरी केली.

**यादव माधव काळेः**—हे मेहकरचे राहणारे, निर्धनावस्थेंत काळ कंठणारे विद्याधन भिक्षुक घराण्यांतले. कशीतरी मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाल्यावर ते यवतमाळ ए. व्ही. स्कूलमध्यें शिक्षक होऊन आले. त्यावेळीं येथील सार्वजनिक कार्यकर्त्यांचा दृढ ऋणानुबंध घडून आला. खाजगी वेळांत अभ्यास करून ते इंटर बी. ए. व एल् एल्. बी च्या परीक्षा पास झाले. अशा प्रकारें ते केवळ स्वपराक्रमानें विद्यागिरीच्या उत्तुंग शिखरावर चढले. विद्यासंपादनाचे काळांत त्यांचें इतिहाससंशोधन सुरूं होतें व त्याचेंच फळ ह्मणजे त्यांचा 'वऱ्हाडचा इतिहास' होय. बुलढाणा

जिल्ह्यांतील राजकीय आन्दोलनाचे ते पुरस्कर्ते असून १९२३ सालापासून सी. पी. कौंसिलांत दक्षिण बुलढाणा विभागाचे प्रतिनिधि ह्मणून बसत आहेत. ते १९२६ सालीं सर गंगाधरराव चिटणवीस यांच्या निधनानंतर सी. पी. कौंसिलचे अध्यक्षहि झाले होते.

**रामचंद्र अनंत कानिटकरः**—हे फर्ग्युसन कॉलेजांतील अत्यंत कुशाग्र बुद्धीचे विद्यार्थी. भिडे आय. सी. एस्. व हे यांची जोडी असे, व यांचा पहिला वर्ग सहसा चुकलाच नाहीं! हे हुषार तसेच मेहनती व व्यवहारांत फार दक्ष व चोख आहेत. हे १९२४ सालापासून सी. पी. कौंसिलांत पश्चिम वऱ्हाड म्युनिसिपालट्यातर्फेचे प्रतिनिधि ह्मणून बसत आहेत. ऑल–बरार–पार्टीज्चें रिप्रेझेन्टेशन लिहून काढण्यांत त्यांनीं आपलें कौशल्य दाखविलें, व त्या कामाचें महत्व बिंबलें ह्मणून ते आल बरार पार्टीज्चे प्रतिनिधि ह्मणून विलायतेस जाऊन आले.

**पं. दिनकर शास्त्री कानडे,**—एम्. ए. ( अमेरिका ) वाईच्या प्राज्ञपाठशाळेंतील हे अति बुद्धिमान व राष्ट्रप्रेमी विद्यार्थी. त्याच शाळेंत असतांना नारायणशास्त्री मराठे यांच्या हाताखालीं त्यांनीं संस्कृत भाषा व प्राचीन शास्त्रें यांचें गहन अध्ययन केलें. त्यानंतर ते उच्च शिक्षणाकरितां अमेरिकेंत गेले. गरीब विद्यार्थी ह्मणून तेथील लोकांचीं हलकीं कामें करून त्यांनीं विद्या संपादन केली व तेथें एम्. ए. झाले. कॅलिफोर्नियामध्यें असतांना ते फार आजारी पडले, त्यांत त्यांचें एक फुपफुस आजिबात मृत होऊन गेलें! हल्लीं ते एकाच फुपफुसाच्या जोरावर इतरांच्या दहा फुपफुसांपेक्षां ज्यास्त प्रभावशाली वक्तृत्व करीत आहेत. त्यांच्या अभ्यासशीलपणास तोड फार क्वचित् सांपडेल. त्यांचें निरीक्षण अत्यंत सूक्ष्म व मार्मिक असून कोणत्याहि विषयाच्या आद्य सिद्धांतांची त्यांची पकड फार दांडगी आहे. त्यांना चारशे पांचशे रुपयांच्या प्रोफेसरशिपची विनंती आली असतां केवळ लोकोपकारार्थ देह झिजविण्याचा निश्चय ह्मणून त्यांनीं ती नाकारली! इंग्रजी,

संस्कृत व मराठी भाषा; त्याचप्रमाणें वेदांत, पाश्चात्य तत्वज्ञान, इतिहास, तर्कशास्त्र व अर्थशास्त्र या शास्त्रांत ते सारखे निष्णात आहेत, व या विषयांतील कोणत्याहि प्रोफेसराइतकें त्यांचें ज्ञान ताजें विपुल आहे. लेनिन, मुसोलिनी, मुस्ताफा केमाल, मॅकडोनल्ड, गांधी, रशिया, जर्मनी इत्यादि विषयांवरील व्याख्यानें देतांना त्यांची विश्वव्यापक विशाल दृष्टी व त्यांचें सन तारखांसहित इतिहासाचें सूक्ष्म ज्ञान व्यक्त होतें. गीतारहस्यावरील वादांत त्यांनीं १९१४ सालीं आपलीं प्रवचनें नागपुरास केलीं होतीं. त्यांचा युक्तिवाद प्रतिपक्षीयांस अखंडनीय होता. ते तपस्वी डॉ. बाबासाहेब परांजपे यांच्या प्रमाणेंच अनिकेतन वृत्तीनें राहून केवळ राष्ट्रोद्धारार्थ आपला जीवनक्रम आचरीत आहेत. ते आजन्म ब्रह्मचारी आहेत. गेल्या चार वर्षांपासून प्रकृति स्वास्थाकरितां बुलढाण्यास येऊन राहिले आहेत महाराष्ट्रीय वक्त्यांमध्यें आजत्यांचे स्थान अद्वितीय आहे असें ह्मणावयास हरकत नाहीं. गेल्या कायदेभंगाचें वेळीं त्यांस १॥ वर्ष स. म. व ५०० रु. दंडाची शिक्षा झाली होती.

**राजेश्वर व्यकंटेश देशमुख उर्फ देसाई**—हे संदुरजन्याचे श्रीमंत जमीनदार व फॅक्टरीचे मालक आहेत. त्यांची वृत्ति अत्यंत तेजस्वी आहे. हाडाचे देशभक्त असून गेल्या दहा वर्षांपासून ते आपल्या प्रचंड उद्योगानें बुलढाणा जिल्हा गदगदा हालवून सोडतात. त्यांना कायदेभंगाचे वेळीं एक वर्षाची शिक्षा झाली होती.

**व्यंकटेश केशव सोमणः**—हे मेहेकरचे सुखवस्तु. यांचे वडील वकिली करीत होते. यांना जीव तोडून सार्वजनिक कामें करण्याचें 'व्यसन' आहे. यांनीं कोऑपरेटिव्ह चळवळींत फार काम केलें आहे. यांना वाचनाचा व्यासंग असून उद्योगधंद्यांकडे यांचा फार कल आहे. त्यांनीं स्वदेशी कापडाचें दुकान व साबणाचा कारखाना काढला आहे. १९२७ सालीं त्यांना डि. असोसि. च्या वार्षिक समारंभाचें अध्यक्षपद देण्यांत आलें होतें. जेथें लोकांशीं संबध येतो अशा वेळीं ह्मणजे निवडणुकींच्या प्रसंगीं सोमण-

देसाई यांची जोडी कामास लागली कीं विजय आपला म्हणून समजावें अशी यांची ख्याती आहे. या जोडीस कायदेभंगाच्यावेळीं एक वर्षाची शिक्षा झाली असून तुरुंगांतहि ते एकत्रच होते.

**स्वामी शिवानंदः**--यांचें मूळ नांव गणेश यादव देशमुख. १९०७ सालीं यांना एका पद्यांतील राजद्रोहावरून सात वर्षांची भयंकर शिक्षा देण्यांत आली होती! एवढी कठोर शिक्षा ही हिंदुस्थानांतील अगदीं पहिली होय! या शिक्षेच्या अवधींत त्यांना संयुक्त प्रांतांतील तुरुंगांत पाठविण्यांत आलें होतें. तेथें त्यांनीं हिंदी भाषा अवगत करून त्या भाषेंत राष्ट्रप्रेमवर्धक कवनें केलीं. मूळचे अविवाहित असल्यामुळें त्यांनीं प्रपंच्याचा सर्वस्वी त्याग करून संयुक्तप्रांतांत असतांना आर्यसमाजाचा स्वीकार करून संन्यास घेतला. १९१५ सालीं फिरत फिरत ते वऱ्हाडांत आले. काव्यें करून, तीं सभेंत गाऊन, व व्याख्यानें देऊन ते राष्ट्रीय आंदोलनास मदत करीत आहेत. त्यांचें वय हल्लीं ७५ च्या वर आहे, तरी त्यांचा उल्हास तरुणांना लाजविण्यासारखा आहे. त्यांना गृहस्थाश्रमांत असतांना गायन, वादन, नर्तन, नाट्य यांचा फार नाद असून सुप्रसिद्ध पखवाजी इंदूरचे 'नाना पानशे' यांच्याजवळ हे तबला वाजविण्यास शिकले होते. यांच्या हाताचीं बोटें लांब व तरळ असल्यामुळें ते पट्टीचे तबला वाजविणारे बनले व त्यांच्यावेळीं या कलेंत त्यांचा हात धरणारा तबलजी वऱ्हाड प्रांतांत नव्हता. यांनीं आपली कांहीं नाट्यप्रेमी मित्रमंडळी जमवून १९०३-०४ सालीं एक नाटक कंपनीहि काढली होती.

**पृथ्वीराज व्यासः**--हे १८९७ सालीं अमरावती हायस्कुलांत शिकत होते. यांना कुस्ती व शरीरबल संवर्धनाचा शोक विद्यार्थीदशेपासून आहे. दररोज नियमितपणें मेहनत करून त्यांनीं आपला पौष्टिक खाद्याचा आहार व शरीर इतकें वाढविलें कीं अमरावती हायस्कुलांतूनच काय, वऱ्हाडच्या विद्यार्थी वर्गांतून आजवर त्यांच्या एवढ्या धष्टपुष्ट शरीराचा व शक्तीचा

एकहि विद्यार्थी निघाला नसेल! शाळेंत असतांना प्रतापादित्य व शिवाजी यांच्या स्वातंत्र्यप्रेमी चरित्रांनीं त्यांस वेडावलें. शामरावजी देशपांडे व प्रस्तुत लेखक यांचा पृथ्वीराजजीशीं स्नेहसंबंध या वेळेपासूनच झाला. पृथ्वीराज उर्फ पन्नालालजी यांचें स्वातंत्र्यप्रेम वाढविणारें इतिहासाचें वाचन तेव्हां पासून वाढत गेलें, व ते नुस्ते एक मल्लविद्याविशारदच नव्हे, तर एक अत्युत्कृष्ट परिणामकारक वक्ते ह्मणून लौकरच वऱ्हाडभर प्रसिद्ध झाले. त्यांनीं खामगांवास 'प्रताप आखाडा' व शिवाजी वाचनालय काढलें. ते टिळक-मतांचे निस्सीम अभिमानी व पुरस्कर्ते आहेत. होमरुल लीग दौरा, नेहरू योजना, गणपति उत्सव अशा प्रसंगीं ते व्याख्यानांस बाहेर पडतात तेव्हां त्यांच्या व्याख्यानास प्रचंड जनसमूह उत्सुकतेनें जमतो, व त्यांचें भाषण झाल्याशिवाय प्रांतिक परिषद पूर्ण होत नाहीं अशी त्यांची प्रभावी भाषणशैली आहे.

**दाजीशास्त्री चांदेकरः**—हे नागपुरचे राहणारे, पण वऱ्हाड मधील व विशेषतः यवतमाळ जिल्ह्यांतील राजकारणास व्याख्यानरुपानें मदत करणारे ह्मणून त्यांची लोकनायकाच्या विदर्भीय सहकार्यकर्त्यांत प्रमुखत्वानें गणना होते. नागपुरचे एक नामांकित मल्ल, शरीरबांध्यानें सुदृढ आणि देखणे, वृत्तीनें पूर्ण राष्ट्रीय, आणि राजकारणांत लक्ष घालून झटणारे असे हे व्याख्याते, कीर्तनकार व वैद्य आहेत. मतभेदाचें तुमुल रण माजलें असतां मोठाल्या सभांतून आपल्या मुद्देसूद वक्तृत्वानें व प्रमाणांनीं प्रतिपक्षीयांवर मात करण्याचे कामांत हे हातखंडा आहेत! यांचा स्वभाव फार मधुर, प्रेमळ व आनंदी असून आपल्या छटेल भाषणशैलीनें ते खाजगी बैठक रंगवून सोडतात.

**पुरुषोत्तम शंकर उर्फ दाजीसाहेब बेदरकरः**—हे आकोटचे राहणारे गृहस्थ. अमरावतीच्या काशीबाई प्रायव्हेट हायस्कूलांत वीर वामनराव जोशी यांच्या हाताखालीं शिकलेले, एका कॉटन जिनिंग फॅक्टरीचे मालक असून

फार बुद्धिमान व्यवहारकुशल व कापसाच्या धंद्यांत वाकबगार आहेत. यांचा स्वभाव पराकाष्टेचा विनोदी, प्रांजल व चळवळया आहे. ते हल्लीं आकोट म्युनिसिपालीटीचे अध्यक्ष आहेत. गेल्या पंधरा वर्षांपासून ते हरएक सार्वजनिक कार्यांत झटून लक्ष घालतात. ते फार वजनदार कार्यकर्ते असून लोकनायकांचे निस्सीम भक्त आहेत. गेल्या कायदेभंगाच्या चळवळींत यांना एक वर्षाची शिक्षा झाली होती.

**ब्रिजलालजी बियाणी**:--अकोलानिवासी. बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर सरकारी नोकरी किंवा वकिलीच्या धंद्याकडे न वळतां देशाभिमानानें प्रेरित होऊन ते खाजगी उद्योगास लागले, व १९२५ च्या कौंसिल-निवडणुकींत उभे राहून गिरणीमालकांचे प्रतिनिधि ह्मणून सी. पी. कौंसिल-मध्यें निवडून आले. ते कॉंग्रेसचे एकनिष्ठ भक्त असून अंगीकृत कार्य चिकाटीनें सिद्धीस नेणारे उद्योगी देशभक्त आहेत. व्यापारी वर्ग कायदे-भंगाच्या चळवळींत एवढ्या मोठ्या प्रमाणावर सामील होण्यांत ब्रिजलाल-जींच्या पुरस्कर्तृत्वाचा भाग विशेष आहे. ते सफाईदार वक्ते असून स्वभा-वानें अतिशय विनयशील व मधुर आहेत. स्मित हास्य त्यांच्या मुद्रेवर सदा वास्तव्य करीत असतें! त्यांची मागणी पूर्ण करण्याकरितांच हा चरित्र ग्रंथ लिहिण्यांत आलेला आहे यावरून त्यांचें चरित्रनायकांवरील निष्कपट प्रेम व्यक्त होतें.

**श्री. परशराम चिंतामण उर्फ मामासाहेब जोगळेकर, अकोला**:--हे प्रथम वैद्यकीचा धंदा करून नांवास चढले, व अजूनहि तो त्यांचा उद्योग यथाशक्य सुरू आहे. सार्वजनीक कामाची अत्यंत प्रखर हौस, कामाची धडाडी आणि शब्दाचा पक्केपणा या गुणांनीं त्यांनीं अकोला शहरांत व नंतर जिल्ह्यांत अग्रेसरत्वाचें स्थान प्राप्त केलें. हे १९०६ च्या चळवळींत गांवोगांव हिंडून जागृति करीत असत. होमरूल लीग चळवळीच्या वेळीं यांनीं २५ हजार रुपयाचा टिळक ट्रस्ट करून त्याचे द्वारें " प्रजापक्ष " पत्र

सुरू केलें, तें आज चालू आहे. अकोला शहरांतील प्रत्येक सार्वजनिक चळवळींतील ते एक अवश्यक अंग बनलेले आहेत. गेल्या कायदेभंगाच्या वेळीं यांनीं पुसद येथें नेतृत्व स्वीकारून पांच आठवडे शिक्षा भोगली. लोकनायक बापूजी अणे, तपस्वी डॉ. बाबासाहेब परांजपे व वीर वामनराव यांच्या विश्रामाचें स्थान ह्मणजे 'मामासाहेबांचा मळा' होय. त्यांचा उदारपणा व चिकाटी स्पृहणीय आहे.

**श्रीराम सुरजमलः**—अकोला येथें लक्षावधि रुपयांचा धंदा करणारे, आकोला म्युनीसिपल कमिटीचे एकदां अध्यक्ष होते. स्वतःच्या मालकीची जिनिंग फॅक्टरी आहे. आकोला जिल्हा युद्धमंडळाचे अध्यक्ष असून यांना ९ महिन्यांची शिक्षा झाली होती. हे विचारांनीं पूर्ण राष्ट्रीय, धार्मिक वृत्तीचे व समाधान प्रकृतीचे, पण निश्चयी कार्यकर्ते आहेत. लोकनायक सुटून आल्यानंतर त्यांच्या दर्शनार्थ ते रातोरात प्रवास करून वणीस गेले होते.

**नरहर रामचंद्र उर्फ बापूसाहेब घुडेः**—हे कारंजा येथील पिढीजात सावकार आहेत. १९०६ च्या चळवळीपासून ते प्रत्येक राष्ट्रीय आंदोलनांत मनःपूर्वक भाग घेत आहेत. १९१८ च्या फेब्रुवारींत लोकमान्यांनीं होमरूल लीगचा दौरा वऱ्हाडांत काढला त्यावेळीं यांनींच त्यांना आग्रहानें नेऊन त्यांचें जंगी स्वागत केलें. यांना वर्तमानपत्रें व राष्ट्रीयजीवनपोषक वाङ्मय वाचनाचा फार नाद आहे, व १९०६ पासूनच्या कित्येक वर्तमानपत्रांचे व मासिकाचे महत्वाचे अंक, तसेच महत्वाचे ग्रंथ त्यांच्या संग्रहालयांत सापडतात. बापूसाहेब हे मोठे आवेशयुक्त वक्ते व आकोला जिल्ह्यांतील राष्ट्रीय चळवळींचे आधारस्तंभ आहेत.

४६४३